म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ७१४५

इ. सन. १९५८

REFBK-0009775


ગ્રામદાનની
પુણ્યભૂમિ

लेखक : श्री. ग. माजगांवकर, एम्. ए.

* * * * * * * * *

# ग्रामदानाची प्रयोगभूमि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

* * *

प्रस्तावना :

डॉ. धनंजयराव गाडगीळ

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

हंस प्रकाशन

पुणे

मूल्य अडीच रुपये

REFBK-0009775

## चारच शब्द :

आमची प्रगति ही सागराच्या भरती–ओहोटीसारखी चालू आहे. पूर्णचंद्र आकाशांत दिसूं लागल्यावर सागरांत भरतीच्या लाटा उसळूं लागतात. एखादा संत-महात्मा क्षितिजावर उदयास आल्यावर आमच्या लोकसागरलाहि आनंदाचें, उत्साहाचें असेंच उधाण येतें. आम्ही आनंदोन्मादाने नाचूं लागतों.

या उधाणाला, क्षणिक उत्साहाला 'परिवर्तन' समजणें बरोबर ठरेल काय? या एका प्रश्नाचें उत्तर शोधण्यासाठी मीं कोरापुटचा प्रवास केला. त्या प्रवासाचा हा वृत्तान्त. एकच गोष्ट सांगावीशी वाटते: जर समाज-परिवर्तनाचा ध्येयवाद नजरेसमोर ठेवावयाचा असेल तर यापुढे स्वातंत्र्य-पूर्व काळांतील 'लोकजागृती'च्या कार्यपद्धतींवरच केवळ विसंबून चालणार नाही. नवी विधायक मनोवृत्तीच जोपासली पाहिजे. तदनुसार कार्यपद्धति अंगीकारली पाहिजे. लोकसागराला अधूनमधून उधाण आणण्यापेक्षा जगन्नाथ पंडिताप्रमाणे लोकगंगेला हळूहळू एकेक पायरी वर आणणारें नवें नेतृत्व आम्हांला पाहिजे. माझ्या कोरापुट वृत्तान्ताचें हें सार आहे. असो.

हा वृत्तान्त मी लिहूं शकलों याचें कारण थोरामोठ्यांचें उदार साहाय्य. श्री. रावसाहेब पटवर्धन, मा. अण्णासाहेब सहस्रबुद्धे, श्री. के. आर्. दात्ये— सर्वांनीं मार्गदर्शन केलें, माहिती दिली. गुरुवर्य डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचा उल्लेख स्वतंत्रपणें करतों. कारण त्यांनी वेळांत वेळ काढून माझें लिखाण दोनदां वाचलें; त्यांत सुधारणा सुचविल्या व शेवटीं स्वतःची स्वतंत्र व सविस्तर प्रस्तावना लिहून दिली. मी या सर्वांचा ऋणी आहे.

सर्व सेवा संघाने कांही ब्लॉक्स वापरण्याची अनुमति दिली, याबद्दल चालकांचे आभार मला मानले पाहिजेत.

श्री. ग. माजगांवकर

सर्वाधिकार लेखकाधीन

प्रकाशक : ब. मो. पुरंदरे, १९६/३५ सदाशिव, पुणें २
मुद्रक : त्रिं. ग. वझे, साधना प्रेस, ३७४ शनवार, पुणें २

# ग्रामदान-चिकित्सा*

डॉ. धनंजयराव गाडगीळ

विनोबाजींच्या भूदान चळवळीस सुरुवात होऊन दहा वर्षें झालीं. या काळांत चळवळीचें स्वरूपहि बरेंच पालटलें. एका प्रदेशांतील भूहीन शेत-मजूर वर्गांतील अशांतता शमविणें हें चळवळीचें तात्कालिक उद्दिष्ट होतें. राष्ट्रव्यापी सामाजिक, राजकीय व आर्थिक क्रांति शांततेने घडवून आणणें हें तिचें आजचें उद्दिष्ट बनलें आहे. परिवर्तनाचा दानमार्ग यास अजून प्राधान्य आहे, परंतु दानाची व्याप्ति वाढून भूमीबरोबर संपत्ति, समय, जीवन यांचाहि आता दानांत समावेश झाला आहे. प्रथमतः दत्त भूमीचें भूहीनांत वाटप करून त्यांस कृषीवल बनविणें एवढेंच मर्यादित कार्य भूदान-कार्यकर्त्यांपुढे होतें. आता एकेक ग्रामदान झाल्याच्या घोषणेपासून सुरुवात होऊन प्रत्यक्ष समग्र देशव्यापी क्रांति घडून येईपावेतो ग्रामदानकार्य संपलें असें म्हणतां येत नाही! अर्थात् या प्रक्रियेंत अनेक टप्पे अभिप्रेत आहेत आणि तीस कालावधीहि फार लागणार हें उघड आहे. चळवळीचें स्वरूप पालटलें तें हळूहळू, क्रमशः पालटलें हें खरें; परंतु भूदान मागण्याचें सोडून मुख्यतः ग्रामेंच मागूं लागणें हें विनोबाजींच्या उत्कल पदयात्रेंतच घडून आलें. तसेंच उत्कलच्या कोरापुट जिल्ह्यांतच आजपावेतो इतरत्र कोठेंहि मिळालीं त्यापेक्षा जास्त ग्रामदानें मिळालीं आणि ग्रामदान-कार्यकर्त्यांतर्फे येथेंच आपल्या विधायक क्रांति-कार्यक्रमाची खरी आखणी होऊन प्रत्यक्ष कार्यास सुरुवात झाली आहे. तेव्हा ग्रामदान क्रांति म्हणजे काय, तिचे मार्ग कोणते व तिजपासून काय अपेक्षावें, हें कोरापुटमधील कार्याची माहिती करून घेतल्यामुळेच कळण्याजोगें आहे.

श्री. माजगांवकर यांनी याच दिशेने आपल्या पुस्तकांत प्रयत्न केला आहे. पुस्तक लिहिण्यापूर्वी अनेक दत्त-ग्रामांस त्यांनी भेट दिली व प्रमुख कार्य-कर्त्यांच्या मुलाखती घेतल्या; तसेंच उपलब्ध असलेली माहिती व आकडेहि शक्य तेवढे गोळा केले असें दिसतें. पुस्तकांत ही सर्व वर्णनात्मक माहिती दिलेली आहे. एवढेंच नाहीं तर त्यांनी स्वतःच्या निरीक्षणावरून या सर्व

चळवळीबद्दल विवेचन करून कांही निष्कर्ष काढले आहेत. हें सर्व उपयुक्त झालें आहे असें मला वाटतें. इतर बाबींत इष्ट वाटत असलेला चिकित्सक दृष्टिकोन ग्रामदानासारख्या चळवळीबाबत अप्रस्तुत मानावा, याविषयी श्रद्धाळू वृत्तीच राखावी, असा मोठ्यांचा अभिप्राय आहे, असें कांही वेळां दिसून येतें. तेव्हा श्री. माजगांवकरांचे निष्कर्ष अगर त्यांची विवेचनपद्धति याबद्दल कांही न लिहितां हा प्रास्ताविक मजकूर या मूलभूत महत्त्वाच्या प्रश्नाच्या विचारांतच अडवावा, असें मीं योजिलें आहे.

गेल्या दहा वर्षांतील विनोबांचें कार्य अनेक दृष्टींनी महत्त्वाचें व राष्ट्रास उपकारक ठरलें आहे. भूदान-ग्रामदान चळवळीची शाश्वत फलप्राप्ति काय होते, याचा विचार न करतांहि या कार्याचें महत्त्व मानलें पाहिजे. एका व्यक्तीस शासन-संस्था अगर परंपरागत समाजसंघटना यांचा आधार न घेतां, त्याकडे लक्ष न पुरवितां, व्यक्ति व समाजांतील सुप्त भावनांस निदान कांही काळापुरतें तरी कसें जागृत करतां येतें, हें विनोबांच्या पदयात्रेने दाखविलें आहे. तसेंच भारतांतील निरनिराळ्या भाषा व विभिन्न परंपरा यांस दुर्लक्षून नव्हे तर त्यांचा परिपोष करून, त्यांतील मर्म सहेतुक विचक्षणपणें जाणून घेऊन, एक भारतीय भूमिका विश्वशांतीकरिता निर्माण करण्याचा महाप्रयत्न ते करीत आहेत. स्वातंत्र्योत्तर काळांत आपल्या देशांतील, विशेषतः खेड्यांतील, दैन्य व लाचारी यांकडे सतत लक्ष वेधण्याचें बिनमोल कार्यहि त्यांनी केलें आहे. याहि पलिकडे सद्भावना व सद्विचार यांची सतत प्रेरणा ते देशास आपल्या संचाराने सारखी देत राहिले आहेत. हें सर्व कार्य भूदान–ग्रामदान चळवळी करीत असतांना होत असलें तरी त्याचा या कार्याशीं तसा अभेद्य संबंध नाही. हें कार्य भारतीय परंपरेंतील संत मालिकेंतील इतरांनी केल्यासारखें कार्य आहे. स्वतःचें आचरण व सतत मनन, प्रवचन आणि संचरण यांच्या द्वारा भारतीय आध्यात्मिक व नैतिक वारशास विनोबाजी उजळा देत आहेत, जनतेस त्याचें नित्य स्मरण देत आहेत व राष्ट्रांत विवेक व शांति यांचा प्रभाव टिकवीत आहेत हें कार्य बिनमोल आहे.

भूदान–ग्रामदानाच्या चळवळीचें महत्त्वमापन करतांना हें कार्य दृष्टीआड न झालें तरी तें प्रत्यक्षांत विचारांत घेण्याचें कारण नाहीं. संतांचें कार्य हें

एका दृष्टीने स्थितिकालनिरपेक्ष असतें. त्याचें लक्ष्य मानवसमाजाची नैतिक पातळी टिकविणें, वाढविणें हें असतें; अमुक कांही घडवून आणणें हें नसतें. या कार्यातील पारलौकिक अंश सोडला तरी ऐहिक विशिष्ट कार्यक्रमाच्या ऐवजी एकूण तें कसें करावें, कोणत्या वृत्तीने करावें, यावर त्यांचा भर असतो. व्यक्तिगत मुक्ति, मनःशांति, निर्वैरत्व कसें साधावें, याचे मार्ग संत सांगतात व दाखवितात. कोणत्याहि काळांत व परिस्थितींत संतांच्या कार्यामुळे तात्कालिक समस्या सुटण्यास अनुकूल मनोभूमिका तयार होते. पण हें कार्य सर्वसामान्य स्वरूपाचें आहे. हें सतत करीत राहण्याचें असतें. त्याचें विवक्षित उद्दिष्ट नसतें, असूं शकत नाही. कांही तर असें म्हणतील की, संतांचें कार्य अहेतुक असतें. ते स्वतःचें जीवन क्रमतात आणि केवळ साहजिकपणें इतरांचा उद्धार करतात. विनोबांच्या पदयात्रेंत ते असल्या प्रकारचें कार्य करतात हें वर सांगितलेंच. त्यांच्या विवक्षित कार्यक्रमाबद्दल प्रचार करतांनाहि ते या स्वतःच्या मूलभूत भूमिकेचा विसर पडूं देत नाहीत. परंतु खुद्द ग्रामदान चळवळीचा विचार करीत असतांना आपणांस शांति व सद्भावना यांपलीकडे जाऊन विवक्षित उद्दिष्टें व कार्यक्रम यांचा आपला देश व सद्यःकाळ यांच्या चाकोरींत विचार करावयाचा आहे.

हें लक्षांत ठेवलें म्हणजे तपशिलांत जाऊन आजची परिस्थिति काय आहे, यांत कोणतें परिवर्तन व्हावें असें म्हटलें जातें व तें कसें घडवून आणण्याचा कार्यक्रम आहे, व हें कोणत्या अंशीं, कोठे व कोणत्या दिशेने प्रत्यक्ष घडत आहे, घडण्यासारखें आहे, या सगळ्याचा विचार करावा लागतो. हा विचार करतांना प्रथम प्रामाण्यविचारापासून सुरुवात केली पाहिजे. प्रामाण्य अनेक प्रकारचें असूं शकतें. पूर्वीच्या ऋषींच्या किंवा आजच्या संतांच्या उक्ति स्वतःसिद्ध आहेत, असें मानल्यास पुढील विचारच करावा लागत नाही. किंवा या उक्तींचा अर्थ काय एवढाच विचार शिल्लक उरतो. पण प्रत्यक्ष व्यावहारिक कार्यक्रमाचा विचार करतांना युक्तायुक्तता व शक्याशक्यता या दोन्हींकडे लक्ष पुरविणें आवश्यक आहे. कोणत्याहि कार्यक्रमाच्या युक्तायुक्ततेबद्दलचा अगर इष्टानिष्टतेबद्दलचा विचार प्रथमच करावा लागतो. हाहि विचार केवळ सामान्यपणें करून चालत नाही. शांतिप्रधान, अहिंसात्मक समाजनिर्मिति असलें सामान्य उद्दिष्ट सर्वमान्य होऊं शकेल; पण या समाजाची रचना व

व्यवस्था कशी असणार, तो कसा चालणार, याबद्दल तपशील कळल्याखेरीज असल्या सर्वमान्यतेचा फारसा उपयोग नाही. ग्रामदान कार्यकर्त्यांतसुद्धा उद्दिष्टांबाबत मतभेद असूं शकतात, हें श्री. माजगांवकर दाखवितात. ग्रामदानाने सामाजिक व आर्थिक क्रांति साधूं शकेल असें म्हटलें असतां या क्रांतीनंतर समाजाचें सर्वांगीण स्वरूप कसें असेल व ही क्रांति कोणत्या रीतीने व कोणत्या टप्प्याने घडणार, हें स्पष्ट करणें जरूर आहे.

आज ग्रामदान क्रांतीचा विचार करतांना तिचें अंतिम स्वरूप सुस्पष्ट नाही, ही एक मोठी अडचण आहे. उदाहरणार्थ, ग्रामदान विचारांत स्वयंपूर्णता महत्त्वाची, असें सामान्यपणें मानलें जातें. आर्थिक प्रगति व सुबत्ता ही सर्व प्रकारच्या श्रमविभागावर अवलंबून आहेत असें शास्त्रज्ञ सांगतात; व मानवसमाजाचा आजवरचा इतिहास हेंच दर्शवितो असेंहि म्हणतात. ग्रामस्वयंपूर्णतेचा स्वीकार केला असतां देशांतील एकंदर उत्पादन घटेल व जीवनमान वाढण्याऐवजी कमीच होईल असें आज सर्वसाधारणपणें मानलें जातें. हें होणार नाही किंवा झालें तरी हरकत नाही असें ग्रामदानवाद्यांस म्हणावयाचें असल्यास हें त्यांनी सयुक्तिक रीतीने मांडलें पाहिजे व प्रत्यक्षांत कसें घडूं शकतें, हें स्पष्ट करून दाखविलें पाहिजे. आज याबाबत विचारांत व कृतींत कांहीहि झालेलें दिसत नाहीं. कोरापुटमधील ग्रामें जास्त स्वयंपूर्ण होण्याकरिता उत्पादनाची बैठक बदलण्याचा प्रयत्न केला नाही, इतकेंच नव्हे तर अनेक ठिकाणीं बाजारी उत्पादनाकडे लक्ष वाढविण्यांत आलें. तसेंच अंचल वा तालुका संस्था काढतांनाहि स्वयंपूर्णतेकडे लक्ष दिलेलें दिसत नाही. आता तर पुढील विधायक विकासकार्यक्रमाकडे ग्रामदान कार्यकर्त्यांनी लक्ष द्यावयाचें नाही, तें काम सरकारी यंत्रणेकडे सोपवावयाचें, असें ठरलें. तेव्हा आर्थिक विकासाची व आर्थिक व्यवस्थेच्या कारभाराची दिशा ग्रामदान झाल्याने मुळीच बदलणार नाही व बदलावयाची नाही हें उघड आहे. असें झालें तरी वारंवार स्वयंपूर्णतेबद्दल ग्रामदान व सर्वोदय तत्त्वज्ञ व प्रचारक बोलतात यामुळे वैचारिक गोंधळ होणें अपरिहार्य ठरतें.

बरें, स्वयंपूर्णतेवर भर द्यावयाचा नाही असें ठरल्यास ग्रामदान तत्त्वज्ञांपुढील प्रश्न फार व्यापक होतो. ग्रामस्वयंपूर्णता अगर छोट्या जनपदांपुरती स्वयंपूर्णता हें उद्दिष्ट मानल्यास नागर अर्थव्यवस्थेचा प्रश्न महत्त्वाचा उरत

नाही. कारण एकेक ग्राम किंवा लहान जनपद स्वयंपूर्ण झाल्यास मोठ्या शहरांची जरुरी ठरत नाही व मोठ्या नागर वस्तीस आवश्यक असलेला धनधान्यादि पुरवठा होणेंहि शक्य नाही. तेव्हा ग्रामस्वयंपूर्णतेचा कार्यक्रम म्हणजे नागर अर्थव्यवस्था मोडण्याचा कार्यक्रम, असें मानावें लागतें. परंतु असल्या प्रकारची स्वयंपूर्णता ग्रामदानांत अभिप्रेत नसल्यास ग्रामदानाच्या-बरोबर नागर आर्थिक व्यवस्थेबाबतहि कांही कार्यक्रम या क्रांतिकारक मोहिमेंत समाविष्ट करावा लागेल. भूदान-ग्रामदानाच्या जोडीस संपत्ति, समय व जीवनदान मागण्यांत येऊं लागलें आहे. परंतु दुकानदान किंवा कारखानादानाची भाषा अजून ऐकूं येत नाही. ग्राम स्वयंपूर्ण होणार व शहरें नाहीशीं होणार, असें मानल्यास दुकान-दान किंवा कारखाना-दान न मागणें हें सयुक्तिक आहे. परंतु असें नसल्यास हल्लीची दान-मागणी फार एकांगी ठरते. खेड्यापुरता विचार केल्यास भूहीनांचें दैन्य डोळ्यांत ठळकपणें भरतें. परंतु राष्ट्राच्या आर्थिक व्यवस्थेकडे पाहिल्यास शहर-खेड्यांतील फरक, शहरांतील मूठभर लोकांच्या हातीं संपत्ति व सत्ता यांचें केंद्रीकरण हेंच आजचें खरें राष्ट्रीय शल्य असें दिसूं लागतें. आजच्या ग्रामदानाच्या तत्त्वज्ञानांत याचा विचारच कोठे झालेला नाही, ही मोठी उणीव आहे; एवढेंच नव्हे तर ज्या कार्यक्रमांत सत्ता-संपत्तीच्या या केंद्रीकरणाबाबत काय करावयाचें हें सांगितलें नाही, त्याचें ‘समग्र समाजांत क्रांति घडवून आणणारा कार्यक्रम’ असें वर्णन करणेंच चुकीचें ठरतें.

स्वयंपूर्णतेबद्दल वर जें सांगितलें तशाच प्रकारचें यंत्र व अमानुषी शक्ति यांचा वापर याबद्दलहि मांडतां येईल. ग्रामदान तत्त्वज्ञांची याबाबत भूमिका अजून स्पष्ट नाही. खुद्द विनोबा सोडल्यास आज या चळवळींतील सर्वच पुढारी वहातुकीचीं व दळणवळणाचीं अत्याधुनिक साधनें वापरतात. हीं सर्व जर त्याज्य नसलीं, यांचा वापर नेहमी होणार असला, तर हीं ज्यावर आधारित त्या सर्व गोष्टी– आधुनिक शास्त्रीय उत्पादन-तंत्र, यंत्रोत्पादनास लागणारे सर्व उद्योग, त्याच्या अनुषंगाने प्राप्त होणारी व्यापारपत याबाबतची व्यवस्था—हीं सर्व ग्राह्य ठरतात. नवीन तंत्राचा स्वीकार बेताने, नियमित रीतीने व्हावा, ज्यायोगें आपली आजची आर्थिक घडी पूर्ण न बिघडेल, बेकारी न वाढेल अशा रीतीने परिवर्तन घडून यावें, या म्हणण्यास कोणी

विरोध करणार नाही. परंतु नवीन तंत्र हळूहळू तरी स्वीकारल्याखेरीज तरणोपाय नाही, त्याशिवाय आपलें सामर्थ्य व संपत्ति वाढणार नाहीत, या विचाराऐवजी तें कधीच स्वीकारार्ह नाही, त्याशिवाय आपलें भागेल व शांत व समाधानी समाज निर्मितां येईल असें म्हणणाऱ्यांनी आपलें म्हणणें आकड्यांत, तपशिलांत स्पष्ट मांडून दाखविलें पाहिजे. नाहीतर आधुनिक तंत्र प्रत्यक्षांत आपल्या कामापुरतें वापरावयाचें, बोलण्यांत मात्र त्याचा निषेध करावयाचा व असें करून बौद्धिक गोंधळ माजवून खऱ्या प्रागतिक विचारास अडथळा आणावयाचा, याखेरीज कांही साधतें असें दिसत नाही.

हे विचार जरा पुढचे म्हणून बाजूस सारून केवळ ग्रामव्यवस्थेंतील क्रांतीबाबत तात्पुरता विचार करतां येईल. येथे उद्दिष्टांबाबत कांही न लिहितां मार्ग व व्यवहार यांविषयीच कांही मुद्दे उपस्थित करतों. पहिला महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ग्रामदानाने क्रांति होते हें केव्हा सिद्ध झालें असें मानावयाचें ? मूलोद्योगी शिक्षण म्हणजे काय हें प्रत्यक्षांत स्पष्ट न होतां, त्याचे फायदे-गैरफायदे काय हें अनुभवाने सिद्ध न करतां आपण त्याचा स्वीकार केला. परिणामीं अजूनहि त्याची व्याप्ति व उपयुक्तता हीं ठरलेलीं नाहीत आणि त्याचेपायीं साधनांचा व संपत्तीचा अपव्यय झाला व होत आहे. ग्रामदानाबाबत असेंच करावयाचें तर निराळें. मग मूलोद्योगी शिक्षणामुळे जेवढी क्रांति झाली तेवढीच ग्रामदानाने होईल ! तसें पाहिलें तर ग्रामदानाने क्रांति कशी होणार, याविषयी मूलोद्योग शिक्षणपद्धतीबद्दल जेवढा विचार झाला आहे तेवढाहि झालेला नाही. किंबहुना ग्रामदान-तत्त्वज्ञांत एक वर्ग असा दिसतो की, त्यांच्या मतें असा विचार होण्याचीहि जरुरी नाही. ग्रामांतील लोकांनी दान करण्याचें ठरविलें म्हणजे झालें. पुढे काय होणार हें पाहणें अगर सांगणें कोणाकडेच नाही. हें सर्व ग्राम-संकल्पाने व्हावें. ग्रामांतील मंडळींनी स्वतः जमिनीचें वाटप कसें करावयाचें व यापुढे कांही करावयाचें किंवा नाही हें ठरवावयाचें. ग्रामदान करा, असें सांगण्या-पलिकडे कांही जबाबदारी ग्रामदान तत्त्वज्ञांची व प्रचारकांची नाही. लोकांवर आपलीं मतें लादूं नयेत, सर्व स्वयंस्फूर्त व्हावें, म्हणून अशी वृत्ति स्वीकारावी असें सांगण्यांत येतें. यांसहि कांही हरकत घेण्याचें कारण नाही. एवढेंच की, एकदा ही वृत्ति स्वीकारली म्हणजे ग्रामदानानंतर-ग्रामदाना-

मुळे–क्रांति तर राहोच, पण अमुक एक कांहीहि होतें असें म्हणण्यास त्यांना कांही अधिकार, आधार उरत नाही. अशा परिस्थितींत ग्रामदानानंतर जमिनीचें फेरवाटपहि इष्ट मार्गानें होईल असें सांगतां येत नाहीं. थोडेंबहुत मार्गदर्शन होऊनहि कोरापुरमध्ये जमीनवाटपाबाबत असमाधानकारक परिस्थिति कशी राहिली, हें श्री. माजगांवकर यांनी दाखविलें आहे.

केवळ ग्रामसंकल्पावर अवलंबून न राहतां ग्रामदान कार्यकर्त्यांनी कांही जबाबदारी स्वीकारावी असें म्हटल्यास कोरापुट जिल्ह्यांतील प्रयोग फार महत्त्वाचा ठरतो. कारण, इतरत्र मंगरोठसारखें एखादें एकाकी खेडें सोडल्यास ग्रामदान कार्यकर्त्यांनी विचारपूर्वक कार्यक्रम आखून कांही काळ सातत्याने त्याचा पाठपुरावा केल्याचें उदाहरण नाही. कोरापुटमधील प्रयोगाचें वर्णन करणें हा श्री. माजगांवकर यांच्या पुस्तकाचा प्रमुख उद्देश असल्यामुळे त्याबद्दल मला कांही लिहिण्याचें कारण नाही. पण तेथील अनुभवावरून एक-दोन गोष्टी स्पष्ट दिसतात त्यांकडे येथे लक्ष वेधतों.

कोरापुटमधील अनुभवाचा विचार करतां पहिली गोष्ट जी ध्यानांत येते ती ही की, क्रांति या शब्दाने अभिप्रेत असलेली प्रक्रिया फार मूलगामी व व्यापक आहे. समाज अगदी प्रथमावस्थेंत असला तरी त्याची व्यवस्था एकदम बदलतां येत नाही. आणि परिवर्तन समजावून, शांततेने घडवून आणावयाचें असल्यास कार्य सातत्याने दीर्घकाल झालें पाहिजे. इतर सर्व गोष्टी कोरापुटमध्ये अनुकूल असूनहि जमीन-वाटप समाधानकारक रीतीने सर्व ग्रामांत होऊं शकलें नाही व जेथे जाणते कार्यकर्ते मार्गदर्शन करण्यास सारखे उपलब्ध नव्हते तेथे वाटपापलिकडे कांहीच झालें नाही. तेव्हा क्रांतीची गोष्ट राहोच, पण साध्या विकासकार्यास सुरुवात करावयाची तरी सरकारी यंत्रणेहून अधिक व्यापक व कार्यक्षम यंत्रणा ग्रामदान कार्यकर्त्यांस तयार करावयास हवी.

दुसरें असें की, ग्रामदानांतील विकासकार्याचा क्रांतिकारक असा कांही निराळा साचा नाही; अजून तरी तयार नाही. रूरल क्रेडिट सर्व्हे समितीच्या कार्यक्रमाच्या धर्तीवर ताबडतोबीने आपण काम सुरू करणें अवश्य आहे हें लक्षांत येण्यासच ग्रामदान कार्यकर्त्यांस कांही वेळ लागला. ही गोष्ट लक्षांत आल्यावर पैसा पुरविणें, खरेदी-विक्रीची व्यवस्था करणें आणि या व्यव-

हाराशीं कृषिसुधारणेचा मेळ बसविणें या गोष्टी सोप्या नाहीत, प्रत्येकांत विचारपूर्वक काम करण्यास माणसें हवींत हें स्पष्ट झालें व हें सर्व करीत असतां सरकार व सरकारी कार्यपद्धति यांच्याशीं जुळवून घेणें अपरिहार्य होतें हें लक्षांत येऊं लागलें. एवंच ग्रामविकासाबाबत आज जेवढा विचार देशांत झालेला आहे, अनुभव आलेला आहे, तेवढा पचवून आपल्या क्षेत्रांत कसें काम करावें, हेंच अजून ग्रामदान कार्यकर्त्यांस पुरतें शिकावयाचें आहे.

ग्रामदान कार्यकर्त्यांस कांही नवीन सुचावयाचें नाही, यावयाचें नाही, असा याचा अर्थ नाही. किंबहुना ग्रामविकासाच्या अनेक क्षेत्रांत देशांतील आजवरचा विचार व अनुभव हीं अत्यल्प आहेत. त्यांतल्या त्यांत खुद्द लोकांवर विशेष भिस्त टाकून ग्रामांत उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा पूर्ण उपयोग करून समाजांतील सर्व थरांस उत्साहित व कार्यान्वित करून विकास समसमाजनिर्मितीच्या दृष्टीने घडवून आणण्याबाबत कोठेच विचार व कार्य आज झालेलें नाहीं. मुद्दा एवढाच की, हें कार्य ग्रामदानाची घोषणा झाली व कार्यकर्त्यांच्या मनाची तयारी झाली म्हणून झालें, अशा प्रकारचें नाही. ग्रामदान कार्यकर्त्यांनी प्रथम आजच्या पडलेल्या चाकोरींत कार्य कसें होतें हें पूर्ण समजावून अनुभविलें पाहिजे. नंतर सतत निरनिराळे प्रयोग करून, खोल विचार करून आपल्या दृष्टिकोनांतून, विशिष्ट कार्यपद्धतीचा अवलंब करून विकासकार्यास अभिनव फलदायी वळण कसें लावतां येईल हें हळूहळू सिद्ध केलें पाहिजे. पण हें करावयाचें तर अनेक सुजाण कार्यकर्त्यांचा मोठी साखळी निर्माण करून ती वर्षानुवर्षें कार्यान्वित केली पाहिजे व हें सर्व होत असतांना लोकांचा मूळचा उत्साह व विश्वास हीं टिकविलीं पाहिजेत.

हें आज होतांना दिसत नाहीं. यास अनेक कारणें आहेत. माणसांची वाण हें तर एक मुख्य कारण आहेच; परंतु कांही भरीव विधायक कार्य करण्याची संधि आहे असें दिसून आल्यास पुरेसे नाहीत तरी आजच्यापेक्षा पुष्कळ अधिक कार्यकर्ते मिळूं शकावेत. ग्रामदान कार्यकर्त्यांत कांहीजण पुढील कार्याबाबत कांहीच जबाबदारी पत्करावयास तयार नाहीत. शिवाय जे विधायक कार्य करूं इच्छितात त्यांतहि मार्ग व साधनें यांबद्दल मतभेद आहेत. काम करण्याकरिता संघटना निर्माण करण्याचें कारण नाही, सर्व दृष्टीने तंत्रमुक्ति झाली पाहिजे, हा आग्रह मोठ्यांचा आहे. टिकाऊ संघटने-

शिवाय विधायक कार्य सतत होत राहिलें तर उत्तमच. पण जोंवर हें कसें होऊं शकतें तें कोणी प्रत्यक्ष कृतीने दाखविलें नाहीं तोंवर या आग्रहाच्या योगें केवळ विलंब लागतो, कार्याची उत्कृष्ट संधि फुकट जाते, असें म्हणणें प्राप्त आहे. सरकारी अधिकाऱ्यांशीं संबंध काय ठेवायचे, सहकारी कायद्यान्वये प्राथमिक मंडळें स्थापावयाचीं किंवा नाही, याबाबतच्या किरकोळ वादांत सुरुवातीचा फार मोलाचा व मोक्याचा वेळ कोरापुटमध्ये वाया गेला. किरकोळ म्हणण्याचें कारण असें की, गेल्या कांही महिन्यांत पूर्ण पलट खाऊन, सरकारशीं सहकार्य व सरकारी नियमान्वये कारभार करावयाचा, एवढेंच नाही तर पुढील बहुतेक सर्व कारभार सरकारी यंत्रणेवरच सोपवावा, असा निर्णय घेण्यांत आला आहे. एका दृष्टीने या निर्णयामुळे भावी क्रांतीच्या दृष्टीने ग्रामदानाचा विचारच करण्याचें कारण उरत नाही. ग्रामदानांत प्रथम वाटपापासून सुरुवात करून हळूहळू पूर्णपणें समताशील व प्रगत समाज निर्माण करणें, सतत विधायक प्रयत्न या दिशेने होत राहिले तर संभाव्य आहे, असें माझें मत आहे. परंतु ग्रामदान कार्यकर्त्यांनी फक्त प्रचार करावयाचा, कांही थोड्या केंद्रांत सहकारी संस्था उभारावयाच्या, इतरत्र सर्व सरकारी यंत्रणेवर– त्यांतल्या त्यांत दिल्लीहून चालविल्या जाणाऱ्या यंत्रणेवर–सोपवावयाचें तर, इतर विकास योजनांच्या पद्धतीने व साधारणपणें त्यांच्याच वेगाने ग्रामदान खेड्यांतील भविष्य प्रगति होणार, त्यांत क्रांतिकारक व अभिनवहि कांही राहणार नाही, हें उघड आहे. तंत्रमुक्तीवर भर देऊन सहकारी संस्था प्रचलित कायद्यानुसार उभारणें व नोंदणें यांसहि हरकत घेतां घेतां सरकारी यंत्रणेंत सर्व महत्त्वाचें कार्य विलीन करण्याचा निर्णय ग्रामदान-कार्यकर्त्यांनीहि घ्यावा, ही गोष्ट खेदाची व देशाच्या भविष्याच्या दृष्टीने निराशा, निदान निरुत्साहजनक मानली पाहिजे यांत शंका नाही. तार्किक अव्यवहार्य सिद्धान्त प्रत्यक्ष व्यावहारिक प्रगतीस कसे मारक ठरतात याचें हें उत्कृष्ट उदाहरण समजावयास हरकत नाही.

विनोबांच्या पदयात्रेच्या कालांत महाराष्ट्रास अश्रद्धावान् ठरवून चिकित्सक विचार अवहेलण्याच्या अविवेकी विचाराने पुन्हा डोकें वर काढलेलें दिसतें. खरी गोष्ट अशी आहे की, सद्बुद्धीने चिकित्सा करणें, प्रश्न विचारणें हें आस्तिक्यबुद्धीचें लक्षण आहे, नास्तिक्यबुद्धीचें नाही. अंतीं, सुसंगत विचार

व अनुरूप आचार या कसोट्या संतांनाहि जग लावतें. आधी केलें मग सांगितलें, हें नसलें तरी निदान सांगितल्यावर करून दाखवायचा प्रयत्न करणें आवश्यक आहे, ही गोष्ट व्यक्ति व समाजपरिवर्तनाबद्दल बोलणाऱ्यांनी लक्षांत ठेवली पाहिजे. सर्वोदयवाद्यांच्या मानव व मानवसमाजाबद्दलच्या अपेक्षा फार मोठ्या; परंतु त्यांच्यांतले जे अनेक प्रत्यक्ष राजकारणांत व व्यवहारांत उतरले, त्यांतील जवळ जवळ सगळ्यांचें वर्तन अगदी प्राकृत-जनांसारखें दिसून आलें. विनोबांची गोष्ट निराळी, म्हणून संत विनोबांना सर्वत्र मान आहे. पण जेव्हा ते पुढे जाऊन क्रांतीबद्दल बोलतात, स्वतःला क्रांति-कारक म्हणवितात तेव्हा या क्रांतीचें उद्दिष्ट, तिचे मार्ग व त्यांची व्यवहार्यता यांचा चिकित्सक दृष्टीने विचार करणें प्राप्त होतें, कर्तव्य ठरतें. क्रांतिकारी विनोबांना प्रश्न विचारले म्हणून संत विनोबांचें अवमूल्यन केलें असें कोणीच मानण्याचें कारण नाही. यांत फक्त शुद्ध विचार करणें व डोळसपणें वर्तणें याची परंपरागत जबाबदारी आम्ही पार पाडींत आहोंत एवढेंच समजावयाचें.

एरंडवणें<br>पुणें ४<br>५-९-५८.

—ध. रा. गाडगीळ

१

# नव्या तीर्थक्षेत्राच्या शोधांत

पंडित नेहरू यांनी भाक्रा-नानगल धरणाचें उद्घाटन केलें तेव्हा यापुढे आपलीं नवीं तीर्थक्षेत्रें म्हणजे कोटयवधि एकर जमीन 'सुजलाम् सुफलाम्' करणाऱ्या प्रचंड धरण-योजना किंवा देशाच्या औद्योगीकरणाचा पाया घालणारे पोलाद कारखाने हीं झालीं पाहिजेत, या क्षेत्रांत येऊन देशाच्या कोटयवधि अर्धनग्न व उपाशी जनतेला दारिद्र्याच्या खाईंतून वर ओढून आर्थिक संपन्नतेच्या शिखरावर नेऊन बसविण्याच्या प्रतिज्ञा आपण घेतल्या पाहिजेत, या तीर्थस्थानांतून नवे संकल्प आणि नव्या उत्साहाचे वारे पिऊन आपापल्या स्थानिक कार्यक्षेत्रांत त्याचा संचार करण्यास तरुण पिढीने बद्धपरिकर झाले पाहिजे— अशा स्वरूपाचे क्रांतिकारक विचार प्रदर्शित केले. खरोखरच आजच्या परिस्थितींत हे विचार क्रांतिकारक व मौलिक स्वरूपाचे आहेत यांत शंका नाही. साधुसंतांनी 'जे का रंजले गांजले' त्यांना आपले म्हटलें, दीनहीन-पतितांना मायेने जवळ केलें हें खरें; परंतु यंत्रयुगाच्या आगमनामुळे समाजांत रंजले-गांजलेले दीनहीन यांचें अस्तित्वच शिल्लक राहूं नये, अशी शक्यता निर्माण झाली असतां, साधुसंतांच्या नांवावर चालत आलेल्या जुन्या परंपरा तशाच आंधळेपणाने पुढे चालविण्यांत काय अर्थ आहे, याचा खरोखरच सर्वांनी विचार केला पाहिजे. लोकांचा दुःखभार हलका करण्यासाठी जेव्हा 'भूतदये'पेक्षा अधिक प्रभावी साधन अस्तित्वांत नव्हतें तेव्हा संतांचें अनुकरण सर्वांनी करणें ठीक होतें; परंतु वैज्ञानिक प्रगतीमुळे मानवी जीवन सुखी करण्याचा राज-

मार्ग आता सर्वांना मोकळा झाला आहे. या राजमार्गावरून सारें जग भरधाव वेगाने चालत असतां भारतीय जनतेने आपल्या पुराणश्रद्धांना चिकटून बसावें, हें पंडितजींसारख्या पुरोगामी नेत्याला कसें रुचणार ? म्हणूनच त्यांनी वैज्ञानिक प्रगतीची साक्ष असणाऱ्या नव्या 'तीर्थक्षेत्रां 'कडे तरुणपिढीचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

परंतु वैज्ञानिक प्रगतीचें मोल समजण्याऱ्या सुशिक्षितवर्गानेहि पंडितजींच्या आवाहनाकडे फारसें लक्ष दिलेलें दिसत नाही. जुनीं तीर्थक्षेत्रें जरी आज श्रद्धेचा विषय उरलीं नसलीं तरी पंडितजींच्या नव्या तीर्थक्षेत्रांवरहि लोकांची 'श्रद्धा' बसेल हा संभव कमी आहे. भाक्रा-नानगल काय किंवा भिलाई—दुर्गापूर काय, अद्याप तरी हीं आमचीं तीर्थक्षेत्रें झालेलीं नाहींत. आज शतकानुशतकें उन्हातान्हांतून, चोरा-चिलटांच्या आणि रोगराईच्या टांगत्या संकटांतून भारताची भुकेली अर्धनग्न जनता काशी-रामेश्वरच्या यात्रा करीत आहे. या गाढ श्रद्धेच्या एक-शतांश काय सहस्रांश श्रद्धा तरी आज भाक्रा-नानगल किंवा भिलाई या ठिकाणीं जाणाऱ्या प्रवाशांमध्यें दिसून येते का ? भाक्रा-नानगलच्या त्या प्रचंड भिंती किंवा भिलाई येथे उभारण्यांत येत असलेलीं अजस्र यांत्रिक अवजारें पाहून मन क्षणभर स्तिमित होतें, स्तंभित होतें. परंतु हा अवाढव्य पसारा मनांत कसलीहि पूज्यबुद्धि निर्माण करूं शकत नाही. हा पसारा उभा करणारीं माणसें ज्या प्रेरणा उराशीं बाळगून कामें करीत आहेत, त्यांवर या स्थानांचें 'माहात्म्य' अवलंबून राहणार; या प्रेरणा जितक्या भव्य, उदात्त आणि उदार असतील तेवढें हें स्थान अधिकाधिक स्फूर्तिप्रद होणार, हें उघड आहे. परंतु या 'नव्या तीर्थक्षेत्रां'त या प्रेरणांचें अस्तित्व दिसत नाही. येथे काम करणारीं माणसें तुमच्या-आमच्यासारखीं सर्वसामान्य 'पोटार्थी' आहेत. येथे सरकारी अधिकारी आहेत, दलाल आहेत, ठेकेदार आहेत, यंत्रज्ञ आणि तंत्रज्ञ आहेत, कारकून आहेत, हमाल आहेत. कोणी दोन रुपये

अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक

रोजावर असेल तर कोणाला महिन्याला दोनों हजार रुपये मिळत असतील. परंतु हा फरक वरवरचा आहे. या साऱ्यांच्या ‘नैतिक प्रेरणा’ एकाच पातळीवरच्या आहेत. आणि ‘तीर्थक्षेत्र’ हें श्रेष्ठ नैतिक प्रेरणां-मुळे निर्माण होत असतें. भौतिक श्रेष्ठतेमुळे कुठल्याहि स्थानाला तीर्थाचें स्वरूप येत नाही. मक्केच्या दगडाला जें महत्त्व आहे तें ताजमहालच्या जगद्विख्यात कलाकुसरीला नाही. दक्षिणेश्वरच्या आश्रमांतील एखाद्या वठलेल्या झाडांतदेखील मानवी हृदय कंपित करून तेथे उदात्त भावनांच्या लहरी निर्माण करण्याचें जें सामर्थ्य आजहि आहे तें भाक्रा-नानगलच्या जगड्व्याळ पसाऱ्यांत कोठेहि नाही. कारण तें झाड पाहतांक्षणीं आपल्या अनंत स्मृति जाग्या होऊन उठतात. वाटतें, येथे आमचे रामकृष्ण या विश्वाच्या बुडाशीं असणाऱ्या चैतन्याचा कुंभ हस्तगत व्हावा म्हणून वाळवंटांतील एखाद्या माशाप्रमाणे अहोरात्र तडफडत होते. वरचा ओठ उंच आकाशाला भिडला आहे, खालच्या ओठांनी सप्त-पाताळांना स्पर्श केला आहे, त्रिभुवनें या विस्फारित ‘आ’कारांत सामावलीं आहेत आणि हृदयाच्या खोल गाभाऱ्यांतून ‘मा-मा-मा’ हा ध्वनि उमटत आहे — जगन्मातेच्या दर्शनाची ही तीव्र ओढ आणि तिचा साक्षात्कार या दैवी घटना याच वठलेल्या वृक्षाखाली किंवा त्याच्या आसपास कुठेतरी घडलेल्या आहेत. त्या ईश्वरप्रमत्त परमहंसाच्या वास्तव्याने येथील जमीन, हवा, पाणी सारें पुनीत झालें आहे. तो वृक्ष, ती जमीन, तें देवालय परमहंसांची स्मृति जागी करतात आणि म्हणूनच येथे आल्यावर आपोआप पायांचा ताठरपणा जातो, हात न कळत वर उचलले जातात, मस्तक विनम्र होतें, मन सश्रद्ध होतें, आणि वाणी प्रसादाची याचना करते.

हळदीघाटासारखें एखादें समरांगण पाहतांनाहि मनाची अशीच श्रद्धासंकुल अवस्था होते. चितोडचे भग्नावशेष पाहतांनाहि ते पतिव्रतांचे जोहार आठवतात, राणा प्रतापाचा वनवास आठवतो. रायगडावरील

छत्रपतींच्या निष्ठावंत कुत्र्याची समाधि पाहत असतांना जें भावनांचें स्पंदन होतें तें कांही तेथील विस्तीर्ण तलाव किंवा प्रचंड कोठारघरें पाहतांना होत नाही. धारातीर्थें किंवा पूजास्थानें केवळ प्रचंड बांध-कामांनी निर्माण होत नसतात. बांधकामें नंतर उभारलीं जातात. प्रथम तेथे उदात्त प्रेरणा उत्पन्न व्हाव्या लागतात. कसलींतरी भव्य स्वप्नें उराशीं बाळगून माणसें तेथे आपलें रक्त सांडीत असतात. आपले देह चंदनकाष्ठाप्रमाणे झिजवून घेत असतात. यांतूनच पुढे एखादी गया, काशी वा चितोडगड निर्माण होत असतो.

म्हणून जेथे कांही उदात्त प्रेरणा कार्य करीत असतील, कांही श्रद्धा उराशीं बाळगून माणसें वावरत असतील, तेथे जावें, आणि कांही स्फूर्तिकण साठवून आणावेत, अशी माझी दृष्टि असते. अशा क्षेत्रांच्या शोधांत मी नेहमीच असतो. नवनिर्मितीचा असा कुठलाहि प्रयोग माझें मन आकर्षून घेतो. गेलीं पांच-सहा वर्षें भूदान-ग्रामदान या कल्पना उराशीं बाळगून ध्येयवादी कार्यकर्त्यांचे पुंज देशभर परिक्रमा करीत आहेत. कांही विचार, कांही नव्या धारणा ते समाजांत निर्माण करीत आहेत. समाजाच्या तळाला स्पर्श करून आंदोलनाच्या कांही लहरी त्यांनी वातावरणांत उत्पन्न केल्या आहेत. कुठेतरी जाऊन हें कार्य सावकाश पाहावें, त्यांतील संग्रहणीय असेल तें टिपून घ्यावें, वाईट असेल त्यामागची कारणपरंपरा पाहावी, असे विचार मनांत बरेच दिवस घोळत होते. जुन्या तीर्थस्थानांबद्दल आकर्षण नाही. श्रेष्ठ नैतिक प्रेरणा व वैज्ञानिक निष्ठा यांच्या संगमांतून निर्माण होणारीं नवीं तीर्थस्थानें अद्याप उदयास आलीं नाहीत. अशा अवस्थेंत जेथे कांही प्रमाणांत तरी दर्शनोत्सुक मनाचें समाधान होईल तेथे जावें, एवढाच मार्ग शिल्लक उरतो.

अशा मनःस्थितींत असतांना एका प्रख्यात भूदान कार्यकर्त्यानें ‘ कोरापुट ’ हें नांव सुचविलें. ‘ तें आमचें मॉस्को आहे ’ असेंहि विनोदाने त्यांनी सांगून टाकलें. “ लोकतंत्राचा एक अभिनव प्रयोग तेथे

चालू आहे. अद्याप तेथील परिस्थिति गर्भावस्थेंत असली तरी फार मोठ्या अपेक्षा या प्रयोगाबाबात आम्ही उराशीं बाळगून आहोंत. भारतांत लोकतंत्र रुजायची जी कांही थोडीफार आशा आज शिल्लक राहिली आहे ती कोरापुटसारख्या प्रयोगांमुळेच आहे. जरूर पाहून या हा प्रयोग एकदा—" त्यांनी आग्रहाने सुचविलें.

आणि अधिक विचार करण्यांत वेळ न घालवितां ग्रामदानाच्या या प्रयोगभूमीकडे मोठ्या उत्साहाने मी निघालों.

* * *



## २

# ग्रामदानाची सोपानपरंपरा

परंतु प्रयोगभूमीवर दाखल होण्यापूर्वी 'ग्रामदाना'ची वैचारिक पार्श्वभूमि ध्यानांत घेणें अवश्य आहे. हें आंदोलन कोणत्या परिस्थितींत निर्माण झालें, त्याला कसकशीं वळणें मिळत गेलीं, आंदोलनाच्या प्रवर्तकांना प्रचलित परिस्थितींत कोणतें परिवर्तन घडून यावें असें वाटतें, त्यासाठी त्यांनी कोणता कार्यक्रम निश्चित केला आहे, याची ढोबळ रूपरेषा डोळ्यासमोर असल्याखेरीज प्रयोगाचें बाह्यांग समजलें तरी अंतरंग समजणार नाही. तेव्हा थोडा या पार्श्वभूमीवर दृष्टिक्षेप टाकूं.

ग्रामदानाची कल्पना भूदानांतून विकास पावली हें खरें आहे. पण भूदान आणि ग्रामदान यांत स्पष्ट भेद केल्याशिवाय ग्रामदानाचें महत्त्व नीटसें ध्यानांत येणार नाही. भूदानाचा उगम तेलंगणांत १९५१ च्या एप्रिल महिन्यांत पोचमपल्ली या गावीं झाला. तेलंगणानंतर विनोबांची पदयात्रा मध्यप्रदेशांतून दिल्लीला गेली. तेथून उत्तर प्रदेशांत त्यांचा प्रवेश झाला. त्यानंतर बिहारमध्ये त्यांनी सत्तावीस महिने काढले आणि ओरिसांत प्रवेश करण्यापूर्वी तीन आठवडे त्यांनी पश्चिम बंगालमधील बांकुडा आणि मेदिनीपूर जिल्ह्यांतहि पदयात्रा केली. २६ जानेवारी १९५५ या दिवशीं त्यांनी ओरिसाच्या भूमीवर पाऊल ठेवलें. या साडेतीन-चार वर्षांच्या कालावधींत भूदान आंदोलनाचे तीन टप्पे अगदी स्पष्ट दिसतात.

बिहारमधील पदयात्रा पूर्ण होईपर्यंत विनोबा प्रामुख्याने केवळ जमीन मागत होते. भूमिहीनांना भूमि प्राप्त करून देणें हें ध्येय त्यांनी व

त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांनी या कालावधींत प्रामुख्याने आपल्या नजरेसमोर ठेवलें असावें असें वाटतें. यासाठी सेवापुरी व गया येथील सर्वोदय संमेलनांत कांही एकरांचे संकल्पहि सोडण्यांत आले. हिंदुस्थानांत एकूण पांच कोटी भूमिहीन आहेत व प्रत्येकाला निदान एक एकर तरी जमीन मिळाली पाहिजे, या हिशोबाने पांच कोटी एकरांचा संकल्प १९५४ च्या गया येथील संमेलनांत सोडला गेला व हा संकल्प १९५७ च्या आंत पूर्ण करावा, असेंहि निश्चित करण्यांत आलें. या पांच कोटी एकरांच्या मागे दुसरेंहि एक गणित होतें. हिंदुस्थानांत शेतीयोग्य असलेल्या एकूण तीस कोटी एकर जमिनीचा एक-षष्ठांश हिस्सा जमीन भूदानांत प्राप्त करून घेतली तर हा पांच कोटींचा आकडा पूर्ण होतो. म्हणून विशेषतः बिहारपासून विनोबांनी हा एक-षष्ठांश हिस्सा मागण्यास सुरुवात केली. बिहारमध्ये या संकल्पाला यापेक्षाहि अधिक निश्चित स्वरूप देण्यांत आलें. या संकल्पासंबधी श्री. चारुचंद्र भंडारी 'भूदान यज्ञ समग्र दर्शन' या आपल्या पुस्तकांत लिहितात—

"बिहारची भूमिसमस्या पूर्ण सुटल्याशिवाय आपण बिहार सोडणार नाही, असा विनोबांनी संकल्प केला आणि बिहारमधून शेतीला योग्य अशा जमिनींतला एक-षष्ठांश म्हणजे ३२ लक्ष एकर जमिनीची बिहारकडून मागणी केली. विनोबांच्या या संकल्पामागे एक युक्तिवाद होता, तो समजून घेणें जरूर आहे. त्यासंबंधी विनोबांनी म्हटलें आहे, 'आपण जमिनीचा प्रश्न जर सोडवूं शकलों तर आपल्या विचारांत क्रांति घडून येईल. याकरिता मी सर्व भारतांत फिरत आहें. आणि त्याप्रमाणे दुसरेहि कित्येक लोक फिरत आहेत. परंतु मला असा अनुभव येत आहे की, एका प्रदेशांत त्याचा व्यापक रीतीने प्रयोग करून हा प्रश्न कसा सुटेल हें प्रत्यक्ष दाखविणें आवश्यक आहे. म्हणून बिहारकडून मी ३२ लक्ष एकर जमिनीची मागणी करीत आहें.' शिवाय तोच युक्तिवाद पुढे चालवून प्रदेशांतल्या एखाद्या जिल्ह्यांत आपली सर्व

शक्ति एकवटून कार्य करणें आवश्यक आहे. भगवान् बुद्धाची ही विहारभूमि म्हणून गया जिल्हा याकरिता **आत्यंतिक** आणि **केंद्रीभूत** कार्य करण्याकरिता निवडला गेला. बिहारमध्ये ज्या प्रकारची जमीन आहे ते सर्व प्रकार गया जिल्ह्यांत आहेत. सपाट जमीन आहे, उंच-नीच डोंगराळ जमीन आहे, जंगल आहे, वाळवंट आहे, कंकरमय आहे. अशी सर्व प्रकारची जमीन गया जिल्ह्यांत आहे. खूप किंमतवान जमीन आहे तशीच अगदी निकृष्ट, कमी किमतीचीहि जमीन आहे. म्हणून जमिनीच्या दृष्टीने गया जिल्हा बिहारचा प्रातिनिधिक स्वरूप समजायला हरकत नाही. गया जिल्ह्यावर लक्ष केंद्रित करून ठोस कामाकरिता तो निवडण्याचें हेंहि मुख्य कारण होतें." (पृ. ३७).

यावरून भूमिहीनांना जमीन मिळवून देऊन भारताच्या भूमिसमस्येची उकल व सोडवणूक करण्याचा निश्चित कार्यक्रम या कालावधींत विनोबांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या नजरेसमोर ठेवला होता हें स्पष्ट होतें. भूदान आंदोलनाचा हा पहिला टप्पा समजायला हरकत नाही.

परंतु बिहारमध्ये असतांनाच विनोबांच्या व्याख्यानांतून दुसराहि सूर अधिक जोरांत निघूं लागला. प्रथम तो मुळीच नव्हता असें नाही. परंतु त्यावर विशेष भर दिलेला दिसत नाही. हा नवा सूर म्हणजे 'धर्मचक्रप्रवर्तना'चा. बिहारमधील कांही व्याख्यानांत विनोबांच्या वाणीला एखाद्या प्रेषिताची विलक्षण धार चढल्याचा भास होतो, तोहि या 'भूमिकेच्या संक्रमणा' चा परिणाम असावा असें वाटतें.

पुढे तीन उतारे दिले आहेत. त्यांत हळूहळू 'दृश्य परिवर्तनाचा व्यावहारिक दृष्टिकोन' सुटून त्यामागच्या 'धर्मविचारा'ला कसकसें प्राधान्य मिळत गेलें याचें दर्शन घडतें.

लोकांच्या भूतदयेला आवाहन करून केवळ भूमिहीनांना जमीन देणें एवढाच भूदानाचा अर्थ नसून ती एक 'पर्यायी क्रांति' आहे, कम्युनिस्ट क्रांतीला तें एक उत्तर आहे, असें प्रतिपादन पहिल्या उताऱ्यांत

करण्यांत आलें आहे. आचारापेक्षा विचारावर भर देण्याची ही पहिली पायरी आहे.

'कम्युनिस्ट लोकांचें म्हणणें आहे की, भूदानामुळे क्रांति थांबेल. पण क्रांति कशाशीं खातात, ह्याचें ज्ञान त्यांना नाही. सर्व देशांत क्रांति एकाच प्रकाराने होत नाही. हे लोक पुस्तकें वाचून सांगतात की, मार्क्सने जें शास्त्र बनविलें आहे, त्यालाच अनुसरून क्रांति होईल. मी त्यांना असें सांगूं इच्छितों की, हिंदुस्थानांत क्रांति कोणत्या पद्धतीने होईल हें त्यांच्यापेक्षा मी अधिक चांगलें जाणतों. मी वेदांपासून गांधीं-पर्यंतच्या सर्व विचारसरणींचें अध्ययन केलें आहे. हिंदुस्थानांत आत्म्याचें ज्ञान प्राचीन काळापासून चालत आले आहे. वेदान्त समजावून घेतल्याखेरीज येथे कोणच्याहि प्रकारची क्रांति होऊं शकत नाही. तुम्ही जर आत्म्याचे तुकडे कराल, वर्ग निर्माण कराल, कटुता व द्वेष पसरवाल, तर त्याने येथे क्रांति होणार नाही.

केवळ भूतदयेने दिलेलें दान मी घेऊं इच्छीत नाहीं. आम्हांला विचार द्यावयाचा आहे व माती घ्यावयाची आहे. दानाच्या मागचा विचार न समजतां तुम्हीं दान दिलें तर लाख वर्षांतहि हें काम पूर्ण होणार नाही. पण नीट विचार समजावून घेतलात, तर तुम्ही सर्वस्व अर्पण करण्यास तयार व्हाल. असें सर्वस्व अर्पण करणारे त्यागी हिंदुस्थानांत निघाले आहेत. येथे त्यागाचें नांव ऐकतांच लोकांच्या हृदयांत उत्साहाचा संचार होतो. म्हणून येथे जी क्रांति होईल ती त्यागाच्या पायावर व त्यागद्वाराच होईल." दुर्गावती (बिहार), १४-९-१९५२.

दुसऱ्या परिच्छेदांत ही 'क्रांति' कोणतें दृश्य स्वरूप धारण करील, यासंबंधी दिग्दर्शन आहे. परंतु जमीन प्राप्त करण्यापेक्षा जमिनीवरील मालकी हक्क विसर्जित करण्यासाठी लोकांचीं मनें तयार करणें, यावर अधिक भर दिलेला आहे. एकरांचे संकल्प किंवा बिहारमधील भू-समस्येची उकल हीं व्यावहारिक पातळीवरचीं उद्दिष्टें येथे जवळजवळ सुटलीं आहेत.

" भूमि ही सर्वांची माता आहे. मी दोन गोष्टी करूं इच्छितों :–

( १ ) सत्संगतीचा महिमा वाढविणें. त्यामुळे वातावरण तयार होऊन विचारप्रचार होईल. ( २ ) समाजांतील जमिनीची मालकी नष्ट करणें. जमीन सर्व गावची बनावी अशी माझी इच्छा आहे. बिहारमध्ये पाय ठेवल्याबरोबर दोन गोष्टी मी शिकलों. एक कांही लोकांकडून जमीन प्राप्त करून वातावरण तयार करणें व दुसरी जमिनीची मालकी सोडण्यासाठी सर्व लोकांची तयारी करणे. अशाप्रकारें हें रस्ता बनविण्याचें व बैलाला ताब्यांत ठेवण्याचें काम आहे.

माझी अशी इच्छा आहे कीं, सर्वांनी भक्त बनावें. भक्तांचीं तीन लक्षणें सर्व समाजांत प्रगट व्हावीं. म्हणजेच समाजांत मोठयांबद्दल आदर, बरोबरीच्यांबद्दल मैत्री व छोटयांबद्दल करुणा अशा भावना असतील अशी समाजरचना निर्माण करावी. आदर, मैत्री, करुणा ह्या भावना समाजांत स्वाभाविक व्हाव्यात. हें सर्व शिक्षणाने करावयाचें आहे. तुम्ही मला जमीन देतां तेव्हा माझी विचारसरणी मान्य करतां. 'तूं कोण मागणारा' असा सवाल मला कोणी करीत नाही. जमीन तुमच्याजवळ आहे. पण ती तुमची नाही हा विचार मी तुम्हांला समजावून सांगतों. ती तुमच्याजवळ सर्वांसाठी आलेली आहे. अशाप्रकारें हजारो–लाखो लोकांना हा विचार मान्य झाला की, कायदा होईल व समाजरचनेंत बदल होऊन जाईल. हाच आमचा भक्तिमार्ग आहे."

शीतलपूर ( बिहार ) २१-१०-५२.

तिसऱ्या परिच्छेदांत 'धर्मचक्रप्रवर्तना'वरच भर देण्यांत आला असून व्यावहारिक जबाबदारीचा त्यांत उल्लेख नाही. भूमीचा प्रश्न हें केवळ प्रचारसाधन असून तो सुटेल किंवा सुटणारहि नाही. त्यामागील मूलभूत विचार समाजांत स्थिर करणें हाच या पदयात्रेचा मुख्य उद्देश म्हणून सांगण्यांत आला आहे.

"मीं सध्या हातीं घेतलेल्या कामाचें बाह्य रूप जमिनीचा प्रश्न

सोडविणें असें दिसतें. पण त्याच्या पाठीशीं एक विचार आहे. त्याच्या प्रवर्तनासाठी मीं हें एक बाह्य काम घेतलेले आहे. बाह्य कामाखेरीज विचार निर्गुण व निराकार राहतो. विचाराच्या प्रचारासाठी व त्याच्या प्रकाशनासाठी असें बाह्य काम घेणें आवश्यक असतें. ह्याच कारणाने हिंदुस्थानच्या दृष्टीने आवश्यक असलेला प्रश्न हातीं घेऊन त्या विचाराच्या प्रचारार्थ मी बाहेर पडलों आहें. मीं पुष्कळदा म्हटलें आहे की, भगवान् बुद्धांनी जसें 'धर्मचक्रप्रवर्तन' केलें तसेंच मीहि त्यांच्या पावलावर पावलें टाकून करीत आहें. ह्या विचाराचें नांव "सर्वोदय."

डाल्टनगंज (पलामू) १६. ११. ५२.

भूदान आंदोलनाचा दुसरा टप्पा येथे संपतो. या ठिकाणीं आंदोलनांत एक अंतर्विरोध निर्माण होतो असें वाटतें. पहिला 'भूमिहीनांना जमीन मिळवून देण्याचा व्यावहारिक कार्यक्रम' आणि हें 'धर्मचक्र-प्रवर्तन' यांचा मेळ नीट बसत नाही. कारण पहिल्या कार्यक्रमाला 'क्रांतिकारक' स्वरूप नाही. हा कार्यक्रम भूतदयेवरच मुख्यत: आधारलेला असल्याने जरी पांच कोटी एकरांचे संकल्प पूर्ण झाले असते........ होण्याची शक्यताहि फारशी नव्हती[१]—तरी त्यामुळे खेड्यांतील जमीनदारांच्या हातीं असलेल्या सत्तेला कांहीच धक्का बसला नसता. आणि म्हणून 'पर्यायी क्रांति' म्हणून हें आंदोलन खडें राहूं शकलें नसतें. 'धर्मचक्र-प्रवर्तनांत' 'मालकी हक्काचें विसर्जन' हा क्रांतिकारक आशय आहे. कम्युनिस्टहि मालकी हक्क नष्ट करूं इच्छितात. आज

---

[१] भारतांत आतापर्यंत भूदानांत एकुण ४०८१८७८ एकर जमीन प्राप्त झाली असून त्यापैकी ६५४६४१ एकर भूमीचें वितरण करण्यांत आलें आहे, अशी आकडेवारी पंढरपूर येथील मे १९५८ च्या सर्वोदय संमेलनांत सर्व-सेवासंघाच्या कार्यालयाने प्रसिद्ध केली (तरुण भारत,पुणें आवृत्ति. ३.६.१९५८)

चाळीस लाखांपैकी फक्त सहा लाख एकर जमीन वाटली गेली यावरून बाकीची बहुधा पुष्कळांशी पडीक असावी, असा संशय येतो.

कालप्रवाहहि याच दिशेने वाहत आहे. परंतु तें भारतीय जनतेला पुराणकालापासून ज्ञात व परिचित असलेल्या आध्यात्मिक व धार्मिक पायावरून करण्याचा विनोबांचा प्रयत्न असल्याने त्यांनी या ‘स्वामित्व-विसर्जनाला’ ‘धर्मचक्र-प्रवर्तन’ म्हटलें. सर्वसामान्य धर्मप्रचार आणि हें प्रवर्तन यांत येथेच फरक पडतो. चोरी करूं नये, खोटें बोलूं नये, हा धर्मप्रचाराचा विषय झाला. दोनशे वर्षांपूर्वी ‘संपत्तीचा संग्रह करूं नये’ हाहि धर्मप्रचाराचाच भाग झाला असता. परंतु आज ‘संग्रहाचें विसर्जन’ व तें नित्य व चिरस्थायी व्हावें म्हणून स्वामित्वाच्या भावनेचा लोप हें ‘धर्मचक्र-प्रवर्तन’ होतें. कालाची ती मागणी आहे. थोडक्यांत म्हणजे धर्मप्रचार + युगधर्म यांच्या संगमांतून धर्मचक्र-प्रवर्तन होतें.

एवढें वजन पेलण्यास भूदानाचा पाया फार ठिसूळ होता. म्हणून जसजसा हा ‘स्वामित्वविसर्जना’चा भाग पुढे येऊं लागला तसतसा तो बिहारसाठी निश्चित केलेला कार्यक्रम, ते पांच कोटींचे संकल्प आपोआप मागे पडत चालले. एक तर नवा कार्यक्रम हवा होता; नाहीतर केवळ ‘विचार-प्रचारा’वरच समाधान मानून स्वस्थ बसण्याची तयारी हवी होती. सुदैवाने हा कार्यक्रम पुढे आला. तो म्हणजेच ‘ग्रामदान’. स्वामित्वविसर्जन व्यावहारिक पातळीवर उतरण्याची शक्यता फक्त ग्रामदानामुळेच उद्‍भवली. म्हणूनच भूदान व ग्रामदान यांत स्पष्ट भेद करणें अवश्य आहे. भूदान हा भूतदयेचा आविष्कार आहे तर ग्रामदान हा क्रांतीचा पाया आहे.

विनोबा ग्रामदानाची पार्श्वभूमि थोडी वेगळी मांडतात. ‘आंदोलना’-ऐवजीं ‘आरोहण’ हा शब्दप्रयोग करण्यांत त्यांची वेगळी भूमिका प्रतीत होते. त्यांनी ग्रामदानापर्यंत या आरोहणाच्या पांच पायऱ्या मानल्या आहेत. तेलंगणांतील भूदान हें केवळ स्थानिक दुःखनिवारणा-पुरतें होतें म्हणून या अवस्थेला त्यांनीं ‘अशांति-शमन’ हें नांव दिलें आहे. हें आंदोलन सर्व देशांत पसरलें तेव्हा व्यापक सद्‍भावना जागृत

होऊन सर्वांचें लक्ष त्याकडे आकर्षित झालें. येथे 'ध्यानाकर्षण' ही दुसरी पायरी त्यांनी मांडली. त्यानंतर उत्तर-प्रदेशांत पांच लाख व सबंध भारतांत पंचवीस लाख एकर भूमि प्राप्त करण्याचा लहानसा संकल्प सोडण्यांत आला व तो पारहि पडला. यामुळे कार्यकर्त्यांत आत्मविश्वास निर्माण झाला व विनोबांनी या अवस्थेचें 'निष्ठानिर्माण' हें नामकरण केलें. त्यानंतर बिहारमध्ये सर्व जमिनीचा सहावा हिस्सा प्राप्त करणें आणि सर्व भूमिहीनांना जमीन देणें असा प्रयत्न झाला. परंतु जमिनीपेक्षा जवळ जवळ तीन लाख लोकांनीं दान दिलें, याला विनोबा अधिक महत्त्व देतात. अशी गोष्ट सार्वत्रिक होऊं शकते, अशी श्रद्धा लोकांच्या मनांत यामुळे निर्माण झाली म्हणून या पायरीला विनोबांनी 'व्यापक भूमिका' म्हणून संबोधिलें आहे. यानंतर गावाचें एक कुटुंबच बनविणें ही पांचवी भूमिका आहे. तिला विनोबांनी 'भूमिक्रांति' असें नांव दिलें आहे.

या साऱ्या भूमिकांचा उल्लेख करून विनोबा ओरिसा प्रांतांतील आपल्या सुरुवातीच्या एका मुक्कामांत म्हणतात, "भूदानयज्ञामध्ये एका-मागे एक अशा पांच पायऱ्या चढण्याची जी संधि मिळाली तिचा, मी तीस वर्षें ग्रामसेवेचें जें काम केलें तो, पाया म्हणून या जिल्ह्यांत असें काम होऊं शकतें असें जेव्हा मला दिसलें तेव्हा मीं माझा येथला मुक्काम आणखी वाढविला. सर्व हिंदुस्थानांतून सहाव्या हिश्शाची म्हणजे पांच कोटी एकर जमिनीची जी मागणी होती तिने देशांत फार मोठें काम होईल. परंतु येथे समग्र ग्रामदानाने जें काम होत आहे तें झालें नसतें तर पांच कोटी एकर जमीन मिळूनहि 'जनशक्ति' मिळविण्याकरिता आणखी कांही साधन शोधावें लागलें असतें. माझी पांच कोटी एकरांची मागणी अजूनहि कायम आहे आणि ती सर्व हिंदुस्थानांतल्या लोकांनी लौकरांत लौकर पूर्ण करावी, अशी माझी इच्छा आहे. असें जें काम होईल तें व्यापक होईल. पण ग्रामदानाने जें काम होत आहे तें 'खोल' काम

आहे. व्यापक कार्यहि केलेंच पाहिजे. त्याकरिता मीं चार वर्षें जितकी चालना देतां आली तितकी दिली आहे. यासंबंधी वेगवेगळ्या संस्था विचार करूं लागल्या आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. हा कोरापुट जिल्हा सर्व हिंदुस्थानला मार्गदर्शन करील असा मला विश्वास वाटतो."

डुमरीपदर, ३०-७-१९५५.

'आरोहण' या शब्दरचनेमुळे जरी कल्पनेच्या विकासाचा क्रम व्यक्त झाला असला तरी भूदानामुळे घडणारीं सामाजिक स्थित्यंतरें नजरेंत भरण्यासाठी वर सुचविलेले 'भूमिप्राप्ति' 'धर्मचक्र-प्रवर्तन' व 'ग्राम-दान' हे तीन टप्पे अधिक उपयोगी पडतील असें वाटतें. आरोहणाची कल्पना टेकडी चढून गेल्यावर मागे दृष्टिक्षेप टाकण्यासारखी मनाला समाधान देणारी आहे. या विहंगम दृष्टिक्षेपांत आपण कुठे अडखळलों, कुठे भलत्याच वाटेला लागलों, कुठे सोपी वाट चटकन सापडली, कुठे दोन वाटा फुटल्यामुळे भ्रम निर्माण झाला, कुठे पुढची वाट अजिबातच दिसेनाशी झाली, या गोष्टी ध्यानांत येत नाहीत. आणि नवीन आरोहकाला या माहितीचीच अधिक गरज असते. म्हणून या आंदोलनाकडे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनांतून पाहिल्यावर कोणती महत्त्वाचीं स्थित्यंतरें दिसून येतात तीं अधोरेखित करण्याचा वर प्रयत्न केला आहे. शेवटच्या 'ग्रामदान' या स्थित्यंतरांत दोन गोष्टी विनोबांनी आपल्यासमोर स्वच्छ ठेवल्या आहेत. 'अहिंसक जनशक्ति' आणि 'भूमिक्रांति' या त्या दोन गोष्टी होत. हे दोन निकर्षच आपल्याला उपलब्ध आहेत. त्यावर ग्रामदान पारखून घेणें आता सोपें आहे. त्यांची जरा अधिक फोड केल्यावर पुढील गोष्टी आपल्या ध्यानांत येतात.

१. 'ग्रामदानी' गावांत एक नवी सामाजिक एकात्मतेची भावना निर्माण झालेली असली पाहिजे. इतर गावांपेक्षा या गावांत विकासाचीं वा इतर नित्याचीं कामें विशेष स्वयंस्फूर्त उत्साहाने पार पाडलीं जात

आहेत, नवी सामुदायिक जागृति व नेतृत्व येथे उद्‌यास येत आहे, असें दृश्य दिसलें पाहिजे. 'विकसित कुटुंबभावना' ही ग्रामदानी गावाची पहिली कसोटी मानायला हरकत नाही.

२. व्यक्तिगत मालकीचें विसर्जन झाल्याने या गावांत जमिनीचें वितरण समान असलें पाहिजे. ही समानता ताबडतोब जरी अमलांत आणली गेली नाही तरी गावांतील 'जागृत जनशक्ति' हें वाटप लौकरांत लौकर समान करून घेण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील असणें आवश्यक आहे.

३. वेळोवेळीं उद्‌भवणाऱ्या विविध समस्या समानतेच्या भूमिकेंतून सोडविणारी एखादी पंचायतीसारखी प्रातिनिधिक संस्था तेथे उभी राहिली पाहिजे. एखाद्या व्यक्तीने आपल्या प्रभावाने गावांत कांही सुधारणा घडवून आणणें हें सुरुवातीला कांही काळ चालू शकेल. परंतु हें 'बाह्य नेतृत्व' लौकरांत लौकर कमी होऊन स्थानिक व प्रातिनिधिक स्वरूपाचें नेतृत्व तेथे रुजणें अवश्य आहे.

ग्रामदानाविषयी या तीन कसोटया मनाशीं निश्चित करून मी कोरापुटच्या भूमीवर दाखल झालों.

* * *





# ३

# ग्रामदानाची हेतुचिकित्सा

कोरापुट जिल्हा हा ओरिसा राज्याच्या एक-षष्ठांश हिश्शाएवढा मोठा आहे. महाराष्ट्रांतील साधारणपणें तीन जिल्हे म्हणजे सुमारे दहा हजार चौरस मैल एवढी याची व्याप्ति आहे. हा भाग दाट जंगलें आणि पर्वतराशी यांनी इतका दुर्गम व दुर्लंघ्य झालेला आहे की, कोणत्याहि परकीय वा स्वकीय राज्यकर्त्यास हा जिंकून घेण्याचें फारसें आकर्षण कधीच वाटलें नाही. श्वापदें, भयंकर रोगराई आणि रानटी कंध प्रजा यामुळे या प्रदेशाकडे कोणाचेंहि आतापर्यंत विशेष लक्ष गेलें नाही. त्यामुळे एका अर्थाने सारा भारतवर्ष गुलामगिरींत खितपत असतांनादेखील कोरापुटमधील कंध प्रजा स्वतंत्र होती, हा दावा सांगायला हरकत दिसत नाही. कारण उत्तरेंतून बंगालकडून व दक्षिणेंतून गोवळकोंड्याहून जरी कांही मुसलमानी आक्रमणें मध्ययुगांत झालीं तरी तीं या भागांतील हिंदु सामंतांनी सहज परतवून लावलीं असल्याचें इतिहास सांगतो. फ्रेंचांचा पाय प्रथम १७४८ मध्ये या भूमीला लागला. परंतु दहाच वर्षांत क्लाइव्हने त्यांना घालवून इंग्रजी अंमल येथे आणला. परंतु जवळजवळ पुढचीं शंभर-एक वर्षे इंग्रजांसारख्या जागरूक राज्यकर्त्यांनी वा त्यांच्या छत्राखाली आपले हातपाय पसरणाऱ्या परकीय भांडवलशहांनी या ‘कच्च्या मालाच्या खाणीकडे’ कसलेंहि लक्ष पुरविलें नाही. नकाशावरसुद्धा याचें अस्तित्व नव्हतें. १८६३ मध्ये येथील जयपूरच्या जमीनदाराला ‘महाराज’ हा किताब देऊन हा भूभाग सालिना वीस हजार रुपये उत्पन्नावर विकण्यांत आला. १९३६ सालीं

दहा हजार चौरस मैल
एवढी या कोरापुट जिल्ह्याची
व्याप्ति आहे.






विश्वनाथ पटनायक

★

★



आ
दि
वा
सी

गा
व

ओरिसा प्रांत तयार झाला तेव्हा ' कोरापुट ' हा जिल्हाहि वेगळा काढण्यांत आला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५२ मध्ये जमीनदारी कायद्याने नष्ट होईपर्यंत जयपूरचा महाराज खाजगी मालमत्तेप्रमाणे या भागाची वहिवाट करीत होता. येथे राज्य सरकारचा मुलकी व इतर अंमल सुरू होऊन अद्याप फारच थोडा काळ लोटला आहे. साऱ्या भारतांत ओरिसा हा आपल्या मागासलेपणाविषयी प्रसिद्धच आहे. ओरिसांत ' कोरापुट ' हा सर्वांत मागासलेला भाग. तेव्हा भारतांतील या अत्यंत दुर्लक्षित, उपेक्षित व दलित अशा भागाचें दर्शन अधिक जवळून घेतां आलें तर पाहूं.

ओरिसांतील एकूण लोकसंख्येंत आदिवासींचें प्रमाण शेकडा तीस इतकें मोठें आहे. सर्व प्रांतांत आदिवासींच्या चाळीस ते पन्नास तरी निरनिराळ्या जमाती असतील. त्यांपैकीं निम्म्या जमाती कोरापुटमध्ये सापडतात. जिल्ह्याची एकूण लोकसंख्या बारा लाख आहे. त्यांपैकीं दहा लाख केवळ आदिवासी आहेत. जमातींची संख्या जरी जिल्ह्यांत बरीच दिसली तरी कंध, पोरोजा, गडाबा, कोया, सांवरा या जमातींची संख्याच विशेष प्रमाणांत आहे. गेलीं तीस वर्षें ही आदिवासी लोकसंख्या सारखी झपाट्याने वाढत आहे. १९४१ ते ५१ या दहा वर्षांत ती साडेबारा टक्क्यांनी वाढली असल्याचें शिरगणतीवरून दिसून येतें.

या भिन्न भिन्न जमातींच्या भिन्न भिन्न भाषा म्हणजे एक गलबलाच आहे. निम्म्या-अधिक आदिवासींना उडिया भाषा समजते. तेलगूचाहि वापर कांही ठिकाणीं होतो. परंतु ओरिसाची मातृभाषा ' उडिया ' आणि आदिवासींच्या प्रचारांतील ' उडिया ' यांत इतका फरक आहे की, ' उडिया ' येणाऱ्या नवीन माणसाला ती चटकन समजत नाही. कंध, सांवरा, पोरोजा, गडाबा, कोया या जमातींच्या वेगवेगळ्या भाषा आहेत. परंतु कंध भाषेशिवाय एकाहि आदिवासी भाषेला लिपी नाही. त्या साऱ्या

'बोली' भाषा आहेत. कंध भाषेला लिपी असली तरी व्याकरण वा वाङ्मय हीं अंगें जवळजवळ नाहीतच.

वांशिक पूर्वसंबंध व धार्मिक समजुती यांत या जमाती-जमातींमध्यें अनेक भेद आहेत. प्रत्येक जमातीचीं पूजादैवतें वेगवेगळीं असतात. त्यांचे नैवद्य वेगवेगळे असतात. शंभर वर्षांपूर्वी नरबळीची प्रथाहि प्रचारांत होती. जादूटोणा आणि भुताटकी यांवरचा विश्वास अजूनहि अढळ आहे. धार्मिक व इतर समारंभ सामुदायिक सुरापानाने अजूनहि साजरे केले जातात. धूम्रपान तर मुलाबाळांपासून थोरामोठ्यांपर्यंत सर्व स्त्रीपुरुष सर्रास करतात. कांही भागांत दारूचें प्रमाण जबरदस्त आहे. लग्नविधि अनेक प्रकारांनी साजरे करण्याची प्रथा वेगवेगळ्या जमातींत आहे. कांही ठिकाणीं मुलगी विकत घेण्याची चाल आहे, तर कांही ठिकाणीं लग्नाआधी तीन वर्षे मुलीच्या आई-वडिलांकडे नवरोजींना राबवून घेण्याची पद्धत आहे. कांही जमातींत मुलगा आपल्या मित्रमंडळींसह मुलीला जबरदस्तीने पळवून नेऊन खुशाल लग्न लावतो. हा राक्षसविवाहहि येथे मान्यता पावलेला आहे. काडीमोड व पुनर्विवाह या चाली सर्रास आहेत. वस्त्रप्रावरणाबाबत हीच विविधता दिसते. कुठे लंगोटीशिवाय चिंधीहि अंगावर दिसणार नाही, तर कुठे कमरेला एक आणि खांद्याला एक अशीं दोन वस्त्रें तरी अंगावर घेण्याची चाल आहे. स्त्रियांचीं पूर्ण वस्त्राच्छादित शरीरें जशीं कांही भागांतून दिसतात, तसेंच केवळ नांवा-पुरता कपडा कमरेला गुंडाळलेल्या स्त्रियाहि कांही कांही ठिकाणीं आढळतात. एक गोष्ट मात्र आदिवासीजवळ विशेष आहे. त्याची 'पर्णकुटी' एखाद्या आश्रमासारखी स्वच्छ, निर्मळ व नितांत रमणीय वाटते. त्याची अभिजात सौंदर्यदृष्टि या पर्णकुटीच्या सजावटींत तो व्यक्त करतो. पाऊस फार पडत असल्याकारणाने पर्णकुटीचीं छपरें दोन्ही बाजूंला खालवर ओघळलेलीं असतात. गोमयाने स्वच्छ सारवलेल्या जमिनी, कुडाच्या काळपट तांबड्या भिंती, त्यांच्यावरील निळ्या रंगाची

किनार—आदिवासीच्या सरळ व अकृत्रिम जीवनाचें हें प्रतिबिंब आहे, असें वाटल्याखेरीज राहत नाही.

परंतु कितीहि अंतर्गत विविधता असली तरी आदिवासी समाजाची रचना आणि त्यांची मूलभूत मानसिक टेवण एकसारखी आहे, हेंहि या पर्णकुटीकडे पाहिल्यावर ध्यानांत येतें. एका सलग छपराखाली आठ-दहा झोपड्या, अशा समोरासमोर झोपड्यांच्या दोन रांगा आणि मध्ये मोकळ्या जमिनीचा लांबट पट्टा, हें आहे आदिवासी गावाचें चित्र. सर्व झोपड्यांवर 'समान आवरण' हें आदिवासीच्या पिढीजात कुटुंब-वृत्तीचें निदर्शक चिन्ह आहे. आदिवासी मनुष्य जन्मापासून मरेपर्यंत एका कुटुंबाचा घटक, परिवाराचा अवयव या नात्याने वागत असतो. त्याला स्वतंत्र वैयक्तिक जीवनाची जाणीवच नाही. त्याला व्यक्तिगत स्वार्थ नाही. हक्काची कल्पना नाही. रस्त्याने हिंडतांना आपल्याला एखादाच आदिवासी किंवा त्याची स्त्री क्वचितच आढळेल. आदिवासी स्त्री-पुरुष लहान-मोठ्या परिवारांतच दृष्टीस पडायचे. त्यांचे धार्मिक समारंभ, त्यांचे आनंदोत्सव, त्याप्रीत्यर्थ होणारे नाचगाण्याचे कार्यक्रम—हे सारे सामुदायिक असतातच. पण विवाहासारखे विधीहि कांही गावांतून समाईक खर्चाने साजरे करण्याची चाल आहे. आदिवासी परगावीं लग्नाला निघाला तर वाटेंत भेटेल त्याला परस्पर निमंत्रण देऊन आपल्याबरोबर घेऊन जाईल. आदिवासीचें विश्व म्हणजे त्याची जमात. जमातीबाहेर त्याला अस्तित्वच नाही. पुष्कळशा गावांत एकाच जमातीचे लोक राहत असल्याने आदिवासी गावें मोठ्या कुटुंबासारखींच एकात्म व एकजीव वाटतात.

कित्येक 'गावें' म्हणजे तर दोन-चार कुटुंबांचाच विस्तार असतो. एकंदरींत आदिवासींचीं गावें आपल्याकडील मानाने फार लहानच आहेत. कांही गावें तर इकडील शेतांवरील वाड्या किंवा वस्त्यांच्या स्वरूपाचीं आहेत. सरासरी वस्ती सव्वाशे ते दीडशेपर्यंत असते.

आदिवासींची पिढीजात कुटुंब-भावना आणि गावचा लहानसा परिवार यामुळे आपल्याकडील ग्रामरचनेशीं या गावांचें साम्य फारच थोडें आहे. येथे जातिभेदाचें प्रमाण फारच कमी आहे. येथे पंचायतीचा कारभार नाही. साऱ्या ग्रामपरिवाराचें नियंत्रण एखादा 'नायक' करीत असतो. या नायकाचें वर्चस्व कित्येकदा आसपासच्या इतर गावांवरहि चालत असतें. आदिवासी माणसाचा आपल्या नायकावर विश्वास म्हणण्यापेक्षा अंधश्रद्धाच असते हें म्हणणें अधिक युक्त ठरेल. कित्येक गावांत नायकच सावकारी करून आदिवासींचीं पिळवणूक करीत असतो. परंतु तरीहि त्याच्याविषयींची श्रद्धाभावना कमी होत नाही. त्याचा सल्ला स्वार्थी व आत्मविघातक असला तरी आदिवासी तो निमूटपणाने मानीत असतो. हा 'नायकतंत्री' कारभार हेंहि या गावांचें आपल्यापेक्षा आणखी एक निराळें वैशिष्ट्य आहे.

गावांतील आदिवासी जमीन कसत असला तरी त्याला शेतकरी म्हणणें जरा धाष्टर्याचेंच आहे. येथील आदिवासी नुकताच आपल्या वन्यावस्थेंतून बाहेर पडत असून शेतीचा स्थिर व्यवसाय करूं लागला आहे. त्याचीं जमिनीवरचीं स्थलांतरें आता सरकारी कायद्याने कमी होऊं लागलीं आहेत हें खरें. पण 'पोधु' शेतकीचा ( Shifting cultivation ) चा प्रश्न येथे कांही वर्षांपूर्वी फारच बिकट होऊन बसला होता. आदिवासी जुन्या जमिनी सोडून, जंगलें तोडून नव्या जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी टोळ्याटोळ्यांनीं स्थलांतरें करीत. याचा शेतीच्या प्रगतीवर फारच विपरीत परिणाम होत असे. जंगलें साफ होत गेल्यामुळें जमिनीची धूप वाढत गेली; शिवाय वरचेवर जमीन सोडण्याच्या वृत्तीमुळें शेतींत कसलीहि सुधारणा वा उत्पन्नांत वाढ करण्याची ओढच आदिवासी माणसाच्या ठिकाणीं उत्पन्न होत नसे. अजूनहि आदिवासी माणसाला जमिनीच्या मालकीचें तीव्र आकर्षण नाही. निर्वाहाचें एक साधन म्हणून तो जमिनीकडे पाहत असतो.

जमीन चांगली व भातशेतीची असेल तर मात्र आकर्षण जरूर आहे. परंतु सर्वसाधारण जमिनीचा कुठलाहि तुकडा त्याला सारखाच महत्त्वाचा वाटतो. वर्षांतून एखाद्या विशिष्ट दिवशीं ज्याला जमिनीची जरूर असेल त्याने गावच्या नायकाकडून हवा तेवढा तुकडा घ्यावा व नको असेल त्याने आपला तुकडा परत करावा, अशी व्यवस्था कांही वर्षांपूर्वी येथे प्रचारांत होती. शेतीच्या या अल्प आकर्षणामुळे आदिवासींची अवजारेंहि अगदीच प्राथमिक अवस्थेंतील व अपुरीं आहेत. स्वत: आदिवासी मनुष्य शेतीवर मनापासून कष्टहि करीत नाही. मलेरिया किंवा सिफिलिससारख्या दिसणाऱ्या 'याज' रोगाने आदिवासी मनुष्य बहुधा पीडित असतो. ही रोगट प्रकृति व उपासमार यामुळे त्याची काम करण्याची ताकद मुळांत फार कमी असते. त्यांत पिढीजात आळस, दारूसारखें व्यसन या गोष्टींची भर पडते. आपण संपन्न व्हावें, उत्पन्न वाढवून संपत्तीचा संग्रह करावा, ही ओढच नसल्याने तो जरूरी-पुरते कसेबसे कष्ट करतो. चार तासांपेक्षा अधिक काम त्याच्याच्याने होत नाही. त्याचे बैलहि दोन तासांच्या कामानंतर फेस गाळूं लागतात. सर्वसामान्य आदिवासीला बैलांची जोडी सावकाराकडून भाड्यानेच घ्यावी लागते. जे स्वत:ची बाळगून असतात त्यांनाहि त्यांची निगा राखतां येत नाही. जंगलांतील चाऱ्यावर जी काय पोसली जाईल तेवढीच निगा. अद्याप तेथे बैलांच्या निर्मितीकडेहि आदिवासी लक्ष पुरवीत नाहीत, ही गोष्ट विचित्र वाटली तरी खरी आहे. सालोसाल खालील आंध्र प्रांतांतून हजारो बैलांची आवक होत असते. कांही ठिकाणची शेती इतकी मागासलेली आहे की, आदिवासी हाताने खड्डे करून त्यांत बी-बियाणें पेरीत असतो आणि मिळेल तें पीक काढून स्वस्थ बसतो. जंगलांतील पानें गोळा करून ठेकेदारांना विकणें, लाकूडफाटा तोडणें, कोळसा करणें इत्यादि जंगलांतील उत्पन्नाचा आधार आदिवासीला मिळत असल्याने त्याचें शेतीवरील लक्ष अधिकच कमी होतें. तात्पर्य,

शेती हा आदिवासींचा दुय्यम व्यवसाय असल्यामुळे त्याची जमिनीबाबत वा तिच्यावरील मालकीबाबत तीव्र आसक्ति आपल्याकडील शेतकऱ्या-प्रमाणे आढळत नाही. जेथे शेतीचा विकास झाला आहे, उत्कृष्ट भातशेती जेथील आदिवासी करतात, तेथील परिस्थिति मात्र आपल्या-सारखीच आहे, ही गोष्टहि येथे नमूद करावीशी वाटते.[१]

---

१. " आदिवासींची जीवनाकडे पाहाण्याची एक स्वतंत्र दृष्टि आहे. त्यांच्या जीवनांत पैशाला फार महत्त्वाचें स्थान नाही. जमीन, गाईगुरें, बकऱ्या-कोंबड्या, मासे खेकडे व श्रम करण्यासाठी मजबूत हातपाय हीच त्यांची संपत्ति आहे. आपणास हवें तें निसर्गांतून व भोवतालच्या साधनांतून मिळ-विण्याची शक्यता असेल तर आदिवासी स्वतःला अत्यंत सुखी प्राणी समजतो. निरनिराळ्या ठिकाणीं डोंगरांत व जंगलांत गटागटाने गावेंच्या गावें एकाच जमातीचीं वसलेलीं आहेत. त्यामुळे या भागांत कारागीर वर्ग सापडतच नाही. जमिनींत धान्य पिकवावयाचीं उपलब्ध असणारीं स्थानिक साधनें घेऊन झोपड्या बांधावयाच्या व आपलें जीवन जगावयाचें. यांत पैशाला व बाहेरच्या वस्तूंना फार कमी स्थान आहे. दळणवळणाच्या साधनांच्या अभावीं दूर दूर असणारे बाजार याच त्यांच्या खरेदीविक्रीच्या जागा आहेत. जवळच्या बाजारांत जाऊन आपल्या वस्तु विकावयाच्या व त्यांच्या बदल्यांत आपणास हव्या त्या वस्तु घ्यावयाच्या, ही त्यांच्या जीवनाची आर्थिक घडण आहे. त्यांच्या जीवनप्रवाहाचें वर्णन तीन शब्दांत करतां येईल: " अन्न, दारू व स्त्री. " या तीन वस्तु सहजसुलभतेने मिळ-विण्यासाठी त्यांची धडपड असते. अशा या आजच्या परिस्थितींत. त्याला वाजवीपेक्षा जास्त वस्तु जरी दिल्या तरी तो घेणार नाही. डांगमध्ये वासुर्णे या गावीं एक भिल्ल राजा आहे. वार्षिक सुमारे वीस हजार रुपये त्याला तनखा मिळतो. जवळजवळ पाऊण लाख रुपये सरकारी खजिन्यांत ठेव म्हणून जमा आहेत. राजा म्हणून पूर्वीच्या ॲसिस्टंट पोलिटिकल एजंटने १५-२० हजार रुपये खर्च करून त्याला बंगला बांधून दिला. पण हा राजा त्या बंगल्यांत कधी राहिलाच नाही. आज या बंगल्यांत तो आपलीं गुरेंढोरें कोंडीत आहे. आपण मात्र झोपडींतच राहत आहे. पैसा साठवावा व त्यांतून

चांगली भातशेतीची जमीन बहुधा सावकारांच्या किंवा नायकांच्या हातांत एकवटलेली असते. आदिवासींचा सर्वांत मोठा शोषक आणि पीडक हा सावकार-वर्ग आहे. आदिवासींच्या भाबड्या आणि भोळसट वृत्तीचा क्रूर फायदा हा सावकार-वर्ग आज शतकानुशतकें निवांतपणें घेत आला आहे. शे-दोनशे रुपयांच्या कर्जापोटीं आदिवासी आपल्या घरांतील एखादें माणूस सावकाराकडे गहाण टाकायला आजहि तयार होतो. याबाबत येथील लिंबागुडा या गावांत नुकतीच थोडी आकडेवारी गोळा करण्यांत आली आहे. त्याचा निष्कर्ष असा आहे :—

" Of the numerous evils that the private moneylending has given currency to in this region, perhaps there is none more revolting than the widespread prevalence of ' Goti ' system which almost borders on serfdom in its basest form. Hard pressed for cash to meet some social occassion in the family, a cultivator is often forced to approach a land-lord and offer himself for debt-slavery over a period of years. Out of 97 such Gotis interviewed for the purpose of this inquiry, 12 had served for more than a score of years against a loan, not exceeding Rs. 300 in each case. On the other hand, 50 had already served for more than a decade. The rest were still 'amateures', so to say." ('Gramdan', Koraput. March 1958.)

---

सुखोपभोग मिळवावा ही वृत्ति त्यांच्यांत नाही भिल्लांच्या बाबतींत एक म्हण आहे— " हंडीमें दाणा तो भिल्ल उताणा. " घरांत खाण्यासाठी धान्य आहे तोंपावेतो भिल्ल कामावर जाणार नाही. ( ' महाराष्ट्रांतील आदिवासींची आर्थिक पाहाणी ' : गांधी स्मारक निधि, नासिक-प्रकाशन. पृष्ठ २ ) कोरापुटचे आदिवासी आपल्याकडील भिल्लांपेक्षाहि फार मागासलेले आहेत, हें ध्यानांत घेतल्यावर त्यांच्या अपेक्षांची पातळी किती खाली असेल, याची सहज कल्पना येईल.

अधिक मागासलेल्या भागांत या गुलामगिरीचें स्वरूप याहीपेक्षा भयाण आहे. व्याजाचे दर किती असावेत यालाहि कांही सीमा नाही. उघड-उघड पन्नासपासून शंभर टक्के दर तर प्रचारांत आहेतच ; परंतु आदिवासी कुटुंबें एक-दोन पिढ्यांपूर्वी घेतलेल्या कर्जांचें व्याज अजूनहि फेडीत असतांना दिसतात. या भयंकर व्याजापायीं आदिवासींच्या जमिनी सावकाराच्या घशाखाली जात असतात. आदिवासीचें उभें पीक व्याजाप्रीत्यर्थ सावकार शेतावरून त्याच्या देखत उचलून नेतो. त्याच्या पोटासाठी नवीन कर्ज म्हणून त्यांतलाच कांही भाग त्याला परत करतो. कांही वर्षांनंतर त्याची जमीन गिळंकृत करून त्याची हकालपट्टी करतो. आणि हा अजाण आदिवासी नवीन जंगलें तोडून डोंगराळ जमिनीवर पुन्हा आपली नांगरट सुरू करतो. परंतु नवीन ठिकाणीं गेल्यावरहि सावकाराचा पाठपुरावा संपत नाही तो नाहीच. बहुसंख्य आदिवासी या दुष्टचक्रांत पिळून निघत असतात. तरीपण त्यांना सावकाराचा अन्याय दिसत नाही ; समजत नाही. प्रतिकाराची गोष्टच नको. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रयत्नामुळे बाटलेली डोंबासारखी एखादी जमात आर्थिक व्यवहारांत चलाख झाली आहे हें खरें; परंतु याचा परिणाम चांगला होण्याऐवजी वाईटच झाला आहे. ही चलाख मंडळी गरीब आदिवासीचें नाना प्रकारांनी शोषण करण्यांतच आपली 'अक्कल' खर्च करीत आहेत. या डोंबाकडे गांवच्या रखवालीचें किंवा समारंभप्रसंगीं ढोलकी पिटण्याचें काम परंपरेने चालत आलेलें आहे. परंतु गावांतील माल बाहेर बाजारांत नेऊन विकण्याचें काम अलीकडे हे लोक करूं लागले असल्याने त्यांची स्थिति जरा सुधारली आहे. बैलांचा व्यापारहि आता यांच्याच हातांत केंद्रित होत आहे.

चार-पांच माणसांच्या एका आदिवासी कुटुंबाचें वार्षिक उत्पन्न १५० ते २०० रुपयांपेक्षा अधिक नाही. घरांत मातीचीं दोनचार भांडीं व माणशीं एखाद-दुसरा कपडा एवढाच आदिवासीचा संसार.

वर्षांतून सहा महिने तो अर्धपोटीच असतो. रागी-मंडवा हें धान्य उकळून त्याचें पाणी करून पिणें हें येथील मुख्य अन्न आहे. वर्षांतून कांहीं महिने भाताचें एक जेवणहि त्याला मिळूं शकतें. परंतु हें साधें जेवणहि कधी कधी मिळणें मुश्कील होतें आणि तो गाय किंवा बैल मारून आपली भूक भागवायला नाइलाजानें प्रवृत्त होतो. कित्येक घरांत इतकें करूनहि महिना-महिना चूल पेटत नाही अशीहि स्थिति आहे. एका खेड्यांत एक आदिवासी असा भेटला : त्याची आई सहा महिन्या-पूर्वीं वारली. तिचा अंत्यसंस्कार करायला जवळ एक पैसाहि नाही. हा लोहारीचा धंदा करीत असल्यानें एक हातोडा याच्याजवळ होता. एका लांबच्या खेडयांतील एका माणसाजवळ यानें हा हातोडा गहाण ठेवून चार पैसे उभे केले व आईचा अंत्यविधि उरकला. हातोडा जवळ नसल्यानें कुठलेंच काम करतां येईना. उपासमार टाळण्यासाठी तो मोहाचीं फुलें गोळा करूं लागला. दिवसभर हीं फुलें गोळा करून चार-सहा आण्यांची प्राप्ति याला होणार ! त्यांत हा आपली दारूची तलफ भागवणार, आपलें व घरच्या कच्च्याबच्च्यांचें पोट भरणार आणि शिल्लक टाकून हातोडा सोडवून आणणार ! मला तो दिसला तेव्हा सहा महिने उलटून गेले होते. तरीहि त्याचा हातोडा आला नव्हता. उपजीविकेचें साधनच गमावून बसण्याचे शेकडो प्रसंग आदिवासींवर वरचेवर येत असतात आणि यामुळेच त्याला लहानमोठ्या सावकारांचे पाय धरावे लागतात. सावकाराचा प्रवेश झाला की, शोषणाला सुरुवात होते. त्याला ना कधी ओहोटी, ना अंत. हें अनेक शतकें चालू आहे. यापुढे तें केव्हा थांबेल याची निश्चिति तरी कोण देऊं शकणार !

अशी आहे कोरापुटची भुकेकंगाल, अर्धनग्न, पददलित आणि निराश्रित प्रजा. कोणीहि तिच्याकडे आजपर्यंत पाहिलें नाही. कोणीहि तिचा वाली नव्हता. आपल्याकडे मतें मिळवायला तरी राजकीय पक्ष

भिल्ल किंवा वारली या आदिवासी लोकांकडे कधी कधी जातात. त्यांना नाना आमिषें दाखवून नादीं लावतात. परंतु ओरिसांतील राजकीय पक्षांची जागृति तितकी तीव्र नाही. कोरापुट हा तर आजवर संस्थानिकाचाच मुलूख असल्याने आदिवासींना मेंढ्यांच्या कळपांपेक्षा कोणी 'पुढारी' जास्त किंमत देण्यास मुळीच तयार नव्हता. परंतु ढग कितीहि काळा असला तरी त्याला एखादी रुपेरी किनार ठेवण्याची परमेश्वराची चाल आहे. कोरापुटमधील आदिवासी जनतेकडे पुढाऱ्यांनी आणि नेत्यांनीं लक्ष दिलें नाही तरी कांही निष्ठावंत सेवक प्रसिद्धीच्या झगमगाटापासून अलिप्त राहून आदिवासी जनतेचा दुःखभार हलका करण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांना जाग यावी म्हणून आपल्या जीवनाची ज्योत उजळीत होते.

'विश्वनाथ पटनायक' हे अशा एका निरलस, प्रामाणिक व ध्येयवादी सेवकाचें नांव. एक जुने गांधीवादी कार्यकर्ते म्हणून यांचा श्रेष्ठ लौकिक या भागांत आज प्रस्थापित झालेला आहे. कृत्रिम डामडौल किंवा विक्षिप्त साधेपणा या दोन्ही अतिरेकी उपाधींपासून विश्वनाथजी अलिप्त आहेत. त्यांची राहणी सर्वसामान्य आदिवासीसारखीच नैसर्गिक व साधी आहे. श्री. गोपबंधु चौधरी यांच्यापासून स्फूर्ति घेऊन त्यांनी आदिवासींच्या सेवेला प्रारंभ केला व उभी हयात या कार्यांत वेचली. आज आदिवासींच्या अंतःकरणांत त्यांना देवाचें स्थान प्राप्त झालें आहे. 'आज्ञा' या अतीव पूज्यतादर्शक शब्दानेच त्यांचा उल्लेख सर्वत्र केला जातो. 'कुजेन्द्री' या गावीं त्यांचा आश्रम आहे. या आश्रमांतूनच गांधींच्या विविध चळवळींचा प्रसार विश्वनाथजींनी आदिवासी भागांत केला. त्यांतील कांही फसल्या, कांहींना यश मिळालें. गांधींचा चरखा आदिवासीला रुचला नाही. पण त्यांच्या सत्याग्रह आंदोलनांत आदिवासींनी मनःपूर्वक भाग घेतला. १९४२ च्या 'चलेजाव' आंदोलनांत दोन हजारांवर आदिवासी तुरुंगांत डांबले गेले. कांही ठिकाणीं गोळीबार

होऊन शंभर-एक माणसें ठार मारलीं गेलीं. लक्ष्मण नायक हा एक आदिवासी वीर फासावरहि लटकला.

राजकीय आंदोलनावरून विश्वनाथजींची दृष्टि हळुहळू सामाजिक व आर्थिक आंदोलनांकडे वळली. आदिवासी जीवन जसजसें विश्वनाथजी जवळून पाहूं लागले, तसतसें त्यांचें दयार्द्र अंतःकरण कठोर होऊं लागलें. सावकारांची क्रूर पिळवणूक त्यांना उघड्या डोळ्यांनी पाहवेना. त्यांतच लागोपाठ दोन-चार वर्षें दुष्काळाने घेरलें. आधीच उपासमारींत दिवस काढणारा आदिवासी भुकेने तडफडूं लागला. कांहीं ठिकाणीं 'भूक-बळी'चे प्रकारहि झाले. विश्वनाथजींनी या प्रश्नाकडे लोकांचें लक्ष वेधावें म्हणून शहरांतून व कटकसारख्या राजधानींतून सभा घेतल्या, फंड उभारले. कार्यकर्त्यांचें दल तयार केलें. परंतु या तात्पुरत्या दुःखनिवारणाने प्रश्न सुटणार नाहीं, याचीहि त्यांना प्रचीति आली. त्यांनी 'भू-सत्याग्रहा' चें आंदोलन उभारण्याचा निश्चय केला. 'सावकाराने गिळंकृत केलेल्या आदिवासींच्या जमिनी त्यांना परत मिळाल्या पाहिजेत. आदिवासींची हकालपट्टी थांबली पाहिजे' ही या भू-सत्याग्रहींची मागणी होती. मोहिमेच्या प्रचाराला सुरुवात झाली. ठिकठिकाणीं सत्याग्रह-शिबिरें उघडलीं गेलीं. सरकार-दरबारीं वाटाघाटीहि सुरू होत्याच. त्यांना थोडेंफार यश येऊन सरकारतर्फे एक खास अधिकारी या प्रश्नाचा विचार करण्याकरिता नेमण्यांत आला. परंतु मोहिमेच्या पूर्वप्रचारामुळें आदिवासी सत्याग्रहींनी आपापल्या जमिनीवर जाऊन नांगरटी करण्यास प्रारंभहि केला. यामुळे चळवळीला अकारण तोंड फुटून वाटाघाटी फिसकटल्या. सरकारने आदिवासींची धरपकड करून त्यांना तुरुंगांत डांबलें. दुर्दैवाने विश्वनाथजी या वेळीं रुग्णावस्थेंत अंथरुणावर खिळून पडल्याकारणाने त्यांना चळवळीची वाताहत उघड्या डोळ्यांनी पाहावी लागली.

हा सुमार होता १९५२ च्या आसपासचा. विनोबाजींचें भू-जागरण

या वेळीं उत्तरप्रदेश व बिहारमध्ये सुरू होतें. या अभिनव प्रयोगानें साऱ्या भारतवर्षाचें लक्ष आपल्याकडे खेचून घेतलें होतें. विशेषत: बिहारमधील 'केंद्रीभूत कार्या'चा परिणाम आसपासच्या भागांवर बराच पडला असावा. उत्तरप्रदेशमध्ये 'मंगरोठ' हें पहिलें ग्रामदान जाहीर होऊन त्याचा बोलबालाहि बराच झाला होता. बिहारमध्येहि तुरळक ग्रामदानें मिळूं लागलीं होतीं. विश्वनाथजी आणि त्यांचे सहकारी कार्यकर्ते यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या. सत्याग्रहाची चळवळ दबली गेली तरी आदिवासींना जमीन मिळवून देण्याचा एक नवा पर्याय उपलब्ध झाला, म्हणून मंडळी पुन्हा जोमानें कार्याला लागली व भूदानाचें नवें पर्व ओरिसांत सुरू झालें. श्री. गोपबंधु चौधरी व त्यांच्या पत्नी रमादेवी या जुन्या कार्यकर्त्यांनी यांत आपलें तनमनधन अर्पण केलें. भराभर दानें मिळत गेलीं व अनेक नवीन कार्यकर्तेहि या संचारांत सामील झाले. हजारो वर्षांत डोंगरदऱ्यांत आणि दाट जंगलांत लपलेल्या ज्या गावांना परक्या माणसाचा स्पर्शहि अद्यापपर्यंत झाला नव्हता तेथे उन्हा-तान्हाची, पावसापाण्याची, रोगराईची तमा न बाळगतां कार्यकर्ते जाऊं लागले, सभा घेऊं लागले, भूदान मागूं लागले. या झंझावातानें आदिवासींची काळझोप कांही काळ तरी चाळवली यांत शंका नाही. अनेक आदिवासी 'नायक' या आंदोलनांत सहभागी झाले. भूदानाचें रूपांतर ग्रामदानांत अगदी नकळत झालें. जमीन मिळण्याऐवजी सारें गावच कार्यकर्त्यांना 'दान' मिळूं लागलें. गावच्या साऱ्या लोकांनी आपल्या साऱ्या जमिनीची दानपत्रें सादर करून कार्यकर्त्यांनाहि संभ्रमांत टाकलें. १२ सप्टेंबर १९५३ या दिवशीं कोरापुट जिल्ह्यांत रायघडा विभागांत 'गोबरपल्ली' हें पहिलें गाव ग्रामदान म्हणून जाहीर झालें. हळूहळू ही संख्या वाढूं लागली. ग्रामदानाच्या या नव्या सर्जनानें विनोबाहि प्रभावित झाल्या-शिवाय राहिले नाहीत. त्यांनी बिहारमधूनच ओरिसांतील कार्यकर्त्यांना संदेश धाडला—'उत्कलमध्ये भूमिक्रांतीची महानदी वाहूं लागेल

यांत शंका नाहीं.' 'बिहारमध्ये पूर्ण भूदान, उत्कलमध्ये भूमिक्रांति, आणि इतर प्रांतांत मुक्त विहार' हा आपला मनोदयहि त्यांनी याच वेळीं प्रकट केला.

आणि २६ जानेवारी १९५५ या दिवशीं जेव्हा विनोबांनी ओरिसाच्या भूमीवर पदार्पण केलें, तेव्हा प्रांतांतील ग्रामदानांची संख्या सेहेचाळीस आणि कोरापुटची संख्या सव्वीस अशी होती. २९ मे १९५५ ला विनोबांनी कोरापुट जिल्ह्यांत प्रवेश केला त्या वेळीं त्यांना ७९ ग्रामदानांची भेट देण्यांत आली. दहा दिवसांपूर्वीच बिनोबांनी 'अकिली' या ग्रामदानी गावांतील जमिनीचें प्रथमच आपल्या हाताने वाटप केलें व 'अहिंसेचा अणुबॉंब' म्हणून ग्रामदानाचा गौरव केला. गावकऱ्यांना उद्देशून ते म्हणाले—

"पाश्चात्य शिक्षित लोक अगदी आंधळे झाले आहेत. त्यांना ॲटमची शक्ति दिसते. एका परिमाणूंत केवढी शक्ति आहे असें ते म्हणतात. परंतु त्यापेक्षाहि जास्त शक्ति ग्रामदानांत आहे. जो पराक्रम ॲटम किंवा हैड्रोजन बॉंबने हिंसेच्या क्षेत्रांत होतो, तोच ग्रामदानाने अहिंसेच्या क्षेत्रांत होतो, असें मी समजतों. ॲटम आणि हॅड्रोजन बॉंब हे हिंसक शक्तीचा मोठा पराक्रम आहे असें मानलें जातें. त्याप्रमाणेच गावाची सर्व श्रद्धा हा अहिंसा शक्तीचा फार मोठा पराक्रम मानला जाईल. ॲटम आणि हैड्रोजन बॉंब जेव्हा फुटतो तेव्हा सर्व जगाची हवा बिघडते, असें वैज्ञानिक म्हणतात. पण जेव्हा असें एक ग्रामदान मिळतें तेव्हा सर्व जगाची हवा शुद्ध होऊन जाते असें मी समजतों."

— भूदानगंगा, भाग ५ वा. पृ. ३

विनोबांचें आवाहन ओरिसांतील कार्यकर्त्यांनी खूपच मनावर घेतलें व साऱ्या प्रांतांत आंदोलन फैलावण्याऐवजी त्यांनी कोरापुट जिल्हा केंद्रीभूत कार्यासाठी निवडला व आपली सारी शक्ति येथे पणास लावली. सारा प्रदेश पहाड आणि जंगलांनी व्यापलेला. त्यांत पावसाचा हंगाम

सुरू झाला. होत्या-नव्हत्या त्या वाटाहि बंद झाल्या. प्रथम विनोबा या जिल्ह्यांत केवळ सहा आठवडे मुक्काम करणार होते. परंतु कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून त्यांनी बेत बदलला व पावसाळ्याचे चारहि महिने आपली पदयात्रा भारतांतील या अत्यंत दुर्गम व गहन प्रदेशांत नेटाने चालू ठेवली. सर्वांत मोठें संकट मलेरियाचें होतें. पहिल्याच आठवड्यांत तेवीस यात्रिक मलेरियाने पीडित झाले. पदयात्रेंत डॉक्टरांचें एक शुश्रूषापथक सामील झालें, म्हणून मनुष्यहानि न होतां ही कोरापुटची संस्मरणीय व स्फूर्तिदायी यात्रा निर्वेध पार पडली. यात्रेच्या पहिल्या महिन्यांत ग्रामदानांची संख्या १२५ पर्यंत गेली. दुसऱ्या महिन्यांत २०७ इतकी झाली. आणि जेव्हा विनोबांनी १ ऑक्टोबर १९५५ रोजीं कोरापुटचा व त्याबरोबरच ओरिसाचा निरोप घेऊन आंध्रांत प्रवेश केला तेव्हा कोरापुटमध्ये ६०५ व साऱ्या प्रांतांत ८१२ ग्रामदानें मिळालीं होतीं. नंतरहि ही संख्या वाढतच गेली व एके काळीं ती केवळ कोरापुट जिल्ह्यांत १४०० पर्यंत वर गेली होती. अजूनहि एखाद-दुसरें ग्रामदान कार्यकर्त्यांना मिळतें. कांही ठिकाणचे आदिवासी जयपूरच्या केंद्र कार्यालयांत येऊन आपलें गाव ग्रामदानांत स्वीकारा, अशी विनंती करतात, असेंहि तेथील कार्यकर्ते सांगतात.

परंतु या झंझावाती प्रचाराने वातावरण तयार करण्याचें 'व्यापक' कार्य जसें प्रभावीपणाने झालें तसें विनोबांना ग्रामदानांतून अपेक्षित असलेलें 'खोल' काम झालें की नाही, याबद्दल मात्र 'खोल' शंका येते. ग्रामदानाचा संदेश आदिवासी ग्रामस्थांना निदान ढोबळ मानाने समजला तरच हें 'खोल' काम पुढे-मागे होणार हें उघड आहे. परंतु आदिवासींना ग्रामदानाचा संदेश समजण्यांत मुळापासूनच फार अडचणी होत्या. पहिली अडचण भाषेची. आदिवासी लोकांत कांही काळ काम केलेले कार्यकर्तेंच आदिवासींशीं मोकळेपणाने संभाषण करू शकतात; विचारांची कांही देवघेव करूं शकतात. कोरापुटमध्ये प्रचारकार्यासाठी


जमलेल्या कार्यकर्त्यांमध्ये आदिवासींशीं पूर्वसंबंध असलेले कार्यकर्ते फार थोडे होते. चळवळीला उठाव आला तसे जिल्ह्यांतील इतर भागांतून अनेक कार्यकर्ते यात्रेंत दाखल झाले. यांच्याकडून विचार-प्रचाराचें कार्य उथळपणें होणें अनिवार्यच होतें.

दुसरी अडचण म्हणजे आदिवासी आणि ओरिया यांच्यांतील मूलभूत विभक्त संबंधांची. एका प्रांतांतील असूनहि या दोन समाजांत ऐतिहासिक कालापासून कसलेहि परस्पर हितसंबंध प्रस्थापित झालेले नाहीत. धार्मिक व वैचारिक तर नाहीच, परंतु दैनंदिन आर्थिक संबंधासाठीहि हे दोन समाज कधी एकत्र येत नाहीत. आदिवासींचा मुख्य संबंध सावकारवर्गाशीं. परंतु ही सावकारी ओरिया समाजांतील व्यक्ति कमी प्रमाणांत करीत असून आंध्र प्रांतांतून वर आलेल्या लोकांचा भरणाच यांत अधिक आहे. या भागांतील जयपूर, रायघडा इत्यादि आदिवासींना परिचित अशा चार-पांच शहरांतील व्यापारी-वर्गहि मुख्यत: तेलगू असल्याने याहि क्षेत्रांत ओरिया व आदिवासी यांचे संबंध येत नाहीत. व्यापारी दळणवळण हें माणसामाणसांत स्थिर व नित्य संबंध प्रस्थापित करण्यास जेवढे उपयुक्त ठरतात, तेवढे इतर कोणतेहि संबंध उपयुक्त होत नाहीत. निदान व्यापारी हितसंबंध हें दृश्य व सद्य:परिणामी असल्याने धार्मिक व इतर संबंधांपेक्षा नित्य व्यावहारिक जीवनांत त्यांचा प्रभाव अधिक असतो. परंतु कोरापुटमध्ये आदिवासी व ओरिया यांचे व्यापारी, धार्मिक वा सांस्कृतिक इत्यादि कोणतेच हितसंबंध एकमेकांशीं निगडीत झालेले नाहीत. वकील, डॉक्टर हा सुशिक्षित वर्ग आणि आणि सरकारी अधिकारी हें ओरिया आहेत. परंतु यांच्याविषयी आदिवासीला परकेपणा, संशय आणि भीतीच अधिक वाटत असते. कोरापुटमध्ये आदिवासी व ओरिया हे दोन समाज समांतर रेषेप्रमाणे आपापलीं जीवनें व्यतीत करीत असतात. या पार्श्वभूमीमुळे दूरच्या शहरी भागांतून भूदान - प्रचाराच्या कार्यासाठीं नव्यानें आलेले


'पाहुणे' कार्यकर्ते व आदिवासी यांच्यांत विश्वासाचे व सौहार्दाचे संबंध इतक्या थोडया कालावधींत निर्माण होणें ही गोष्ट अशक्य होती.

तिसरी अडचण मूळ वैचारिक पीठाच्या अस्थिरतेबाबतच होती. मागील प्रकरणांत दाखविल्याप्रमाणें बिहारमध्ये असल्यापासून ते ओरिसाची पदयात्रा पूर्ण होईपर्यंत विनोबाच्या भूमिकेंतच वरचेवर बदल घडत होते. ग्रामदानाची निश्चित व्याप्ति किंवा व्याख्या विनोबांनी या कालावधींत स्पष्ट केली नव्हती. कोरापुटमधील कार्यकर्त्यांच्या एका खाजगी बैठकींत एका फार मोठया व जबाबदार भूदान-कार्यकर्त्याने असें सांगितल्याचें समजलें की, गांवांतील प्रत्येकाने १/६ हिस्सा जमीन दान दिली तर तें गाव 'ग्रामदान' समजायला हरकत नाही, असा अभिप्राय या जबाबदार कार्यकर्त्यांजवळ विनोबानी ओरिसांत असतांना प्रगट केला होता. १/६ हिश्शाचें दान ही ग्रामदानाची कसोटी मानली तर बिहारमध्येंच ग्रामदानांना सुरुवात झाली असें म्हणायला पाहिजे. शिवाय बिनोबांनीच ज्या 'आरोहणा'च्या पांच भूमिका विशद केल्या त्यांत १/६ हिश्शाचे दान याला 'व्यापक भूमिका' व ग्रामदानाला भूमिक्रांति अशीं स्वतंत्र नामकरणें केलेलीं आहेत. १/६ हिश्शाची कसोटी लावून जर विनोबांच्या अभिप्रायाप्रमाणें कोरापुटमधील ग्रामदानें त्या वेळीं स्वीकारण्यांत आलीं असतील तर त्यांना 'भूदाना'च्या सदरांत घालणेंच योग्य आहे. परंतु हा भाग जरी तूर्त वगळला तरी हें 'भूमिका-संक्रमण' कार्यकर्त्यांच्या वैचारिक गोंधळाला त्या वेळीं निश्चितच कारणीभूत झालें असणार यांत शंका नाही.

परंतु अडचणींचे डोंगर ध्येयवादी कार्यकर्त्यांचा मार्ग रोखूं शकत नाहीत. कार्यकर्त्यांच्या अमाप उत्साहाने ग्रामदानाचें कार्य पार पडलें ही गोष्ट खरी आहे. १४०० ग्रामदानें मिळवून कार्यकर्त्यांनी काल-पर्यंत उपेक्षेच्या खोल गर्तेत रुतलेला कोरापुट जिल्हा एकदम भारताच्या क्षितिजावर आणून उभा केला. हीं १४०० ग्रामदानें कशीं मिळालीं,



कोरापुटची संस्मरणीय पदयात्रा



Unto this last......



त्यामागील नैसर्गिक व ऐतिहासिक कारणपरंपरा कोणती, हें दिग्दर्शित करण्याचा प्रयत्न येथवर केला. थोडक्यांत ही कारणपरंपरा अशी सांगतां येईल.

१. कोरापुटमधील 'गावें' लोकसंख्या व मग़दूर या बाबतींत फारच लहान आहेत.

२. गावांतील लोकवस्ती आदिवासींच्या बहुधा एखाद्याच जमातीची असते. या आदिवासी जमातींचें जीवन अद्याप 'उपजत कुटुंबबंधनां'नी (Primitive Communism) निगडीत झालें असल्यामुळे गावांत समतेची भावना मुळांतच अधिक आहे.

३. या जमाती आपल्या नायकाच्या तंत्राने वागत असतात. या नायकांचें वर्चस्व १०-२० गावांवर तरी असतें. त्यामुळे नायकांचा पाठिंबा मिळाल्यावर, गावें त्यामागोमाग ओघानेच येतात.

४. नवीन जमीन लागवडीखाली आणण्याची अधिक शक्यता, वरचेवर होणारें स्थलांतर व जंगलांतील उत्पन्नाचा आधार या प्रमुख कारणांमुळे आदिवासी माणसाला जमिनीच्या 'मालकीची आसक्ति' नाही. शेती अत्यंत मागासलेली असल्याने चांगल्या जमिनी वगळून आदिवासी जमिनीचें हस्तांतर करण्यास लवकर तयार होतो.

५. विश्वनाथ पटनायक यांच्या भू-सत्याग्रहाशीं ग्रामदानाचा सांधा परिस्थितीने न कळत जोडल्यामुळे 'ही जमीन मिळवून देणारी चळवळ आहे' असा पुष्कळ आदिवासींचा सुरुवातीपासूनच ग्रह झाला. ही 'लाभाची प्रेरणा' निर्माण व्हायला आणखीहि कांही जवळचीं कारणें घडलीं. 'नवजीवन मंडळ' या तेथील स्थानिक संस्थेने या चळवळी-पूर्वी आदिवासींना कांही रोख पैशांची मदत व बैलजोड्यांचें वाटप केलें होतें. या मंडळाचे कार्यकर्तेच पुढे ग्रामदान-प्रचारालाहि गेले, तेव्हा 'ग्रामदान म्हणजे मदतीचाच नवा प्रकार असावा' अशी

आदिवासींची कल्पना झाली. कांही ठिकाणीं तर ही समजूत कार्यकर्त्यांनीच जोपासली. त्या वेळीं ओरिसाचें मुख्यमंत्रिपद श्री. नभकृष्ण चौधरी यांचेकडे होतें. ते स्वत: व त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती मालतीदेवी या उभयतांनी जेव्हा या आंदोलनांत हिरीरीने भाग घेण्यास सुरुवात केली तेव्हा तर सरकारी यंत्रणाहि आदिवासींच्या कल्याणासाठी झुलूं लागली. नायकांना थोर थोर मंडळींचा सहवास घडूं लागला. त्यांच्या प्रतिष्ठेंत अचानक वाढ झाली. या साऱ्या इतमामामुळे आदिवासी नायकाची 'लाभप्रेरणा' अधिकच बळावली आणि ग्रामदानांचा उठाव झपाट्याने झाला.

या 'लाभ-प्रेरणे'चें अस्तित्व अनेक तज्ज्ञ निरीक्षकांना जाणवल्याशिवाय राहिलें नाहीं.

एक प्रख्यात भूदान-विचारक कोरापुटचा पांच दिवसांचा दौरा पूर्ण केल्यावर या प्रेरणेविषयी लिहितात—

"What then were the motivations for the Gramdan? A vague feeling that it will bring about village development and other benefits, appear to have influenced the villagers. Some of them were carried away by the atmosphere created by the movement, without a full realisation of the consequences."

"तर मग लोकांनी ग्रामदानें कां दिलीं? तीं देण्यामागील त्यांचे हेतु कोणते असावेत? आपल्या गावाला कांही विशेष मदत मिळून त्याचा विकास घडून येईल अशी अस्पष्ट भावना (ग्रामदान करणाऱ्या) गावकऱ्यांच्या मनांत प्रबळपणें वावरत असावी असें वाटतें. कांही लोक तर ग्रामदानाचा आशय पूर्णपणें ध्यानांत न आणतां केवळ वातावरणाचा परिणाम म्हणूनच चळवळींत सापडले गेले."

ग्रामदान हें हृदयपरिवर्तनामुळे झालेलें नसून त्यांत सुष्ट-दुष्ट इत्यादि सर्व मानवी प्रेरणा व्यक्त झालेल्या आहेत, त्यांत कांही वेळां त्याग-

भावनेचें दर्शन घडलें तरी सर्वसामान्य स्वार्थवृत्तीहि अनेक ठिकाणीं प्रकट झाली आहे, एवढी गोष्ट स्पष्ट करण्यासाठी हा सारा ऊहापोह येथे केला. कोरापुटमध्ये विकासकार्यांचें संचालन दोन वर्षे श्री. के. आर. दात्ये यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली चालू होतें. या दीर्घ कालावधींत त्यांना ग्रामदानाचीं सारीं अंगोपांगें जवळून पाहतां आलीं. एका लेखांत त्यांनी या विषयावर पुढील अभिप्राय व्यक्त केला आहे :

"The motivation for Gramdan is very difficult to analyse, a complex set of material as well as non-material incentives may lead to the voluntary gifts cf land. The appeal to the essential goodness of man may be effective in many cases, particularly when it comes from men of high moral stature like Vinobaji. However, material aspects cannot be ignored; experience seems to indicate that it may be hazardous to do so." —'Gramdan' Nov. 1957.

"ग्रामदानाची हेतुचिकित्सा करणें हें अवघड काम आहे. जमिनीचें स्वेच्छादान करतांना सत् किंवा असत्, जड किंवा उदात्त अशा उभयविध प्रेरणा दात्यांच्या ठिकाणीं असण्याचा संभव आहे. विनोबांसारख्या एखाद्या श्रेष्ठ सत्पुरुषाने लोकांच्या सत्प्रवृत्तींना केलेलें आवाहन पुष्कळ ठिकाणीं यशस्वी होण्याची शक्यता आहे. परंतु जड किंवा स्वार्थी प्रेरणांचें अस्तित्व नाकारून चालणार नाही. उलट तें नाकारणें धोक्याचें आहे, असाच अनुभवाचा कल आहे."

या अभिप्रायावर अधिक भाष्य करण्याची आता गरज नाही. ग्रामदानाची 'हेतु-चिकित्सा' येथवर पुरेशी झाली आहे. आता ग्रामदानाचें प्रत्यक्ष स्वरूपहि पाहिलें पाहिजे. पुढील प्रकरणांत त्याचा विचार करूं.

* * *

४

# ग्रामदानाचें सत्य स्वरूप

युगोस्लाव्हिया आणि कोरापुट यांच्यांत तशी कोणतीच जवळीक नाही. पण एक व्यक्ति मार्शल टिटोच्या देशांत प्रवास करण्यासाठी निघाली आणि कोरापुटमध्ये दाखल झाली. नगीन पारीख हें या व्यक्तीचें नांव. ऐश्वर्यसंपन्न कुटुंबांत जन्म झाल्याने उच्च शिक्षणासाठी त्यांनी १९५२ मध्ये ऑक्सफोर्डचा मार्ग पत्करला आणि अर्थशास्त्र व राज्यशास्त्र हे विषय घेऊन ते पदवीपरीक्षा उत्तीर्ण झाले. पुढे एक वर्ष त्यांनी युरोपमध्ये प्रवासांत घालविलें. या प्रवासांत त्यांना युगोस्लाव्हियांतील जनतेविषयी विशेष जिव्हाळा निर्माण झाला. हिंदुस्थानांत परतल्यावर त्यांनी युगोस्लाव्हियांतील 'लोकवाङ्मया'चा अभ्यास करण्यासाठी पुन्हा तिकडे जाण्याचा बेत आखला. परंतु जाण्यापूर्वी १९५६ मध्ये ते सहज विनोबांना भेटण्यासाठी म्हणून गेले. या भेटींत त्यांचा सारा कार्यक्रमच बदलला. युगोस्लाव्हियाऐवजी विनोबांनी त्यांना कोरापुटचा रस्ता दाखविला. आणि हा तीस वर्षांचा पाश्चात्यविद्याविभूषित तरुण रूढ राजमार्गाचा त्याग करून कोरापुटच्या आडवाटेला लागला. १९५६ च्या एप्रिल महिन्यांत नगीन पारीख कोरापुटमध्ये दाखल झाले. त्यांना ग्रामदानाचा संदेश आदिवासींना ऐकवण्याची विशेष घाई नव्हती. म्हणून प्रथम कांही काळ त्यांनी 'उडिया' भाषा आत्मसात् करण्यांत घालविला आणि नंतर 'लिंबागुडा' या एका ग्रामदानी गावांत जाऊन निवांतपणे त्यांनी आदिवासींच्या जीवनांत प्रवेश करण्यास सुरुवात केली. आज दोन वर्षे ते या भागांत स्थिरपणे कार्य करीत आहेत. हा गाव

जयपूरच्या मुख्य ग्रामदान-कार्यालयापासून जवळ असल्याने गेल्या दोन वर्षांत येथे जयप्रकाश नारायणांपासून तो चिल्लर 'बघ्यां'पर्यंत अनेक लोक वरचेवर 'भेटी' देऊन गेले आहेत. या वर्दळीला नगीनजींचें चिंतनशील मन जरा कंटाळलें आहे. म्हणून त्यांना त्रास न देतां आपण या 'लिंबागुडा' गावांत एक फेरफटका करून येऊं.

हा गाव कोरापुटच्या जवळजवळ मध्यावर आहे. गावची लोकसंख्या अडीचशे असून सुमारे चाळीस-एक कुटुंबांची वसति येथे आहे. या अडीचशे लोकांनी सुमारे साडेचारशे एकर जमीन आतापर्यंत लागवडीखाली आणली असून अद्याप दोनशे एकर जमीन पडीक आहे. या गावांतील आदिवासी प्रजा भूमिया जमातींतील असल्यामुळे बरीचशी सुधारलेली आहे. येथील घरें पृथक् पृथक् आहेत. गावाची रचनाहि थोडी वेगळी आहे. सर्वत्र कमालीची स्वच्छता व नेटकेपणा यांचें दर्शन होतें. गाव सुधारकवृत्तीचा आहे हें त्यांत प्रवेश केल्याबरोबरच जाणवतें. येथील आदिवासी शेतकरीहि चांगलाच पुढारलेला आहे.

या गावचें नेतृत्व आदिवासी परंपरेप्रमाणे एका नायकाकडे होतें. हा नायक जयपूरच्या महाराजाला या भागांतील सारावसुलीला आतापर्यंत मदत करीत असल्यामुळे त्याचा दबदबा व वजन चांगलेंच होतें. १९४२ च्या 'चलेजाव' आंदोलनांत त्याने इतर आदिवासींप्रमाणे भाग घेऊन कांही काळ तुरुंगवासहि पत्करला. सार्वजनिक कार्याची परंपरा मागे असल्याने ग्रामदान आंदोलनांतहि त्याने चटकन् पुढाकार घेतला. या भागांतील बरींचशीं ग्रामदानें त्याच्या प्रयत्नामुळेच मिळालेलीं आहेत. सर्व दृष्टीने अनुकूलता असल्यामुळे येथे 'सर्व सेवा संघा'ने ताबडतोब पुनर्रचनेचें कार्य सुरू केलें. आठ-दहा कार्यकर्त्यांचा चांगला संच नगीन पारीख यांच्या नेतृत्वाखाली येथे नवनिर्मितीचें कार्य करूं लागला. पहिला प्रश्न जमीन-वाटपाचा. दुर्दैवाने या नायकाची एकट्याचीच १०० एकर चांगली जमीन होती. शिवाय कांही लटपटी व

लबाड्या करून त्याने इतरही कांही चांगल्या जमिनी कबजांत घेतल्या होत्या. याची गावांत बरीचशी सावकारीहि होती व याच्या शेतावर राबणाऱ्या वेठ-मजुरांना हा वर्षाकाठी अवघा अठरा-वीस रुपये पगार देत असे. असा सावकार-मालक समान वितरणाला कसा तयार होईल! त्याने हळूहळू अंग काढून घेतलें व कांही काळानंतर तो ग्रामदानाचा शत्रु बनला. कार्यकर्त्यांनी आदिवासी शेतकऱ्यांना कर्जे देण्यास सुरुवात केली तसतशी याची सावकारीहि धोक्यांत आली व तो नाना कारवाया करण्यासहि उद्युक्त झाला. गावांत दमदाटी वगैरे प्रकार करून त्याने एक विरोधी गट तयार केला. त्यामुळे कार्यकर्त्यांना गावच्या विकासाचे कार्यक्रमहि बराच काळ हातांत घेतां आले नाहीत. किरकोळ कुरापती-वरून त्याने खुद्द नगीन पारीख यांनाहि एका कायद्याच्या लफड्यांत गुंतवून कोर्टाचे खेटे मारावयास भाग पाडलें होतें. परंतु नगीन पारीख यांच्या संथ व कनवाळू धोरणामुळे तूर्त वातावरण बरेंच निवळलें आहे. गावांत कांही विकासाचीं कामेंहि पार पडलीं आहेत. आदिवासी स्वयं-स्फूर्तीने व आपुलकीने कार्यकर्त्यांशीं सहकार करीत आहेत. ग्रामसभा स्थापन झाली असून ती जबाबदारीने गावच्या कारभारांत लक्ष घालीत आहे. नायकाचें हृदयपरिवर्तन होण्याची शक्यता नसली तरी त्याची पकड ढिली होत आहे. नवें स्थानिक नेतृत्व हळूहळू उदयास येत आहे.

परंतु ही जागृति 'अहिंसक-जनशक्ती'पासून फार फार दूर आहे. गाव सुधारक असल्याने येथील आदिवासी, जमातीच्या व कुटुंबाच्या जन्मजात बंधनांतून बराच मोकळा झालेला आहे. 'परिवार-भावना' इतर ठिकाणांपेक्षा मुळांतच कमी व ग्रामदानानंतर ती अद्याप निर्माणहि झालेली नाही. जागृति आहे, परंतु 'ग्रामपरिवार' नाही. ग्रामदान होऊन तीन वर्षे उलटलीं तरी येथील जमीन-वाटपाचा प्रश्न सुटला नाही. विषमतेचें प्रमाण फार मोठें आहे. निम्मी जमीन मूठभर लोकांच्या हातांत अजूनहि केंद्रित झालेली आहे.

नगीन पारीख यांच्या सांगण्यावरून ही विषमता नजीकच्या काळांत कमी होण्याची शक्यताहि फार कमी आहे.

परंतु जेथे जमिनीच्या वाटपाचा प्रश्न पूर्ण सुटला आहे असें 'गरांडा' हें दुसरें ग्रामदान घेऊं. हा गाव आंध्राच्या सीमेवर असल्याने या भागांतील आदिवासी तेलगू भाषा बोलतात. गावची लोकसंख्या सव्वाशेच्या आसपास आहे. या भागांतील कांही कांही गावें फारच लहान आहेत. गरांडा केंद्राच्या परिसरांत असलेल्या हजारींडंग या खेड्याची वसति साठ तर करणीगुडा या दुसऱ्या एका गावची संख्या फक्त पसतीसच आहे. कोरापुटचा हा सारा भागच फार मागासलेला आहे. मोटार-रस्ता सोडून आंत पांच-सहा मैल जंगल तुडवीत गेलें की, दोन डोंगरांच्या मध्ये वसलेलें 'गरांडा' हें गांव लागतें. वाटेंत भेटणाऱ्या गावांवर दारिद्र्याची अवकळा फार दाटवर पसरलेली दिसते. त्या स्वच्छ निर्मळ झोपड्या व झाडून सारवलेलीं अंगणें, ती साधी पण कलात्मक रंगरंगोटी यांची शोभा येथे दिसत नाही. बहुतेक गावांत आळस आणि दारू यांचें प्रमाण जबरदस्त आहे. दिवसभर कष्ट करून येथील कंध किंवा सांवरा जमातीचा आदिवासी टोपलीभर मोहाचीं फुलें गोळा करील, एखाद्या दारू गाळणाऱ्या माणसाला ही टोपली चार-सहा आण्यांना विकून टाकील आणि घरीं मुलाबाळांना उपाशी ठेवून ही कमाई दारूच्या एखाद्या पेल्यांत बुडवून टाकील. झोपडीबाहेर खाटलें टाकून दारूच्या नशेंत झिंगत पडलेले कितीतरी आदिवासी, या भागांत प्रवास करतांना आढळतात. अशा या 'बुडालेल्या' भागाला वर ओढण्याचें कार्य 'गरांडा' केंद्रांतून श्री. गोविंद रेड्डी ही एक प्रखर ध्येयनिष्ठ व्यक्ति करीत आहे. यांचा जन्म धारवाड जिल्ह्यांतील एका खेड्यांत शेतकरी कुटुंबांत झाला असून आज वयाने ते चाळिशीच्या आसपास आहेत. व्यवसायच शेतीचा असल्याने या विषयाची सर्व बारीकसारीक माहिती व ज्ञान रेड्डीजींजवळ भरपूर प्रमाणांत आहे.

१९४२ मध्ये त्यांनी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला पत्र लिहून ब्रिटिश सरकारने केलेल्या गांधीजींच्या अटकेचा कडक शब्दांत निषेध केला. याचा परिणाम म्हणून तुरुंगवास त्यांच्या पदरीं आला. सुटल्यावर ते सेवाग्रामला गेले व तेथे शेतीवर त्यांनी नाना प्रयोग करण्यांत सात-आठ वर्षें खर्च केली. १९५४ पासून मध्यप्रदेशांतील सागर जिल्ह्यांत त्यांनी दोन वर्षें भूदान-पदयात्रा केली व १९५६ च्या जानेवारी महिन्यांत कोरापुटमध्ये प्रवेश करून त्यांनी गरांडा केंद्राचें कार्य शिरावर घेतलें. आज दोन वर्षांत त्यांनी गरांडा व आसपासचीं तीन-चार गावें यांत एक 'चमत्कार' घडवून आणला आहे. या चमत्काराची हकीकत त्यांच्याच लेखणींतून उतरलेली असल्याने त्यांतील महत्त्वाचा सारांश येथे देतों:

During my twenty months' stay in Koraput I have been studying factors here through personal experimentation and observations, discussions with others and study of the relevant literature. Gramdan in short means abolition of individual ownership of land and emergence of community ownership in a village. But I feel, after declaration of Gramdan the land problem is not solved. I refer to an instance of my own centre at Garanda. Workers last year had distributed land in seven villages before I came into the picture. Studying the land-distribution from the community development point of view I found things quite disappointing. The land-owners had five or six well-consolidated plots of say five or six acres each, whereas the landless had fragments of barren and waste land, scattered at five or more different places.

I placed all these facts before the Bhoodan workers and gave my views on distribution. They tried at distri-


bution nearly five times but failed to give practical shape to the correct concept of distribution, because they had at an early stage given an assuarance to the previous owners that good land will remain under them."

"आज वीस महिने मी कोरापुटमधील परिस्थितीचा अनेक अंगांनी विचार करीत आहें. कार्यकर्त्यांशीं विचारविनिमय केला; संदर्भ-साहित्याचें वाचन केलें. शिवाय प्रत्यक्ष प्रयोग करून कांही अनुभवहि घेतले. जमिनीवरच्या खाजगी मालकीचें पूर्ण विसर्जन करून सारी जमीन ग्रामपरिवाराच्या मालकीची करणें ही माझ्या दृष्टीने ग्रामदानाची थोडक्यांत व्याख्या आहे. परंतु ग्रामदान जाहीर झाल्यावर या दृष्टीने जमिनीचा प्रश्न सोडविला जात नाही, असा माझा अनुभव आहे. मी काम करीत असलेल्या गरांडा केंद्राचें उदाहरणच या दृष्टीने मोठें पाहण्या-सारखें आहे. मी येण्यापूर्वी भूदान-कार्यकर्त्यांनी गावाचें जमीनवाटप पूर्ण केलें होतें. परंतु या वाटपांतील विषमता पाहून माझा फारच अपेक्षा-भंग झाला. मुख्य मुख्य जमीनमालकांकडे गावांतील चांगल्या जमिनी ठेवण्यांत येऊन भूमिहीनांना इकडेतिकडे विखुरलेले पडीक जमिनीचे तुकडे देण्यांत आले होते.

मी ही परिस्थिति (वरिष्ठ !) भूदान कार्यकर्त्यांसमोर ठेवली व त्याबरोबर वाटपाचा माझा कार्यक्रमहि सांगितला. परंतु गावांतील चांगल्या जमिनींच्या मालकांना त्यांच्या जमिनी त्यांच्यापाशीच ठेवल्या जातील, असें पूर्वीच्या कार्यकर्त्यांकडून आश्वासन दिलें गेलें असल्याने पांच-सहा वेळां प्रयत्न करूनहि वाटप-पद्धतींत कोणतीहि सुधारणा घडूं शकली नाही."

ही परिस्थिति रेड्डीजींना चीड आणणारी होती. त्यांनी गावांत सभा घेतल्या. ग्रामदान रद्द करण्याची भीति घातली. समान वाटप झाल्यावर उत्पन्न कसें वाढतें, हें प्रत्यक्ष दाखवून दिलें. शेवटीं वाटणीला गावकरी

तयार होईपर्यंत आपण कुठलीहि मदत गावाला करणार नाही, असें असहकाराचें धोरणहि त्यांनी पुकारलें. इतकी पाळी आल्यावर गावकरी वळणावर आले व त्यांनी रेड्डीजींच्या मार्गदर्शनाखाली जमिनीचे सारखे





ग्रामदानापूर्वीचें गरांडाचें जमीन-वाटप.

0044

तुकडे करून गावची जमीन वाटून घेतली. या वाटपासंबंधी रेड्डीजी लिहितात—

" The whole village land was divided into four zones; one of them was distributed as under. The total land was measured and sub-divided according to its quality, good or bad. The map was prepared and numbers alloted to each plot. Nearly 115 plots of say, 30, 40, 50 and 75 cents were prepared. Demands came from people for




ग्रामदानानंतरचें गरांडाचें जमीन-वाटप.

particular plots, but the community readily agreed that satisfactory distribution will be possible only by casting lots.

Accordingly, two plots of 30 and 50 cents went over to each family but plots of 40 and 75 cents were given exclusively to the landless people. This was executed by the total consent of the village."

Gramdan, August 1957.

"गावच्या साऱ्या जमिनीचे चार विभाग पाडण्यांत आले. एका विभागाची वाटणी पुढीलप्रमाणे करण्यांत आली. या विभागांतील साऱ्या जमिनीची प्रथम मोजणी करून तिची प्रतवारी लावण्यांत आली. नंतर प्लॉट्स् पाडून नकाशा तयार केला. प्रत्येक प्लॉटला नंबर ठेवला. तीस, चाळीस, पन्नास व पाऊणशे अंशांचे एकूण एकशे-पंधरा प्लॉट्स् तयार झाले (एक एकर = शंभर अंश). प्रथम विशिष्ट प्लॉट्स्च लोक मागूं लागले. परंतु याने वितरण योग्य होणार नाही याची सर्वांना खात्री पटली व शेवटी वाटणीला येतील त प्लॉट्स् स्वीकारण्याची लोकांनी तयारी दाखविली.

यानंतर तीस व पन्नास अंशांचे दोन प्लॉट्स् प्रत्येक कुटुंबाला देण्यांत आले व चाळीस व पाऊणशे अंशांचे प्लॉट्स् मात्र केवळ भूमिहीनांसाठी राखून ठेवले गेले. अर्थात् याला गावकऱ्यांची संमति होतीच."

आज गरांडाप्रमाणेच आसपासच्या तीन-चार खेड्यांतील जमिनीचें वाटप रेड्डीजींच्या गणिती पद्धतीने पार पडलें आहे. सारी जमीन एकत्र करून नंतर तिचे सारखे भाग पाडल्यामुळे वाटपाचें काम सुलभ झालें. या समान वाटपानंतर उत्पादनांतहि झपाट्याने वाढ होते, हें रेड्डीजींनी सिद्ध करून दाखविलें आहे. गरांडाचें उत्पन्न वाटपानंतर पूर्वीपेक्षा चौपट वाढलें आहे. खरोखरच रेड्डीजींचें कर्तृत्व गरांडामधील बर्फीच्या वड्यां-सारख्या शेतात उभे राहिल्याशिवाय ध्यानांत यायचें नाही.

परंतु हें इतर 'येरू 'ना जमणारें काम नाही. यासाठी रेड्डीजींप्रमाणे शेतीचें पूर्ण ज्ञान असणारी व्यक्तीच अवश्य आहे. शिवाय त्यांनी जें कष्ट आणि यातना सहन केल्या, प्रसंगीं जें कठोर व ताठर धोरण स्वीकारलें त्या साऱ्या गोष्टी करण्याचीहि तयारी पाहिजे. एरव्ही गरांडाची 'भूमिक्रांति' यशस्वी होऊं शकली नसती. 'भूमिक्रांती 'पूर्वी रेड्डीजींनी दारूबंदीसाठीहि असेच हरतऱ्हेचे उपाय योजले होते. अनेक सभा घेतल्या. दारूचे दुष्परिणाम समजावून दिले. प्रसंगीं वाक्ताडनहि केलें. एका गावांत तर दोन-तीन दारू गाळणारे आदिवासी त्यांनी अलगद पोलिसांच्या हातीं ठेवून तुरुंगाची हवा खायला त्यांना पाठवून दिले. आज गरांडा व आसपासचीं दोन-तीन गावें दारूच्या व्यसनांतून बऱ्याच प्रमाणांत मुक्त झालीं आहेत.

परंतु अशी शंका अनेक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली की, रेड्डीजीचें हें यश टिकाऊ ठरणार नाही. ते दूर झाले तर गावकरी पुन्हा आपल्या जुन्या वळणावर गेल्याशिवाय राहणार नाहीत. पुढे काय होईल याचा अंदाज बांधणें आज तरी उपयुक्त नसल्याने तूर्त इतकेंच म्हणावेंसें वाटतें की, रेड्डीजींच्या गरांड्यांत स्थानिक, स्वयंस्फूर्त व सामुदायिक नेतृत्व अद्याप उदयास आलेलें नाही.* गरांड्यांत ग्रामसभेचें अस्तित्व नाही. रेड्डीजींच्या विचारसरणींतहि अशा प्रातिनिधिक संस्थांना महत्त्वाचें स्थान असावें असें दिसत नाही. 'आजच्या परिस्थितींत अशा संस्था चार मोठ्या जमीनधारकांच्या हातांतील खेळणीं बनल्याशिवाय राहणार नाहीत. जमिनीचें समान वाटप व पुढील निर्माण-कार्य करण्या-

* "If village Garanda has succeeded in stepping up production and expediating equitable distribution, it has failed to create new leadership."

Gramdan : July 1957
Article by the Editor.

साठी तज्ज्ञ कार्यकर्त्यांचें दल उभें करणें हाच आजच्या परिस्थितींत एकमेव उपाय आहे' असा स्पष्ट अभिप्राय त्यांनी प्रत्यक्ष भेटीच्या वेळीं व्यक्त केला; त्यावरूनहि त्यांच्या प्रयोगांतील 'व्यक्तिप्राधान्य' व्यक्त झाल्याशिवाय राहत नाही.

दोन प्रातिनिधिक गावांची कथा ही अशी आहे. इतरत्र काय घडलें, याचाहि थोडा विचार केला पाहिजे. जमीन-वाटपाचा प्रश्न अगदी सुरुवातीलाच हातांत घेतला गेला. ४—५ कार्यकर्त्यांची एक अशा १०-१२ तुकड्यांनीं गावोगाव जाऊन जमिनीचें वाटप पूर्ण करावें असें ठरलें. त्याप्रमाणे एप्रिल व मे १९५६ हे दोन महिने या कार्यांत खर्च झाले. पुढे पावसाळा लागल्याने हा कार्यक्रम जो एकदा तहकूब झाला तो पुन्हा नेटाने हातीं घेतला गेलाच नाही. तुकडी गावांत गेली की बहुधा नायकाच्या झोपडींत मुक्काम टाकी. गावकऱ्यांना त्यानंतर जमविलें जाई. लोकसंख्येची मोजदाद होई. दुसऱ्या दिवशीं प्रत्यक्ष शेतांत गावकरी व कार्यकर्ते जाऊन जमिनीची मोजणी करीत. कार्यकर्त्यांना मोजणीचें शास्त्रीय ज्ञान नसल्याने जेथे शक्य झालें तेथे सरकारी अमीनाची मदत घेण्यांत आली. मलेरियाची बाधाहि अनेक ठिकाणीं कार्यकर्त्यांना संत्रस्त करीत असे. परंतु या अडचणींतून कसाबसा मार्ग काढून वाटपाचें काम कार्यकर्ते पार पाडीत होते. वाटपाचे वेळीं सावकार किंवा मोठा जमीनदार यांच्या बाजूला झुकतें माप ठेवण्याची गरज कार्यकर्त्यांना बहुतेक ठिकाणीं भासली. कुठल्याहि गावांत गावची सारी जमीन प्रथम एकवट ( Consolidation ) करण्यांत आली नाही. जमिनीचें व्यक्तीव्यक्तीने हस्तांतर केलें. मालकी हक्काचें विसर्जन होऊन गावची सारी जमीन कुठेहि कार्यकर्त्यांच्या हातांत आली नाही. गावांतील भूमिहीनाला जमीन मिळवून देणें एवढी एकच कसोटी जमीन-वाटपाचे वेळीं कार्यकर्त्यांनी मनाशीं बाळगली असावी असें वाटतें. त्या दोन महिन्यांत सुमारे ४७५ गावांत वरीलप्रमाणे वाटपाचा कार्यक्रम पूर्ण झाला. त्यानंतर

सुमारे दीड-दोनशें गावांची भर यांत पडली असें समजतें. परंतु वाटप झालेल्या गावांत विषमता निदान एकास तीन व कांही ठिकाणीं पांच या प्रमाणांत आजहि कायम आहे. कोरापुटाला लागून असणाऱ्या बालासोर या जिल्ह्यांत गावांतील ४० ते ५० टक्के जमीन गावाबाहेर राहणाऱ्या मोठ्या जमीनधारकांच्या मालकीची होती. हे जमीनधारक अलिप्त राहिले तरी गावें ग्रामदान म्हणून जाहीर झालीं! आता वाटपाच्या वेळीं समतेचीं तत्त्वें या परिस्थितीत कशीं अमलांत येऊं शकणार! अशीच स्थिति कोरापुटमध्येहि कमीजास्त प्रमाणांत अनेक ठिकाणीं होती. रेड्डिजींनी गरांडयाच्या परिसरांत असलेल्या बुटांगी या गावचें शास्त्रीय व समान वाटप नुकतेंच पूर्ण केलें आहे. या गावांत पूर्वी भूदान-कार्यकर्त्यांनी जमीन-वितरणाचा कार्यक्रम पार पाडलेला असूनहि गावच्या दोनशे एकर जमिनीपैकी १५० एकर जमीन फक्त तीन लोकांच्या हातांत तशीच राहूं दिली होती. वाटप झालेल्या सहाशे गावांची ही तऱ्हा! उरलेल्या ७००-८०० गावांकडे कोणी लक्षहि दिलें नसावें असें दिसतें! कारण 'आपण ग्रामदान केलें आहे याची या गावकऱ्यांना आज आठवणहि शिल्लक उरली नसेल' असें कोरापुटमधील कार्यकर्ते विनोदानें केव्हा केव्हा एकमेकांशीं बोलतांना दिसतात!

कोरापुटमधील ग्रामदानी गावांच्या विकासकार्याचें मार्गदर्शन करणारे स्थापत्यविशारद् श्री. के. आर्. दात्ये यांनी एका ठिकाणीं पुढील अभिप्राय व्यक्त केला आहे. ते लिहितात—

"एकदा घडून आलेलें विषम जमीनवाटप गावकऱ्यांच्या अंगवळणीं पडतें, असा कोरापुटचा अनुभव आहे. शिवाय गावांतील वजनदार जमीन-मालक वाटप आपल्या फायद्याचें घडवून आणण्यांत चांगले यशस्वी होतात, असेंहि येथे दिसून आलेलें आहे. परंतु तीन वर्षांत ही परिस्थिति पालटून गावांतील जमीन वाटप जर समान होऊं शकलें नाहीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.

तर गाव ‘ ग्रामदानी ’ आहे हें म्हणणें बरोबर नाही. अशा गावाला ‘ समग्र भूदान गाव ’ असें फार तर म्हणतां येईल. ”*

श्री. दात्ये यांची वरील तीन वर्षांची सूचना मान्य केली,–आणि ती करणेंच ‘ अनाग्रही ’ वृत्तीचें लक्षण ठरेल........तर १४०० पैकी फार तर चार गावेंच ग्रामदान ’ म्हणून शिल्लक राहतील.

श्री. गोविंद रेड्डींचाहि या समान-वितरणावरच विशेष कटाक्ष आहे. ते म्हणतात—

“ ग्रामीण जनतेचा उद्धार ग्रामदानामुळेच होईल, यावर माझा अढळ विश्वास आहे. परंतु आजकाल ग्रामदानांत प्रचलित असणाऱ्या वाटप-पद्धतीला मात्र माझा विरोध आहे. अशीच स्थिति चालू राहिली तर श्रीमंत शेतकरी अधिक श्रीमंत होईल व गरिबांची गरिबी वाढतच जाईल. सर्व शक्ति पणास लावून जमिनीच्या प्रश्नाला हात न घालतां आपण केवळ ग्रामदानी गावांची संख्या फुगवत चाललों तर ग्रामदानाचें महत्त्व कमी झाल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराहि मला देऊन ठेवावासा वाटतो. ”

याच स्वरूपाचें मतप्रदर्शन कोरापुट पाहून आलेल्या एका प्रख्यात भूदानविचारकांनी एके ठिकाणीं केलें आहे. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा :—

‘ गावांतील साधनसंपत्तीचा विनियोग समतेच्या तत्त्वानुसार व्हावा, ही ग्रामदानामागील मूलभूत प्रेरणा आहे. परंतु बहुसंख्य खेड्यांतून या प्रेरणेचें अस्तित्व जाणवतच नाही. गाव तांत्रिक दृष्ट्या जरी ग्रामदानी असलें तरी जमिनीचें समप्रमाण वितरण कांही झालेलें नाही. या विषम वाटपाला गावांतील आर्थिक दृष्ट्या कमजोर व मागासलेल्या लोकांचा विरोध नसतो, ही समजूतहि बरोबर नाही. ग्रामदान होण्यापूर्वी गावचें

---

* Methods of Land Management, ‘Gramdan’ Oct. 1957

पुढारीपण गावांतील मूठभर श्रीमंतांकडे असे. ग्रामदानानंतर ही स्थिति पालटणें अवश्य होतें. परंतु तें घडूं शकलें नाही. इतकेंच नव्हे तर या मूठभर वर्गाने एक तर समान वितरणाला कसून विरोध तरी केला असला पाहिजे किंवा विषम वाटपाला साऱ्या गावकऱ्यांचा पाठिंबा आहे अशी ग्रामदान कार्यकर्त्यांची चुकीची समजूत पटवून देण्यांत त्यांना यश तरी आलें असलें पाहिजे.'

हे विचार सव्वा वर्षांपूर्वी कोरापुटमध्ये गेलेल्या व्यक्तीचे आहेत. त्यानंतर परिस्थितींत वाटपाबाबत कांही सुधारणा घडून आली आहे काय! गावांतील 'जनशक्ति' जर जागृत झाली असेल तर सुरुवातीस कार्यकर्त्यांच्या अननुभवामुळे किंवा मोठ्या जमीनदारांच्या विरोधामुळे घडून आलेलें विषम वाटप बदललें जाण्याची शक्यता आहे. परंतु कांही अपवाद सोडल्यास ग्रामदानी गावातून विनोबांना अभिप्रेत असणारी 'अहिंसक जनशक्ति' जागी झाली असल्याचें लक्षण कोरापुटमध्ये आज तरी दिसत नाही. एकच उदाहरण घेऊं. वाटपाचे वेळीं गावांतील एकूण जमिनीच्या दहा टक्के जमीन गावजमीन म्हणून वेगळी काढून तिची गावकऱ्यांनी श्रमदानाने कसणूक करावी, असें ठरविण्यांत आलें. परंतु प्रत्यक्षांत दहा टक्क्यांऐवजी सरासरी दोन टक्केच जमीन अशा तऱ्हेने गावजमीन (Community Land) म्हणून वेगळी काढली गेली. शिवाय हिच्या कसणुकीची संपूर्ण आबाळ चालू आहे तें वेगळेंच! गाव जर जागा झाला असेल, त्यांत नवीन सामुदायिक जीवनाची ओढ जर निर्माण झाली असेल, तर आपापल्या जमिनींप्रमाणेच गावकऱ्यांनी या गावाच्या तुकड्याचीहि मन लावून मशागत करणें अवश्य होतें! परंतु एक-दोन गावें सोडल्यास चांगली मशागत दूरच राहिली. साधी नांगरट करण्यासहि गावकऱ्यांनी पुढाकार घेतला नाही, असा अनुभव आहे. या सामूहिक मालकीच्या जमिनीच्या उत्पादनांतून गावकऱ्यांना

असलेलें एकूण सर्व कर्ज फिटलें जावें, सरकारी करहि यांतूनच भागविला जावा, अशी मूळ कल्पना होती. याबावत फक्त गरांडा केंद्राची प्रगति अभिमानास्पद आहे. इतरत्र उत्पादनच नसल्याने यापुढील विनियोगाचा प्रश्नच उद्‌भवला नाही. परंतु अपवाद जरी असला तरी गरांडाचें उदाहरण येथे देण्यासारखें आहे. गावांतील ३१ कुटुंबांना एकूण चार हजार रुपयांचें कर्ज होतें. प्रत्येकाने आपापलें कर्ज फेडायचें म्हटलें असतें तर कदाचित् एक-दोन पिढ्याहि हें काम उरकूं शकलें नसतें. तेव्हा सर्वांनी सामुदायिक मालकीच्या गावजमिनीची कसणूक करून हें कर्ज फेडायचें ठरविलें. नऊ एकरांच्या गावजमिनीच्या पट्टयांतून भाताचें उत्पादन काढल्यावर सुमारे पांच वर्षांत हें कर्ज फिटावें असा रेड्डीजींचा अंदाज होता. परंतु गावकऱ्यांनी दोन वर्षांतच कर्जाचा निकाल लावून टाकण्याचा निश्चय केला. त्यासाठी त्यांनी नऊ एकरांत तीन एकरांची आणखी भर घातली व पांच एकर नवीन जमीन लागवडीखाली आणली. या सतरा एकरांतून दोन वर्षांत गावचें सर्व कर्ज फिटेल, अशी रेड्डीजी आता ग्वाही देत आहेत!

सर्व सेवा संघाने सुरुवातीपासून चालू केलेली सहकारी दुकानें हाहि जागृति अजमावण्याचा एक प्रकार होऊं शकतो. सुमारे तीस-चाळीस दुकानांपैकी दोन-तीन दुकानें चांगल्या स्थितींत आज चालू आहेत. सर्वांत यशस्वी दुकान बूर्झा या केंद्रांतील आहे. गावांतील ५७ लोकांनी एकूण रु. ८५=५० न. पै. एवढी रक्कम शेअर भांडवल म्हणून उभी केली व सर्व सेवा संघाने ९०० रुपये बिनव्याजी कर्जरूपाने दिले. आज सरासरी रोजची विक्री ७० रुपयांपर्यंत आहे, तर जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर या हंगामाच्या महिन्यांत ती रोज ५०० रु. पर्यंत जाते. किंबहुना गावांतील विकासकार्याचा पाया या दुकानामुळेच घातला गेला असें समजायला हरकत नाही.

याशिवाय गावकऱ्यांनी आपल्या मजुरींत १२॥% टक्के स्वयंस्फूर्तीने

कपात करून शेअर-भांडवल जमविल्याचें उदाहरण एका केंद्रांत घडलें आहे; तर दुसऱ्या ठिकाणीं गावांतील तरुण आदिवासींनी एक महिना गावासाठी श्रमदान करून कांही विकास-कार्य पार पाडल्याचेंहि ऐकिवांत आहे. हीं सर्व जागृतीचीं लक्षणें तुरळक असलीं तरी अभिमानास्पद आहेत म्हणून त्यांचा वर उल्लेख केला. परंतु याला 'अहिंसक जनशक्ति' हें नांव देणें ही शब्दाची फारच ओढाताण होणार आहे. गरांडा केंद्राचें उदाहरण वर दिलें आहे; परंतु दोन वर्षांपूर्वी गावकरी या मार्गाचें अनुकरण करण्यास तयार नव्हते ! त्या वेळीं हाच कर्जनिवारणाचा प्रश्न निघाला असतां 'इतरांच्या कर्जासाठी मीं काय म्हणून कष्ट करावे !' हीच वृत्ति गावकऱ्यांनी प्रदर्शित केली. परंतु वैयक्तिक प्रयत्नाने हा कर्जनिवारणाचा प्रश्न सुटूं शकत नाही हें जेव्हा पक्कें ध्यानांत आलें त्याच वेळीं गावकरी या सामुदायिक प्रयत्नाला तयार झाले, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. 'अहिंसक जनशक्ती'ची प्रक्रिया नेमकी या उलट असायला हवी. 'परिवारासाठी मी वाटेल ती झीज सोसायला तयार आहें' अशी गावकऱ्यांची वृत्ति पाहिजे. ती कोरापुटमध्ये क्वचित् ठिकाणींच दिसत असल्याने आज 'अहिंसक जनशक्ती'चें अस्तित्व येथे गृहीत धरणें चूक ठरेल असें वाटतें.

जमिनीचें वाटप, मानासिक परिवर्तन याप्रमाणेच 'ग्रामसभा' हीहि ग्रामदानाची आपण एक कसोटी मानली आहे. 'अहिंसक जनशक्ति' नसली तरी जी कांही थोडीबहुत जागृति दृष्टोत्पत्तीस येईल तिला संघटित स्वरूप देऊन ग्रामपरिवाराचें नियोजन व नेतृत्व करणारी ग्रामसभा तरी ग्रामदानी गावांत अस्तित्वांत आली की नाही, तेंहि थोडक्यांत पाहिलें पाहिजे. अशा प्रकारची संघटित व्यवस्था जर गावांत उभी नसेल तर सुरुवातीला समान वाटप होऊनहि उपयोग नाही हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. उदाहरणार्थ गावांतील लोकसंख्येंत वरचेवर बदल होतात. गावावर कांही आपत्ति येतात. एखाद्या नवीनच झालेल्या कायद्याने

निरनिराळ्या जमिनींच्या उत्पादनक्षमतेंत एकदम फरक घडून येतात. या बदलत्या परिस्थितीची दखल घेऊन वाटपांत वरचेवर किंवा ठराविक काल-मर्यादेंत बदल घडवून आणले नाहीत तर नवीन विषमता गावांत रूढ होईल. यासाठी ग्रामदानी गावांत अशा संघटित व्यवस्थाशक्तीची उभारणी होणें तितकेंच अवश्य आहे की जितकें ग्रामस्थांचें मानसिक परिवर्तन अवश्य आहे.

प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी एक लेख लिहून ग्रामदान कल्पनेला आपला पाठिंबा व्यक्त केला आहे. परंतु ही कल्पना व्यवहारांत यशस्वी होणार असेल तर ग्रामसभा किंवा तत्सम कोणतीहि अधिकार धारण करणारी संस्था यांनी जमिनीच्या वाटपाबाबत सतत जागरूक व दक्ष राहिलें पाहिजे, असा स्पष्ट इशाराहि देण्यास ते चुकलेले नाहीत. ते लिहितात :—

" The idea thus brought out in the context of land management that each Gramdan village is a unit which is committed to a programme of consolidating land and creating units of efficient operation of it ( however interpreted ) and that this programme will proceed by stages & will be adopted to the needs of the situation in each village, all implies continuous operation of an organisation of authority in each Gramdan village. At each stage of further step in consolidation or creation of new efficient units, the Gramdan authority will have to exercise its rights regarding resumption and redistribution of land. A gradual process would be possible only if such rights continued to exist & were actively exercised. This again means that the Gramdan authority could not, at any stage, resign its powers or create permanent vested rights

against itself. If, therefore, at the initial or at any specific stage in the redistribution of land, possibilities of later distribution were closed, the elasticity of operation and the possibility of progress in the Gramdan village would also be closed. All this could be summed up perhaps best by saying that a Gramdan village in which resumption & redistribution of land are not active possibilities, would cease in fact to be a Gramdan village."

—Gramdan : Implications and Possibilities.

या साऱ्याचा इत्यर्थ असा की, प्रत्येक ग्रामदानी गावाने गावांतील सर्व जमीन प्रथम एकवट करून तिचे उत्पादनाच्या दृष्टीने सोयीस्कर पडतील असे विभाग पाडण्याचा कार्यक्रम आपल्यासमोर ठेवला पाहिजे. हा कार्यक्रम पायरीपायरीने अंमलांत येणें जरूर आहे; शिवाय स्थानिक परिस्थितीप्रमाणें यांत आवश्यक ते फेरबदलहि करावे लागतील. यासाठी प्रत्येक गावांत नियोजनाचे अधिकार धारण करणारी संघटित संस्था असणें अवश्य आहे. जमीन वाटपांत ठराविक कालमर्यादेने सुधारणा करीत जाणें अवश्य असल्याने या ग्रामसंस्थेला जमिनीबाबतचे आपले हक्क वरचेवर जागरूकपणें वापरावे लागतील. हे हक्क प्रत्यक्ष वापरले गेले तरच हळूहळू प्रगति दृष्टोत्पत्तीस येईल. यासाठी ग्रामसंस्थेने केव्हाहि जमीन धारण करण्याबाबतचे आपले हक्क विसर्जित करतां कामा नये. तसेच जमिनीबाबत हक्काचे नवीन हितसंबंध न जोपासण्याची दक्षताहि बाळगली पाहिजे. म्हणून सुरुवातीला किंवा पुढे एखाद्या विशिष्ट काळीं जमीन-वाटपांत सुधारणा करण्याची शक्यता नाहीशी झाली तर ग्रामदानी गावाच्या प्रगतीलाहि पूर्णविराम मिळाल्याखेरीज राहणार नाही. थोडक्यांत याचा सारांश इतकाच की, ज्या ग्रामदानी गावांत जमीन-धारणाचें व वितरणाचें कार्य प्रत्यक्षांत चालू नसेल तर तें गाव वस्तुतः ग्रामदानी होऊंच शकणार नाही.

कोरापुटमध्ये ग्रामसभा किंवा डॉ. गाडगीळ यांना वरील अवतरणांत अभिप्रेत असणारी 'संघटित ग्रामनियोजन व्यवस्था' अद्याप अस्तित्वांत आलेली नाही. येथील जमिनीचें वाटप ग्रामसभेमार्फत न होतां व्यक्ती-व्यक्तींनी आपापसांत केलेलें आहे. लिंबागुडा या केंद्रांत ग्रामस्थांना कर्जपुरवठा करण्याचा सर्व सेवा संघाने जो नुकताच प्रयोग केला त्यांतहि ग्रामसभेचें माध्यम उपयोगांत येऊं शकलेलें नाहीं. येथील कार्यकर्त्यांनी वैयक्तिक जबाबदारीवर कर्जपुरवठा केलेला आहे. किंबहुना ग्रामसभेची घटना अद्याप कागदावर असण्याची शक्यताहि बरीच आहे. कारण खेडें हा घटक मानावा की विशिष्ट लोकसंख्येवर ग्रामसभेची घटना अवलंबून ठेवावी या मूलभूत गोष्टीचा अद्याप निर्णय लागलेला नाही, अशी माहिती एका चांगल्या कार्यकर्त्याकडून समजली. यामुळे कार्यकर्त्यांनी ग्रामसभा संघटित न करतां आपापल्या जबाबदारीवर ठिक-ठिकाणीं कार्यें अंगावर घेतलीं, यांत आश्चर्य करण्यासारखें, कांही नाही. ग्रामसभा संघटित न करतां गावोगाव कार्यकर्त्यांनी केलेलीं विकास-कार्यें कांही वेळां कशीं विकृतीला कारणीभूत होतात याचें एक चांगलें उदाहरण एका पत्रव्यवहारांत सापडलें. त्यांतील कांही महत्त्वाचा भाग पहा :

A worker from a Centre in Gunupur–Gudari Block writes :

"Now I see that the villagers of Kimmzhola and Jaipanga do not part with land according to distribution and don't come to reason. These two villages have been given 19 bullock pairs and three hundred rupees as loan in terms of provisions, cloth and cash etc. The til seed has been harvested now; they do not bring it to us to repay their debts but stealthily pass it on to the Sahukars who invariably use counterfeit weights and measures. The villagers had these crops with the help of bullocks

and credit provided by us two years back. The request to pay our loans, even free of interest, out of the harvest, weighed and measured by their own hands falls on deaf ears. We have to quarrel quite often with the people and the Sahukars to make recoveries. What is the way out?"

या कार्यकर्त्याला कोरापुटचे प्रमुख संचालक मा. अण्णासाहेब सहस्रबुद्धे लिहितात—

"The worker through his letter has drawn the picture of a situation quite similar in many other villages....... I personally feel that all this is due to the fact that the villagers treated the worker also as a money-lender. The villagers faced a choice out of the two-the old one and the new money-lender in the worker. And they have chosen to remain under the old one. This precisely is the analysis of the behaviour of the villagers.

There is another factor. The worker takes on himself the whole burden of distributing things and recovering them back. The Gram-sabhas have not been properly organised and made to function. We should have taken work, just enough to stimulate thinking process in the people, but that was not done. We drafted the plans and set out to materialise them as if it was exclusively our job. It won't be a surprise if the community behaves in other centres also as it has done in this particular case under reference." (Gramdan, August 1957.)

कार्यकर्ता श्री. अण्णासाहेब यांना पत्राने कळवितो:—

"किमाझोला आणि जयपांगा येथील गावकरी वाटपाचे वेळीं कबूल केल्याप्रमाणे जमिनी सोडावयास तयार नाहीत व कितीहि समजावले

तरी ऐकत नाहीत. या दोन गावांना आपण ( सर्व सेवा संघामार्फत ) एकोणीस बैलजोड्या व धान्य, कापड, रोकड या स्वरूपांत सुमारें तीनशे रुपये कर्ज म्हणून दिलेले आहेत. आता पीक तयार आहे. परंतु आपलें कर्ज परत करण्याऐवजी, गावकरी चोरून चोरून पीक, खोटीं वजनें-मापें लावून फसविणाऱ्या आपल्या जुन्या सावकारांनाच नेऊन देत आहेत. हें पीक आपण दोन वर्षांपूर्वी दिलेल्या बैलजोड्या व रोकड मदतीमुळे गावकऱ्यांना काढतां आलें. आपण दिलेल्या कर्जावर व्याजहि नाही. शिवाय खोटीं वजनें-मापें घेण्याचाहि प्रश्न नाही. तरी आपल्या कर्जाची परतफेड होत नाही, याला काय करावें ? यामुळे गावकरी व सावकार या दोघांशींहि भांडण्याचा प्रसंग येऊन ठेपला आहे. यांतून कांही मार्ग आहे काय ? ”

श्री. अण्णासाहेब लिहितात :—

“ तुमच्या खेड्यांतील अनुभव हा प्रातिनिधिक आहे. पुष्कळ ठिकाणीं गावकऱ्यांची अशी वागणूक दृष्टीस पडली आहे. माझ्या मतें याला कारण एकच आहे. कार्यकर्ता हाहि एक सावकारच आहे, अशी गावकऱ्यांची समजूत झाली. जुना की नवा सावकार असा त्यांच्यासमोर प्रश्न पडला आणि त्यांनी साहजिकच जुना अधिक पसंत केला. त्यांच्या वागण्याचा हा सरळ सरळ अर्थ आहे.

यांत आणखीहि एक गोष्ट ध्यानांत धरली पाहिजे. कर्ज-वाटपाची व कर्ज-परतफेडीची सर्व जबाबदारी कार्यकर्ता आपल्याच अंगावर घेतो. ठिकठिकाणीं ग्रामसभा स्थापन करून त्यांच्यामार्फत हीं कामें व्हायला पाहिजेत तीं होत नाहीत. कार्यकर्त्यांनी गावकऱ्यांच्या विचाराला चालना देण्यापुरतेंच कार्य अंगावर घ्यायला पाहिजे होतें. परंतु ही मर्यादा न सांभाळतां आपण ही सारी आपली एकट्याचीच जबाबदारी आहे असें समजून कामाला लागलों. योजना आखल्या. अंमलबजावणीला निघालों.

शेवटीं असे अनुभव आले. गावकऱ्यांची वागणूक इतर केंद्रांतूनहि अशीच आढळून आली तर (मला) आता आश्चर्य वाटणार नाहीं."

कोरापुटमधील ग्रामदानें आज या अवस्थेंत आहेत. येथे विनोबांना अभिप्रेत असणारी 'अहिंसक जनशक्ति' अद्याप उदयास आलेली नाही. येथील जमिनीचें वाटप अद्याप समान नाही. ग्रामनियोजनाची जबाबदारी पेलूं शकेल अशी संघटित व्यवस्था किंवा ग्रामसभा यांचें अस्तित्व येथे जाणवत नाही. कोरापुटमधील ग्रामदानांना सुरुवातीला आपण निश्चित केलेल्या तीनहि कसोटया आज तरी लागू पडत नाहीत, हें यावरून स्पष्ट होतें. परंतु याव्यतिरिक्त आणखीहि एक न्यूनता येथे आहे. ग्रामदानी गावांच्या कायदेशीर मान्यतेचा प्रश्न अद्याप येथे सुटलेला नाही. तो किती बिकट आहे, हें पुढे दिलेल्या कांही उदाहरणांवरून वाचकांच्या सहज ध्यानांत येईल.

(१) श्री. नभकृष्ण चौधरी हे मुख्यमंत्रिपदावर असतांना हा कायदेशीर मान्यतेचा प्रश्न सोडविण्यासाठी १९५३ मध्ये प्रथम 'ओरिसा-भूदान-यज्ञ-कायदा' अस्तित्वांत आला. या कायद्यान्वये राज्यांतील भूदान समितीला गावकऱ्यांनी दिलेलीं दानपत्रें सरकारी अधिकाऱ्यांकडून मंजूर करून घ्यावीं लागतात. कुणाच्या तक्रारी असल्यास त्या लक्षांत घेऊन दानपत्रांच्या खरेखोटेपणाविषयी सरकारी अधिकाऱ्याने स्वतःची खात्री करून घेतल्यावरच ग्रामदानांना कायदेशीर मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा होतो. केवळ कोरापुट जिल्ह्याचा विचार केला तर सुमारे ४० ते ५० हजार दानपत्रें तपासण्याचा प्रश्न होता. हें काम चालू यंत्रणेमार्फत पूर्ण करायचें तर तिने विशेष कार्यक्षमता धारण करणें अवश्य होतें. अन्यथा नवे अधिकारी नेमून हें कार्य उरकायला पाहिजे होतें. या दोन्ही गोष्टी अद्याप होऊं शकलेल्या नाहीत.

(२) १९५६ च्या डिसेंबर महिन्यांत दुरुस्त भूदान कायद्याला राष्ट्रपतींची मान्यता मिळाली. परंतु ओरिसा सरकारने कायद्याचीं उप-

कलमें ( By-Laws ) अद्याप तयार न केल्याने अंमलबजावणीचें सर्व कार्य पूर्णतया स्थगित आहे.

( ३ ) ओरिसा भूदान यज्ञ कायद्यांत ग्रामदानाची व्याख्या पुढील-प्रमाणे केलेली आहे.

" Gramdan village means a village where all the agricultural lands situated within that village have been donated to the Samiti."

यांतील पहिलाच शब्द 'व्हिलेज' हा आहे. व्हिलेज म्हणजे काय, या प्रश्नावर सरकारपक्ष व भूदान समिति यांच्यात मतभेद आहेत. सरकारी अधिकारी 'रेव्हेन्यू व्हिलेज' प्रमाण धरतात, तर भूदान समितीने एका रेव्हेन्यू व्हिलेजमध्ये असणारीं ३।४ गावें स्वतंत्र खेडीं म्हणून मानलेलीं आहेत. ३।४ गावांपैकी एखाद्या गावाने ग्रामदान केलेलें नसतें. समितीच्या मतें तेवढें गाव वगळून बाकीच्या गावांना ग्रामदानी गावें म्हणून मान्यता द्यावी. परंतु समितीचें हें धोरण सरकार मान्य करील की नाही तें सांगवत नाही. सरकारने आपला 'रेव्हेन्यू' व्हिलेजचा आग्रहच कायम ठेवला तर बरींच ग्रामदानें रद्द ठरण्याचा संभव आहे.

( ४ ) समितीच्या मताप्रमाणे प्रत्येक खेडें स्वतंत्र घेतलें तरी अडचणी कमी नाहीत. कांही गावांतील कांही जमिनी अद्याप सरकार-कडेच आहेत. सरकारने आपल्या जमिनी कांही ग्रामदानांत दिलेल्या नाहीत. या मुद्द्यावरहि पुष्कळशीं ग्रामदानें रद्द ठरतील असें वाटतें.

( ५ ) गावांत ज्यांच्या जमिनी आहेत पण जे गावाबाहेर राहत असतात अशांनी बहुतेक ठिकाणीं ग्रामदानांत आपल्या जमिनी दिलेल्या नाहीत. या गावांबाबतहि सरकार हरकत उपस्थित करण्याची शक्यता आहे.

कायदेशीर मान्यतेच्या प्रश्नांत अशा अनेक अडचणी आहेत. यामुळे १४०० ग्रामदानांपैकी एका तरी ग्रामदानाला कायद्याची मान्यता मिळते की नाही, याबद्दल येथील कार्यकर्त्यांना शंकाच वाटत आहे. हा मान्यतेचा प्रश्न असा लोंबकळत राहिल्याने येथील आदिवासी ग्रामस्थांवर त्याचा फार विपरीत परिणाम झालेला आहे. सावकार-वर्ग या अनिश्चित परिस्थितीचा आपल्या दुष्ट स्वार्थसाधनासाठी कसून उपयोग करून घेतांना दिसतो. आदिवासी नायकांची वृत्तीहि त्यामुळे बऱ्याच ठिकाणीं पालटण्याचा संभव असून उद्या आपापलीं ग्रामदानें रद्द करवून घेण्याची त्यांच्यांतच अहमहमिका सुरू झाली तर त्याचें कुणाला फारसें आश्चर्य वाटणार नाही. कारण पिढ्यानुपिढ्या गुलामगिरींत असणारा आदिवासी सावकाराचा छळ व सरकारी रोष या दोन प्रतिकूल शक्तींशीं टक्कर देण्याचें धैर्य दाखवूं शकेल असें वाटत नाही.

यावर 'राजकीय आंदोलना'चा उपाय कांही कार्यकर्ते येथे सुचवतांना दिसतात. तो कितपत शक्यतेच्या कोटींतला आहे हा प्रश्न वेगळाच आहे; परंतु सर्वोदयाच्या तत्त्व-मंडनांत या परिस्थितीचा विचार होणें जरूर आहे. राजकीय अंगाची उपेक्षा करून किंवा त्याबद्दल उदासीनता बाळगून सर्वोदयी समाज अस्तित्वांत येण्याची शक्यता आहे काय, याचा सर्वोदयवाद्यांनी गंभीरपणें विचार करावा, असें येथील परिस्थितीचें आवाहन आहे, एवढी गोष्ट मात्र निश्चित.

* * *

५

# ग्रामदानाचें मूल्यमापन

ग्रामदानांतून ग्रामराज्य निर्माण व्हावें, अशी विनोबांची कल्पना आहे. स्वयंपूर्ण ग्रामराज्याची कल्पना गेलीं वीस-पंचवीस वर्षे वातावरणांत असली तरी ग्रामदानाची चळवळ सुरू होईपर्यंत या कल्पनेला मूर्त स्वरूप देणेंच शक्यच नव्हतें. कारण स्वयंपूर्ण ग्रामराज्याचा पाया म्हणजे खेड्यांतील विकसित कुटुंब-भावना. ‘ गावची श्रद्धा ’ अस्तित्वांत असेल तरच पुढे ग्रामराज्याची उभारणी करणें शक्य होईल हें उघड आहे. परंतु ही मूलभूत श्रद्धा निर्माण करण्याचा प्रभावी प्रयत्न ग्रामदान-आंदोलनापूर्वी कोणीहि केला नव्हता. जोपर्यंत खेड्यांतील आर्थिक सत्ता दोन-चार जमीनदारांच्या किंवा सावकारांच्या हातांत केंद्रित झाली आहे, जोपर्यंत गावांत अस्पृश्यतेसारख्या दुष्ट रूढि अस्तित्वांत आहेत, तोपर्यंत गावचें कुटुंब होणें ही गोष्ट अशक्यच होती. ग्रामदानामुळे खेड्यांतील आर्थिक सत्ता विकेंद्रित होते. कोणीहि भूमिहीन राहत नाही. सामाजिक उच्चनीचता नाहीशी होण्यास सुरुवात होते. हा मूलभूत फरक झाल्याशिवाय गाव खऱ्या अर्थानें स्वावलंबीहि होणार नाही. शक्यतोवर गावच्या महत्त्वाच्या गरजा गावांतच भागल्या पाहिजेत, असा विनोबांचा व सर्वोदय विचारकांचा आग्रह आहे. यालाच ते अन्नस्वावलंबन व वस्त्रस्वावलंबन म्हणतात. यापूर्वी सर्वोदयी कार्यकर्त्यांनी फक्त वस्त्रस्वावलंबनाचे प्रयोग खेडयापाडयांत केले. परंतु गावांतील विषमतेला धक्का न लावतां चरखा गावांत चालू करणें हें खऱ्या अर्थानें स्वावलंबन नसून तो एक ‘ रिलीफ वर्क ’चाच प्रकार

होता, याची त्यांना आता जाणीव होऊं लागली आहे. ग्रामदानापूर्वी चरखा हा 'उपरा' होता.* ग्रामदानामुळे आता तो स्वावलंबनाच्या नैसर्गिक विकासाचें साधन होईल.

ग्रामदानांतून निर्माण होणारें स्वयंपूर्ण ग्रामराज्याचें चित्र आणि आज खेडयापाडयांतून चालू असणाऱ्या सरकारी विकास-योजना यांचा तोंडावळा जरी सारखा असला तरी त्यांत मौलिक फरक आहे. विकास-योजनांची वाटचाल स्वावलंबनाच्या दिशेने चालू नाही. शिवाय हा विकास स्वयंस्फूर्त नसून वरून लादलेला आहे. गावची शेती सुधारावी, शाळा बांधाव्यात, सांस्कृतिक संवर्धनाचे कार्यक्रम सुरू करावेत, हा विकास-योजनांचा दृष्टिकोन असतो. परंतु याने गावची 'क्रांति' होणार नाही. जुन्या सत्ताकेंद्रांना धक्का न लावतां केलेल्या साऱ्या सुधारणा या गावांत कुठलेंहि मानसिक परिवर्तन घडवून आणणार नाहीत. विकास-योजना हें 'सत्ता-विभाजना'चें कार्य अर्थातच करूं शकत नसल्याने विनोबांना व इतर सर्वोदय विचारकांना त्यांच्याविषयी कधीच आपुलकी वाटली नाही. आपली स्वयंपूर्ण ग्रामराज्याची कल्पना गावांत हें परिवर्तन घडवून आणण्यास समर्थ आहे, असा विनोबांचा विश्वास आहे. ग्रामदानांतून जें 'खोल' काम विनोबांना अपेक्षित

* "अलिकडे जे आमचे मित्र रचनात्मक कार्यांत लागले आहेत आणि माझा सल्ला घेतात, तर मी त्यांना सांगतों की, सारें रचनात्मक काम फांद्यांचें ज्ञान आहे. त्या फांद्या आहेत आणि हा (भूदान–ग्रामदान) तर मूलग्राही विचार आहे. ह्या मूळाला जर आम्ही पकडून ठेवूं तर ह्याचे आधारावर बाकीचीं सारीं रचनात्मक कामें आणि सर्वोदय विचार पसरतील आणि त्यांना फळें येतील. नाहीतर चार वर्षांपूर्वी सर्व रचनात्मक कार्यकर्त्यांमध्ये निराशा पसरली होती, हें आपण जाणतच आहांत. ह्यापासून कांही होणार नाही असें ते समजत होते."

विनोबा : भूदान-गंगा, भाग ४, पृ. १८२

आहे तें म्हणजे ही स्वयंपूर्ण स्वावलंबी ग्रामराज्याची उभारणी हेंच होय. कोरापुटमध्ये असल्यापासूनच विनोबांनी ग्रामदानांतून निर्माण होणाऱ्या स्वयंपूर्ण ग्रामराज्याचें चित्र लोकांसमोर रेखाटण्यास प्रारंभ केला होता. एका मुक्कामांत ते म्हणतात—

" जमीन परमेश्वराची. गाव होईल ईश्वराच्या वतीने जमिनीचा विश्वस्त. कायद्यानेहि कोणा व्यक्तीला जमिनीचा मालक म्हणतां येणार नाही. गावालाच जमिनीचा मालक मानलें जाईल. कुटुंबांत किती लोक आहेत हें पाहून माणशीं एक एकर याप्रमाणे प्रत्येक कुटुंबाला शेती करायला जमीन दिली जाईल. प्रत्येक पांच किंवा दहा वर्षांनंतर कुटुंबांतली लोकसंख्या जितकी असेल ती पाहून तदनुसार जमिनीची पुन्हा वाटणी होईल. गावांत कांही सामुदायिक जमीन असेल त्या जमिनींतून गावच्या सर्व जमिनीचा फाळा देणें आणि गावच्या प्रगतीचीं इतर कार्ये करणें वगैरे कामें होतील. कांही वर्षे अनुभव पाहून गावच्या लोकांना वाटेल तर गावची सर्व जमीनहि सामुदायिक रीत्या ते करूं शकतील. कोणा एखाद्याच्या शेतांत जास्त काम असेल तर गावांतले सर्व लोक मिळून तें करून देतील. कोणावर कांही संकट किंवा त्याच्या शेतांत कमी पीक आलें तर त्याला गावांतले लोक मदत करतील. कोणी कोणाला कर्ज देऊं शकणार नाही. उलट कोणाला कांही कमी पडेल तर त्याला लोकांकडून साहाय्यच मिळेल. कारण सर्व गाव जणूं एक कुटुंबच आहे असें राहील.

" त्याबरोबरच ग्रामोद्योग सुरू करण्यांत येतील आणि गाव स्वावलंबी करून पैशाच्या मोहांतून त्याला मुक्त करण्याची खटपट करण्यांत येईल. पहिलें काम हें असेल की, गांववाले लोक एकत्र मिळून ठरवतील की, यापुढे गावांत कापड आणण्यांत येणार नाही. शेतांत कापूस पेरण्यापासून विणण्यापर्यंत सर्व काम गावांतच होईल. त्यामुळे गावांतल्या सर्व लोकांना काम मिळेल आणि गावांतली लक्ष्मी गावांतच राहील. याशिवाय गावांत

ज्या ज्या कांही वस्तु लागतील त्या सर्व गावांतच तयार करण्याची व्यवस्था करण्यांत येईल. गावांत कोणाच्या स्वतःच्या खाजगी मालकीचें दुकान असणार नाही. गावाच्या मालकीचें एक दुकान राहील. त्यांतूनच जरूर ते बाहेरील जिन्नस विकत घेतां येतील आणि गावाला लागून उरणारे जिन्नस त्याच्यामार्फतच विकले जातील.

" गावांतल्या सर्व मुलांमुलींना समान शिक्षण मिळेल. शिक्षक सकाळीं एक तास मुलांमुलींना आणि संध्याकाळीं एक तास प्रौढांना शिक्षण देईल. बाकी सर्व दिवस तो शेतांत काम करील. भारतांतल्या शिक्षणव्यवस्थेंत उद्योग आणि आत्मज्ञान दोन्हीहि पाहिजेत. त्यामुळे हाताला काम मिळेल आणि बुद्धीचा विकास होईल. संध्याकाळीं गावांतले सर्व लोक एके ठिकाणीं जमतील आणि तेथे गीता, रामायण वगैरे धर्म-ग्रंथांचा पाठ होईल आणि गावाच्या उन्नतीसंबंधी चर्चा करण्यांत येईल. आजकाल दारू, विडी, सिगरेट वगैरे व्यसनांमुळे गावची अवस्था फार खराब होऊन गेली आहे. म्हणून गावचे लोक सर्व मिळून 'यापुढे विडी, दारू वगैरे सेवन करणार नाही' अशा देवापुढे शपथा घेतील. गावांतल्या कोणाला कर्ज असेल तर तें सोडण्याबद्दल, निदान व्याजाची सूट देण्याबद्दल, सावकाराला विनंति करण्यांत येईल. पुढे केव्हा कर्जाची आवश्यकता पडेल तर गावाकडून तें देण्यांत येईल. सरकारकडूनहि घेण्यास हरकत नाही. गावांतल्या लग्नकार्यांची व्यवस्था गावाकडून होईल, कोणा कुटुंबाच्या वतीने नाही. या कारणामुळे लग्नकार्याकरिता कर्ज काढण्याचा प्रश्न उत्पन्न होणार नाही.

" सामाजिक क्षेत्रांत जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीपुरुषभेद वगैरे सर्व भेदभाव दूर करण्यांत येतील. प्रत्येक मनुष्य परमेश्वराचें संतान म्हणून मानला जाईल. या दृष्टीने सगळ्यांचे हक्क समान असतील. सगळ्या तऱ्हेच्या उद्योगांची, त्याचप्रमाणे समाजहितकर कामाची सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक प्रतिष्ठा समान राहील. गावच्या सर्व जमिनीवर सर्वांचा समान

हक्क मानला जाईल आणि आदर्श तर असा असेल की, प्रत्येकजण कांही थोडा वेळ तरी शेतांत काम करीलच. कारण शेतीकामाशिवाय मानव-जीवनाला पूर्णता मिळण्याचा संभव नाही. गावचा विणकर, चांभार, कुंभार, वगैरे सर्वजण गावच्या लोकांच्या जरूरीप्रमाणे त्यांचें काम करून देतील. त्याचा हिशोब ठेवला जाणार नाही. वर्षाचे शेवटीं जें पीक येईल त्यांतला कांही भाग त्यांच्या घरीं पोचविण्यांत येईल. प्राचीन काळीं गावची व्यवस्था अशीच होती. ह्याप्रमाणे 'वसुधैव कुटुंबकम्' या सिद्धान्ताचा आरंभ ग्रामपरिवापासून होईल."

या स्वयंपूर्ण ग्रामराज्याचा त्यांचा आग्रह इतका तीव्र आहे की, ग्रामदानानंतर 'बहिष्काराची चळवळ' हातीं घ्यावी लागेल असें नुकतेंच पंढरपूरच्या सर्वोदय संमेलनाच्या प्रसंगीं त्यांनी उद्घोषित केलें आहे. गावांत बाहेरून कुठल्या वस्तु याव्यात, याचा निर्णय ग्रामदानी गावांतील पंचायत सभेने घ्यावा व याव्यतिरिक्त ज्या वस्तु येत असतील त्या बंद करण्यासाठी बहिष्कार आंदोलन सुरू करावें, अशी त्यांची सूचना आहे. यावरून हें ग्रामराज्य निदान ग्रामदानी गावांतून तरी नजिकच्या भविष्यकाळांतच उभारण्याचा विनोबांचा मानस असावा असें स्पष्ट दिसतें. 'कन्याकुमारीच्या टोकाला उभे राहून मीं भगवान् सूर्य-नारायणासमोर प्रतिज्ञा केली आहे की, ग्रामराज्याचें स्वप्न साकार करण्यासाठी मी साऱ्या भारतांत अखंड संचार करीन' असें एक आत्म-निवेदन त्यांनीं एके ठिकाणीं केलें आहे. यावरून त्यांच्या संचारामागील प्रेरणा स्पष्टपणें ध्यानांत येते.

आता कोरापुटमध्ये ग्रामदानें मिळाल्यावर या स्वयंपूर्ण ग्रामराज्याचे प्रयोग अस्तित्वांत येणें ही नैसर्गिक घटना ठरली असती. परंतु तसें कांही घडलें नाही. कारण उघड आहे. मागील प्रकरणांत वर्णन केल्या-प्रमाणे कोरापुटमध्ये वस्तुतः भूदान झालें होतें. ध्येयवादाने प्रोत्साहित झालेल्या कार्यकर्त्यांनी त्याला 'ग्रामदान' हें नांव जरा घाईने देऊन

टाकलें. आणि भूदानाने गावांतील जुन्या सत्ता-स्थानांवर प्रहार होऊं शकत नाही. गावांतील आर्थिक व सामाजिक सत्ता विकेंद्रित होऊं शकत नाही. केवळ भूमिहीनांना जमीन मिळणें हा फार झालें तर एक व्यापक व कालोचित भूतदयेचा प्रकार आहे. त्यामुळे क्रांतीचें बीजारोपण होत नाही. कोरापुटमध्ये ग्रामदानाचें अस्तित्व चुकीने गृहीत धरलें गेलें. गावांत ' मानसिक परिवर्तन ' झालेलें आहे हें गृहीत धरून तेथे नवनिर्माणाच्या योजना हातीं घेतल्या गेल्या. परंतु प्रत्यक्षांत त्या नवनिर्माण-योजना न ठरतां जवळ जवळ ' विकास-योजना 'च ठरल्या.

या विकास-कार्याचा सारा तपशील येथे सांगण्याचा विचार नाही. कारण तो अहवालांतून वगैरे सहज मिळण्यासारखा आहे. कोणत्या गावांत काय काम झालें, कुठे रस्ते तयार झाले, कुठे विहिरी बांधल्या, कुठे शेतीविकास झाला, इत्यादि माहिती महत्त्वाची असली तरी तिची जंत्री येथे देण्यापेक्षा त्यामागील वैचारिक पार्श्वभूमि देणें अधिक उपयुक्त व उद्बोधक ठरेल. म्हणून त्याचा थोडा प्रपंच करूं.

ऑक्टोबर १९५५ या महिन्यांत माननीय श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी येथील विकासकार्यांचीं सूत्रें हातीं घेतलीं. प्रथम चार-पांच महिने जिल्ह्यांतील सर्व प्रदेशाची पाहणी करून कांही तज्ज्ञांच्या साहाय्याने एक योजना त्यांनी तयार केली. या वेळीं कोरापुटमधील ग्रामदानांची संख्या ८०० पर्यंत होती. सुमारें दोन-दोनशें गावांचें एक याप्रमाणे चार सघन-क्षेत्रें प्रथम बनविण्यांत आलीं व प्रत्येक सघन-क्षेत्रांत सुमारें ४०-५० गावांसाठी एक उपकेंद्रही स्थापन करण्याचें ठरलें. प्रत्येक उपकेंद्रांत एक सहकारी दुकान ( गांधी-घर ) स्थापन करून आदिवासींना लागणाऱ्या नित्य गरजेच्या वस्तु त्यामार्फत विकण्याची व्यवस्था करण्यांत आली. पहिल्या वर्षी अशीं वीस-पंचवीस दुकानें उघडलीं गेलीं व सर्व सेवा संघाने बिनव्याजी भांडवल म्हणून पंधरा एक

हजारांची रक्कम या दुकानांसाठी गुंतवली. दैनंदिन गरजेच्या वस्तु आदिवासी ग्रामस्थांना बेसुमार नफा घेऊन विकणाऱ्या सावकार-वर्गाचा जांच या सहकारी भांडारांमुळे कमी होईल, अशी योजकांची कल्पना होती.

यानंतर शेती-विकासाचा व उत्पादनवाढीचा कार्यक्रम योजनेंत अंतर्भूत करण्यांत आला. सहाशे-सातशे बैलजोडयांचें वाटप करणें; प्रत्येक सघनक्षेत्रांत एक हजार याप्रमाणे चार सघनक्षेत्रांत चार हजार एकर जमिनीची धूप थांबविण्यासाठी ताली वगैरे बांधणें; विहिरी, तलाव, पाटबंधारे यांच्या योजना हातीं घेऊन दोन हजार एकर जमिनीला पाणी-पुरवठा करणें; चारशे एकर जमीन जपानी भातशेतीच्या लागवडी-खाली आणणें; चारशे एकरांवर वृक्षारोपण करणें; खतांसाठी खड्डे खणणें; संडास बांधणें; चारशे अंबर चरखे व दोनशे हातमाग चालविणें; तेल-घाण्या, साबू, सुतारकाम, बांबू इत्यादींचे ग्रामोद्योग सुरू करणें— अशा स्वरूपाच्या तरतुदी या योजनेंत करण्यांत आल्या.

ही सारी योजना पूर्ण करायची तर शिक्षित कार्यकर्त्यांचा संचहि तयार करणें अवश्य होतें. त्यासाठी सुमारे दोनशे आदिवासी खेडुतांचें तीन-चार महिन्यांचें शिबिर भरवून त्यांत अवश्य तें शिक्षण देण्याची योजना आखण्यांत आली होती. सुमारे तीन-एक वर्षांत कोरापुटच्या सर्व विकास-कार्यांची जबाबदारी अंगावर पेलूं शकेल असें नवें स्थानिक नेतृत्व अशा शिबिरांतून व शिक्षणकेंद्रांतून तयार होईल व सर्व सेवा संघाला प्रत्यक्ष जबाबदारींतून निवृत्त होतां येईल, अशी चालकांची कल्पना होती.

व्यापक प्रमाणावर सारें कार्यक्षेत्र पादाक्रांत करणारी ही प्रथमवर्षीय योजना डिसेंबर १९५६ अखेर पूर्ण व्हावी, असा संकल्प होता. त्या-प्रमाणे सुमारे दोनशे कार्यकर्त्यांनी कामास सुरुवातहि केली. वर्षाच्या अखेरीस माननीय अण्णासाहेबांनी झालेल्या कार्याचा आढावा कार्य-

कार्यांसमोर ठेवला. योजनेच्या प्रगतीची त्यावरून चांगलीच कल्पना येत असल्याने त्यांतील महत्त्वाचा भाग पुढे देत आहें :—

The land distribution work went on vigorously till the end of May 1956. From your reports reaching our central office I feel we have been talking much–doing little........ In our vast field of operation in Koraput district we have 200 workers in all, drawing round about Rs. 10,000/- as monthly subsistance, which comes to Rs. one lac and twenty thousand per year. In case we can't increase that much income, we prove ourselves parasites and have no justification to be here. For every rupee spent on us we must increase the income ten times at least. Let us develop more intimacy with the people. Persuade them to work at least four hours instead of only two hours a day.

Last year we prepared a budget of five lacs but could not spend more than one lac and seventy seven thousand rupees. Out of Rs. 50,000 allotted to land-reclaimation we could spend only 1,000; against the budget provisions of one lac for minor irrigation we spent only two thousand. 26 Gandhi Ghars (community houses) and 18 wells proposed last year are still in the plans only. The major figure of expenditure this year is of the bullock distribution alone amounting to Rs. one lac 30 thousand.

Budget for the next year on various heads of land re-claimation, minor irrigation, new housing and training camps is five lacs. Until year 1961 the Central Govt.

is to release 68 lacs. Gandhi Smarak Nidhi, Khadi Board and Orissa State Govt. have to spend 10 lacs each. This brings the total to a crore of rupees. In case you don't make the necessary reconnaissance and accept the assignments of running stores, digging wells, constructing houses, Gandhi Ghars, taking up minor irrigation works and reclaimation projects the plans will remain only on paper.

Let us not go round a large number of villages without doing justice to any, but concentrate on a limited number at the outset and gradually expand our sphere year by year." — Gramdan, November 1956.

" जमीन वाटपाचें काम मे १९५६ अखेर जोराने चालू होतें. तुमच्याकडून मध्यवर्ती कचेरीकडे येणाऱ्या वृत्तांतावरून मला असें वाटतें कीं, प्रत्यक्ष कृतीपेक्षा आपलें बोलणेंच जास्त असतें. कोरापुट जिल्ह्यांतील आपल्या विशाल कार्यक्षेत्रांत आज २०० कार्यकर्ते असून त्यांचेवर आपण मासिक दहा हजार रुपये म्हणजे वार्षिक एक लक्ष वीस हजार रुपये खर्च करीत असतों. जर आपण उत्पन्नांत निदान तेवढी तरी वाढ करूं शकलों नाही तर आपण निरुपयोगी ठरून आपलें येथील अस्तित्वच असमर्थनीय ठरेल. आपल्यावर खर्च होणाऱ्या प्रत्येक रुपयापासून आपण येथील उत्पन्न कमींत कमी दसपट वाढविलें पाहिजे. यासाठी आपण लोकांत अधिक मिसळलें पाहिजे. दररोज दोन तासांऐवजी निदान चार तास तरी काम करण्याची त्यांना सवय लावली पाहिजे.

मागील वर्षीं अंदाजिलेल्या पांच लक्ष रुपयांपैकी आपण फक्त एक लक्ष सत्याहत्तर हजार रुपयेच खर्च करूं शकलों. जमीन सुधारणेसाठी अंदाजिलेल्या पन्नास हजार रुपयांपैकी, फक्त रुपये एक हजार व पाटबंधाऱ्यासाठी नियोजित केलेल्या एक लक्ष रुपयांचे ऐवजी, फक्त रुपये दोन हजार आपण खर्च केले. मागील वर्षीं ठरविलेलीं २६

अनुक्रम ................ दि: ..............७७
क्रमांक ........................ नों: दि: ..............

गांधीघरें व १८ विहिरी अजून कागदावरच आहेत. या वर्षींच्या खर्चाची मोठी ठळक रक्कम बैलांचे वाटणीवरच खर्च झालेली आहे! ( एक लक्ष तीस हजार. )

जमीन-सुधारणा, छोटे पाटबंधारे, नवीन घरबांधणी, शिक्षण-शिबिरें, यांवर पुढील वर्षीं होणारा खर्च रुपये पांच लक्ष इतका अंदाजिलेला आहे. सन १९६१ सालापर्यंत मध्यवर्ती सरकार अडुसष्ट लक्ष रुपये देणार आहे. गांधी स्मारक निधि, खादी बोर्ड व ओरिसा सरकार यांजकडून प्रत्येकी दहा लाख रुपये मंजूर झालेले आहेत. हें सर्व मिळून एक कोटी रुपये होतात. जर तुम्ही जरूर तेवढी देखरेख ठेवली नाही, भांडारें चालविणें, विहिरी खोदणें, घरें बांधणें, छोटे पाटबंधारे व जमीन-सुधारणा, इत्यादि कामांची जबाबदारी अंगावर घेतली नाही, तर तयार केलेल्या सर्व योजना कागदावरच राहतील.

म्हणून आपण अनेक गावांना भेटी देऊन त्यांपैकी कोणाचेंच काम नीट न करण्यापेक्षा, सुरुवातीस थोड्याच गावीं जाऊन तेथील कामावर आपलें लक्ष केंद्रित करावें. मग पुढे हळूहळू प्रत्येक वर्षीं आपलें कार्य-क्षेत्र वाढवितां येईल. "

यावरून पाहिलें वर्ष योजनेच्या अमलबजावणीचें न धरतां पूर्वाभ्यास व पूर्वतयारी यासाठी खर्च झालें, असा निष्कर्ष काढणेंच योग्य ठरेल. बहुतेक कार्यक्रम जरी कागदोपत्रीं राहिले तरी कोरापुटमधील ग्रामदानांची परिस्थिति या कालावधींत संचालकांच्या पूर्ण ध्यानांत आली, हाच मोठा लाभ म्हणून मानला पाहिजे. येथून आता ' वस्तुनिष्ठ नियोजना 'च्या पुढच्या टप्प्याला सुरुवात करणें कांही अवघड नव्हतें.

शिक्षित कार्यकर्त्यांचा अभाव ही प्रधान उणीव लक्षांत आल्याने यापुढे सर्व ग्रामदानी गावांचें विकास-कार्य एकदम हातीं घेऊन विस्कळीत व अर्धवट कामें करण्यापेक्षा कांही मोजक्या ठिकाणीं ठोस व भरीव कार्य खडें करून त्याचा प्रभाव इतरत्र पाडावा, असा दृष्टिकोन यापुढे स्वीकार-

ण्यांत आला. यासाठी गरांडा, बट्टीबेडा, देवपटांगी, लिंबागुडा, वूर्झा, सारीपाद, अंबोदला वगैरे पंचवीस-तीस केंद्रें निवडण्यांत आलीं व त्यांना 'प्रयोग-शिक्षण-केंद्रें' ( Programme Building & Training Centres ) हें नांव देऊन कार्यकर्त्यांचा एकेक गट या केंद्रांत कामासाठी ठेवण्यांत आला. या केंद्रांतून विकासाचे नवनवीन प्रयोग केले जावेत व त्यांचा कार्यकर्ते तयार करण्यासाठीहि उपयोग व्हावा, अशी योजकांची कल्पना होती. प्रत्येक केंद्राचीं कांही वैशिष्टयेंहि होतीं. उदाहरणार्थ, सावकाराच्या कचाटयांतून गावकरी मुक्त व्हावेत म्हणून सर्व सेवा संघातर्फे कर्जें देण्याचा प्रयोग लिंबागुडा येथे करण्यांत आला. त्यांतून कांही अनुभवप्राप्ति झाली. गरांड्याने जमीन-वाटपाचा आदर्श निर्माण केला तर वूर्झा येथे शेती-शिक्षण-वर्ग व भातशेती हे प्रयोग यशस्वी झाले. रायघडा येथे ग्रामोद्योगाचें शिक्षण-केंद्र स्थापन करण्यांत आलें. त्यांत वीस-पंचवीस आदिवासी मुलांनी शिक्षण घेतलें तर जयपूरच्या दिवाण-बंगल्यांत निवडक स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांसाठी चार महिन्यांचा एक अंबर शिक्षा-वर्ग चालविण्यांत आला.

हीं केंद्रें व शिक्षा-वर्ग याव्यतिरिक्त दुसऱ्या वर्षाची मोठी कामगिरी म्हणजे सर्व सेवा संघाने केलेली व्यापारी उलाढाल. खरेदी-विक्रीचा ( Marketing ) एक स्वतंत्र विभाग यासाठी उघडला गेला. मध्य-प्रदेशांतील गोंदिया येथील प्रख्यात व्यापारी श्री. चतुरभाई यांचें साहाय्य व मार्गदर्शन घेण्यांत आलें. ओरिसा सरकारने धान्यगुदामासाठी कांही ठिकाणीं विनामूल्य जागा देण्याची तयारी दाखविली. मालाची ने-आण करण्यासाठी दोन स्वतंत्र ट्रक्स सर्व सेवा संघाने खरेदी केले. गावकऱ्यां-कडून धान्य खरेदी करून गरजेच्या वेळीं त्यांना योग्य भावांत तें विकून मधला सावकार व दलाल वर्ग नाहीसा करण्याचा हा प्रयत्न मोठा धाडसी होता यांत शंका नाही. सुमारे पांच-एक लाख रुपयांची गुंतवणूक या कामीं करण्यांत आली होती. धान्य-साठवणीसाठी भाड्याने व विना-

मूल्य घेतलेलीं गुदामें अपुरीं पडण्याची वेळ एकदा येऊन ठेपली होती, यावरून या प्रयत्नाची व्याप्ति ध्यानांत येईल.

'प्रयोग-शिक्षण-केंद्रें' व वरील व्यापारी उलाढाली सोडल्या तर या दुसऱ्या वर्षीं सर्व सेवा संघानें उरलेल्या ग्रामदानी गावांच्या विकासासाठी प्रत्यक्ष स्वरूपाची कुठलीच जबाबदारी उचलली नाही. परंतु एक 'सापेक्ष विकासा'चा कार्यक्रम या ग्रामदानी गावांसाठी आखण्यांत आला होता. मार्च १९५७ या महिन्यांत कोरापुटमध्ये अखिल भारतांतील प्रमुख सर्वोदय विचारकांचा एक परिसंवाद घेण्यांत आला. त्या वेळीं श्री. अण्णासाहेबांनी हा सापेक्ष-विकासाचा आपला कार्यक्रम सर्वांसमोर विचारार्थ मांडला.

"खेड्यांत प्रथम जमिनीचें वाटप समान झालें पाहिजे. पांच एकर किंवा एकूण जमिनीच्या पांच टक्के जमीन गावकऱ्यांनी 'गाव जमीन' म्हणून स्वतंत्र ठेवून तिची सामुदायिक कसणूक करण्याची तयारी दाखवली पाहिजे. या दोन गोष्टी गावांत घडून आल्या तरच गावाला एखादी बैलजोडी किंवा शेती-सुधारणेसाठी इतर मदत देण्यांत यावी.

यानंतर गावाने 'गावजमिनी' चें सारें उत्पादन नवीन वर्षाच्या शेतीसुधारणेच्या कार्यक्रमांवर खर्च करण्याची तयारी दाखविली पाहिजे.

यापुढची पायरी अशा दहा-पंधरा लहान लहान गावांनी एकत्र येऊन आपली 'ग्रामसभा' स्थापन करण्याची आहे. या ग्रामसभेने सर्व गावाच्या गावजमिनीच्या उत्पादनांतून अवश्य तें शेअर-भांडवल उभें करून एक सहकारी संस्था काढल्यावर सर्व सेवा संघाने आपला हिस्सा त्यांत घालावयाचा आहे. हा हिस्सा ग्रामसभेने जमविलेल्या शेअर भांडवलाच्या पांचपासून दहा पट इतका मोठा असेल. या भांडवलाच्या मदतीने ग्रामसभा गावांत निरनिराळीं विकास-कार्यें पार पाडूं शकेल.

यापुढे गावचें उत्पादन एकत्र करून त्याची सहकारी पद्धतीने विक्री करण्यास ग्रामसभा तयार असली तर सर्व सेवा संघाच्या व्यापार विभागाने एखादें मालगुदाम वगैरे बांधून देण्याची तयारी दाखवावी. यामुळे मालाची प्रतवारी लावून विक्रीची व्यवस्था सुधारणें शक्य होईल.

अशा पायरीपायरीने ग्रामदानी गावांचा विकास घडवून आणण्याची ही योजना स्थानिक व उत्स्फूर्त सहकार्याच्या अभावी यशाची पहिली पायरीहि ओलांडूं शकली नाही. भारतांत इतरत्र प्रचारांत असलेल्या विकासयोजनांचा दृष्टिकोनहि याच स्वरूपाचा असतो. गावाने पांचशे रुपये जमविले तर सरकार पांचशे रुपयांची मदत करून गावाला एकादी शाळा बांधून देईल, असा विकास-योजनेचा क्रम असतो. ग्रामदानी गावांत अर्थात् केवळ रकमा जमविण्याचें उद्दिष्ट पुढे ठेवून चालणार नाही हें उघड आहे. पण गावचें सहकार्य नाही म्हणून विकास-योजनांचीं मर्यादित उद्दिष्टेंहि जशीं साध्य होत नाहीत तीच गत ग्राम-दानी गावें असूनहि या ‘ सापेक्ष विकास कार्यक्रमा’ची झाली हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ”

निर्माण-कार्याचा हा दुसरा टप्पा फेब्रुवारी १९५८ पर्यंत चालू होता असें समजण्यास हरकत नाही. कारण या महिन्यांत जयपूरच्या दिवाण-बंगल्यांत सर्व प्रमुख निर्माण व भूदान कार्यकर्त्यांची एक अतिशय महत्त्वाची बैठक झाली. गेल्या दोन-अडीच वर्षांतील कार्याचा आढावा घेतला गेला; विविध मतप्रदर्शनें झालीं. यशापयशाची मनमोकळी चर्चा झाली. नवीन कार्याची दिशा स्पष्ट करण्यांत आली. या बैठकींतील चर्चेचा कांही भाग पुढे उद्धृत केला आहे; त्यावरून कोरापुटमधील सद्य:स्थितीचा चांगलाच बोध होईल अशी कल्पना आहे—

Shri Govind Reddy told the participants not to try too many things at a time. It distracts the attentions and dissipates the energies. He felt that agriculture,

credit operations and stores should be the main prongs of the approach and the programme of industries should be taken at a later stage. He stated further, "Frequent changes in the organisation and policy lead to confusion. Too many agencies operating in the field—the Sarva Seva Sangh, the Khadi Commission, the Community Projects and the Government administration may embarass the people and the workers still more. Too many cooks may spoil the broth."

Shri Chandramani expressed himself in the following words:—"We failed to gauge the feelings of rural communities and started raising dams, bunds, buildings and wells without the people's demand. We took up training programmes but hardly any trainee stuck to the organisation. Then came the wave of Chakbundi (Block bunding). The workers got inspired and people rolled up their sleeves and no sooner had we gone ahead than the emphasis shifted to the issue of 'one patta for one village'. Rural communities do not have quick receptivity. Haste leads always to confusion amongst the workers as well as the villagers."

Shri Nagin Parekh counted the rapid shifts in emphases and absence of unity of objectives as the main drawbacks in our approach. He found that a unified picture of development was lacking.

Shri Anna Sahib, in a mood of self-criticism, stated, "We have committed blunders by not eliciting public co-operation. We thought of running an independent administration for Gramdan villages with the assumption

that the Government employees are no good, the Congress people are below par and that we are the sponsors of a great movement. Not to have developed public contacts here, was my greatest mistake. We have almost isolated ourselves."

Continuing, Shri Anna Sahib said, "The State Government tried to bring us to the right path. The Chief Secretary of Orissa had lately cured us of certain misconceptions we had about ourselves. The money so freely available spoiled our mentality. Loyalties also lay divided amongst persons, organisations and ideologies and we lost unity of thought and spirit of fellow-feelings.

"Most of us lacked experience in development work but never felt inclined to learn anything. The Bhoodan worker trod not on earth but in the air and moved where his feet could carry him for the conquest of the district. We annexed villages without thinking of the responsibility involved. There was a time when Vinoba took the village for Gramdan where all the landless had been given land. But he took quick long strides towards the abolition of private property which we did not catch up with.

"It is time to be introspective and definite about our performance. I wish the coming annual Sarvodaya session be utilised for a thorough self-search and plain speaking. But we here should initiate it to-day with reference to our role in Koraput." (Gramdan, February 1958.)

"श्री. गोविंद रेड्डी यांनी एकाच वेळीं अनेक गोष्टींना हात घालू नका असें उपस्थित कार्यकर्त्यांना सांगितलें. ते म्हणाले, 'यामुळे

कार्यकर्त्यांचें लक्ष द्विधा होतें व शक्ति विस्कळीत होतात.’ शेती-सुधारणा, कर्जपुरवठा, सहकारी दुकानें एवढ्याच गोष्टी तूर्त हातीं घ्याव्यात व उद्योग-धंद्यांचा कार्यक्रम पुढे ढकलावा, असें त्यांचें मत पडलें. ते पुढे म्हणाले, ‘संघटनेंत व उद्दिष्टांत वरचेवर बदल करीत गेल्याने गोंधळ उत्पन्न होतात. त्याचप्रमाणे सर्व सेवा संघ, खादी कमिशन, विकासयोजना, सरकारी यंत्रणा अशा अनेक संस्था एकाच कार्यक्षेत्रांत कार्य करीत असल्याने लोकांचा व कार्यकर्त्यांचाही अनेकदा घोटाळा होतो. सात सुगरिणी आणि भोपळा आळणी, या म्हणीप्रमाणे कार्याची अवस्था होते.’

श्री. चंद्रमणि या नांवाचे दुसरे एक कार्यकर्ते म्हणाले, ‘गाव-कऱ्यांना काय हवें, काय नको, हें न पाहतांच आपण त्यांचेसाठी धरणें बांधूं लागलों, बांध व ताली घालूं लागलों, विहिरी खणूं लागलों, घरें उभारूं लागलों. आपण शिक्षणाचा कार्यक्रम आखला पण शिक्षण घेणाऱ्यांचा संघटनेशीं जवळ जवळ संबंध आलाच नाही. त्यानंतर मध्येच एकदम ताली घालण्याची लाट उसळली. हा कार्यक्रम हातीं घेऊन कार्यकर्ते व लोक थोडेसे पुढे गेले न गेले तोंच उद्दिष्टांत पुन्हा बदल झाला. ग्रामीण लोकांच्या ग्रहणशक्तींत तीव्रता कमी असते. घाईगर्दीमुळे ते व आपले कार्यकर्तेहि गोंधळून जातात.’

निश्चित ध्येयाच्या अभावामुळे कार्यक्रमांत व उद्दिष्टांत जे वरचेवर बदल झाले त्याबद्दल नगीन पारीख यांनी असमाधान व्यक्त केलें. ध्येय-धोरणांतील अनिश्चितता हा त्यांच्या मतें येथील सर्व प्रयत्नांतील मुख्य दोष होय.

श्री. अण्णासाहेबांनी आपले विचार पुढील शब्दांत व्यक्त केले :

‘बाहेरील जनतेचें सहकार्य मिळविण्यासाठी आपण कांहीच प्रयत्न केला नाही, ही आपली फार मोठी चूक झाली. सरकारी नोकर हे गतानुगतिक आहेत, कॉंग्रेस कार्यकर्ते हे निकृष्ट आहेत व आपण मात्र

एका श्रेष्ठ आंदोलनाचे प्रवर्तक आहोंत, या कल्पना उराशीं बाळगून आपण ग्रामदानी गावांसाठी स्वतंत्र शासनव्यवस्था उभारण्याचा प्रयत्न चालविला होता. जनतेशीं कसलेहि संबंध प्रस्थापित न करण्यांत माझी फार मोठी चूक झाली. त्यामुळेच आज आपल्याला वाळींत पडल्यासारखें वाटत आहे.

स्वतःविषयीच्या या आपल्या कल्पनांचा फोलपणा ओरिसा सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपल्याला लवकरच पटवून दिला. आपल्याला विपुल आर्थिक मदत मिळाल्यामुळे आपलीं मनें दूषित झालीं. कार्यकर्त्यांत एकात्मता नाही. संघटनेविषयी आस्था नाही. निश्चित ध्येयाची कल्पना नाही. त्यामुळे आंतून व बाहेरून या दोन्ही अंगांनी आज आपली स्थिति मोठी शोचनीय झाली आहे.

विकासकार्याविषयीं आपल्यापैकी बहुतेकांना पूर्ण अज्ञान होतें. परंतु आपल्यांतील हा दोष घालविण्याचा कोणींहि प्रयत्न केला नाही. भूदान-कार्यकर्ता कोणत्या स्वर्गभूमींत विहार करीत होता कोण जाणे! त्याचे पाय जमिनीला लागायलाच तयार नव्हते. जबाबदारीची यत्किंचितहि जाणीव न ठेवतां त्याने गावामागून गावें हस्तगत करून संपूर्ण जिल्हादान मिळविण्याचा संकल्प सोडला असावा, अशी त्याची वागणूक होती. एक काळ असा होता की, जेव्हा गावांतील भूमिहीनाला जमीन मिळाली असेल तर तें गाव 'ग्रामदान' म्हणून मानायला विनोबा तयार होते. परंतु त्यानंतर त्यांनी संपूर्ण स्वामित्वविसर्जनाकडे झपाट्याने वाटचाल केली व आपण मात्र मागल्याच 'मान्यते'वर रेंगाळत राहिलों!

आतां स्पष्ट बोलण्याची व मूलभूत आत्मसंशोधनाची वेळ आली आहे असें मला वाटतें. येत्या सर्वोदय संमेलनांत हें आत्मसंशोधन होईल व आपल्या भूमिका स्पष्ट व निश्चित होतील, अशी आपण आशा करूं या."

कार्यकर्त्यांनी व मा. अण्णासाहेबांनी रेखाटलेलें हें चित्र खेदजनक व मनाला पूर्ण निराश करणारें आहे. पहिल्या वर्षाअखेरची परिस्थिति व

दुसऱ्या वर्षाच्या कामगिरीचा आढावा यांत कांही महत्त्वाची प्रगति दृष्टीस पडत नाही. दुसऱ्या वर्षी सुरू केलेल्या पंचवीस-तीस 'प्रयोग-शिक्षण-केंद्रां'पैकी (Programme Building and Training Centre) यापुढे लिंबागुडा, गरांडा व देवपटांगी हीं तीनच केंद्रें चालू ठेवण्यांत येणार असून इतर केंद्रांसाठी 'लोकजागृतीचे कांही कार्यक्रम (Promotional Activities) आखण्यांत आले आहेत. याप्रमाणे पांच-पन्नास खेडीं सोडलीं तर १४०० पैकी इतर सर्व ग्रामदानी गावांच्या निर्माणकार्याची जबाबदारी यापुढे भारत-सरकारच्या विकासयोजनांवरच (Community Projects) सोपविण्यांत आली आहे. विकास-योजना व ग्रामदान यांचें मीलन व सर्व सेवा संघाची प्रत्यक्ष जबाबदारीच्या कार्यक्षेत्रांतून निवृत्ति हा कोरापुटच्या निर्माणकार्याचा शेवटचा व तिसरा टप्पा होय. ही प्रगति की परागति हें सांगतां येत नाही. पण ग्रामदानांतून स्वयंपूर्ण ग्रामराज्याची उभारणी करण्याचें स्वप्न यांतून साकार होणार नाही हें मात्र निश्चित.

कोरापुट — भारतांतील लोकशाहीचें एकमेव आशास्थान (!) — आज या अवस्थेंत आहे. कोरापुटचे अनुभव, या प्रयोगाची फलश्रुति, यशापयश, यांचा आपण कांही विचार करणार आहोंत काय? इतकी मनुष्यशक्ति येथे उत्साहाने कामास आली आणि तीन वर्षांतच निराशेने ग्रस्त होऊन मरगळून गेली, याचें कांही 'मोल' आपल्यास वाटत आहे का? पैशाचा फारसा प्रश्न नाही. झालेलें आर्थिक नुकसान पुन्हा भरून काढतां येईल. परंतु ध्येयवादी मनें मोडलीं की पुन्हा उभारतां येत नाहीत. हताश आणि निराश कार्यकर्ता स्वतःही सुखी राहूं शकत नाही, दुसऱ्यांनाहि सुख देऊं शकत नाही. कोरापुटमध्ये नवनिर्मितीची उभारी धरून आलेल्या कार्यकर्त्यांत ही हताश आणि निराश वृत्ति आता फैलावली असून ते अंधारांत चाचपडत आहेत. त्यांनी तीन वर्षांत जें कार्य केलें, त्यांना जे विविध अनुभव आले, ज्या अडचणी

सहन कराव्या लागल्या, त्यांचा विचार करून इतरत्र आपल्या कार्य-पद्धतींत सुधारणा करण्याचा जागरूक प्रयत्न आपण करणार आहोंत काय? करणार नसूं तर देशांत अनेक 'कोरापुटें' निर्माण होतील एवढेंच खेदाने म्हणावेंसें वाटतें. कोरापुटमधील कामाला हात घालण्या-पूर्वी बिहारचें कार्य नीट न्याहाळलें असतें, त्यांतील अनुभव जमेस धरले असते, यशापयशाची प्रामाणिक चर्चा केली असती, तर कोरापुटची ही अवस्था होती ना? उद्या महाराष्ट्रांत ग्रामदानांच्या नवनिर्मितीचें कार्य हातीं घेण्याचा प्रश्न उद्भवेल. त्या वेळींहि कोरापुटचे अनुभव आम्ही जमेस धरणार नाही. कुठलें तरी निराळेंच नवीन स्वप्न आमच्यासमोर ठेवण्यांत येईल. त्यामागे आम्ही वेड्यासारखे धावत जाऊं. कांही काळ धावल्यावर एखाद्या ठिकाणीं ठेचकाळूं आणि ठेचकाळल्यावर निराश आणि हताश होऊन एक तर पुढे जाणेंच सोडून देऊं किंवा मागे येऊन शिव्याशाप द्यायला लागूं. अनुभवांची देवाणघेवाण, प्रामाणिक चर्चा व सावधानता या वैज्ञानिक मनोवृत्तीचें आम्हांला वावडें आहे. एक तर आम्ही प्रेषिताच्या धारेंत बोलूं किंवा शिवराळपणाला बळी पडूं. या एकांतिक मनोधारणेमुळे साधनांची अनुकूलता असूनहि आम्हांला आमचा विकास करून घेतां येत नाही. संथ प्रगतीचीं पावलें आम्हांला उचलतां येत नाहीत. विज्ञानाचे कितीहि गोडवे गायले तरी वैज्ञानिक दृष्टिकोन, विज्ञान-पूत विचारपद्धति आम्ही स्वीकारीत नाही. 'नवा अवतार—नवा प्रेषित — नव्या आशा — नवें जीवन — आणि नवी विफलता' हा आमचा विकासक्रम आहे. या विकासक्रमांत अजूनहि बदल नाही, सुधारणा नाही.

परंतु तरीहि कोरापुट-प्रयोगांतील कांही धडे वाचकांसमोर ठेवण्याचें धारिष्ट करावेसें वाटतें. हे धडे किंवा निष्कर्ष सर्वांनाच मान्य होतील असें नाही. कारण मुख्यत: हा मानसिक परिवर्तनाचा प्रयोग आहे. आणि हीं मानसिक परिवर्तनें सहज मोजतां येण्यासारखीं नसतात.

प्रयोगशाळेंत बसून जडद्रव्यांचीं स्थित्यंतरें एकाग्रतेने अभ्यासणें शक्य असतें. परंतु मानवी मनाचा असा अभ्यास करतां येत नाही. तें सारखें प्रवाही असतें व या प्रवाहापासून पाहणाराहि फार वेळ व फारसा अलिप्त राहूं शकत नाही. कितीहि वस्तुनिष्ठ होण्याचा प्रयत्न केला तरी त्यांत 'आत्मनिष्ठता' डोकावल्याखेरीज राहत नाही. एकाच वस्तुस्थितीवरून दोन निरीक्षक दोन तऱ्हेचे निष्कर्ष काढूं शकतात. आणि कदाचित् दोन्ही निष्कर्षांत सत्याचा थोडा थोडा अंश साठविलेला असण्याची शक्यताच अधिक असते. म्हणून कोरापुटच्या प्रयोगाचें सर्वोदयवादी मंडळींकडून जें काय मूल्यमापन होणार असेल तें होवो, आपले अनुभव प्रामाणिकपणें पुढे मांडावेत या भूमिकेंतून पुढील चार शब्द लिहिले आहेत.—

कोरापुटमधील ग्रामदानें हृदय-परिवर्तनांतून निर्माण झालीं, हा सांप्रदायिक आग्रह वस्तुस्थितीला सोडून आहे. येथे हृदय-परिवर्तन तर झालेलें नाहीच; परंतु हृदय-परिवर्तन हें एक एकांगी व अव्यवहार्य तत्त्व आहे, ही गोष्टहि येथील ग्रामदानांमुळे स्पष्टपणें ध्यानांत आली. मनुष्यप्राणी हा मूलतः सत्प्रवृत्त व चांगला आहे. तो मोह व आसक्तीमुळे वाईट वागत असला तरी त्याचें हृदय निर्मळच आहे, ही हृदयपरिवर्तनाच्या मुळाशीं असणारी श्रद्धा आहे. परंतु ह्या श्रद्धेला शास्त्रीय ज्ञानाचा आधार नाही. मनुष्यप्राणी हा सत्प्रवृत्त जरूर आहे. परंतु तितकाच तो असत्प्रवृत्तहि आहे. त्याच्या मनांत नेहमी सुष्ट आणि दुष्ट या दोन्ही प्रवृत्ति वावरत असतात. या दोन्ही प्रवृत्तींचा संघर्ष हाच मानवी जीवनाचा खरा चित्रपट आहे. मनुष्याचें देवत्व हें जितकें नैसर्गिक आहे तितकेंच त्याचें मनुष्यत्व व पशुत्वहि नैसर्गिकच मानलें पाहिजे, हा विचार वस्तुस्थितीला अधिक जवळचा आहे. मनुष्यप्राणी हा मुळांत चांगलाच आहे हा एकतर्फी विचार गृहीत धरल्यामुळे वस्तुस्थितीसंबंधाने कांही भरमसाट कल्पना करून घेण्याची

व स्वप्नाळू जगांत वावरण्याची मनाला सवय लागते. कोरापुटमधील कार्यकर्ते हृदयपरिवर्तनाच्या चुकीच्या कल्पनेमुळे फार प्रचंड अपेक्षा उराशीं बाळगून कार्यास उद्युक्त झाले, ही वस्तुस्थिति आहे. ‘हृदय-परिवर्तनामुळे ग्रामदान झालेलें आहे. आता ग्रामस्थांत वाईट प्रवृत्ति व प्रतिगामी विचार यांचें अस्तित्व शिल्लक राहिलेलें नाही. आपलें काम या सत्प्रवृत्तींचा अधिक विकास करून त्यांना वळण देण्याचें आहे’ अशा भाबड्या कल्पना कार्यकर्त्यांनी मनाशीं बाळगल्या होत्या. परंतु प्रत्यक्षांत जेव्हा आदिवासी मनुष्य स्वार्थ, भीति, संशय, चंचलता इत्यादि सर्वसाधारण मनोगुण प्रकट करूं लागला तेव्हा या कार्यकर्त्यांची घोर निराशा झाली व ते कामांतून हळूहळू निवृत्त होण्याची भाषा करूं लागले. सर्व आधुनिक संपर्कापासून दूर असणाऱ्या कोरापुटमधील खेड्यांतूनहि स्वार्थाचें प्रमाण कमी नाही. चांगली भातजमीन असणाऱ्या आदिवासीची स्वार्थभावना व आसक्ति सर्वसाधारण शहरी माणसाइतकीच प्रबळ आहे. निसर्गाच्या सान्निध्यांत असणाऱ्या निर्व्याजमनोहर व सरळ मनाच्या आदिवासी माणसांतहि सुष्ट-दुष्ट या दोन्ही प्रवृत्ति वावरत असतात, ही गोष्ट हृदय-परिवर्तनवादी मंडळींनी जरूर ध्यानांत घेतली पाहिजे. ‘खेडीं हीं शहरांच्या संपर्कामुळे बिघडलीं आहेत’ असा भलताच एकांगी गैरसमज करून घेऊन ही मंडळी शहरांवर तर अन्याय करतातच, परंतु खेड्यांचें वास्तवज्ञानहि या पूर्वग्रहामुळे त्यांना कधी होऊं शकत नाही. शहरांत जशीं माणसें आहेत तशींच खेड्यांतहि माणसेंच आहेत. स्वार्थसाधनाची संधि खेडुताला मिळाली तर त्याचें वागणें शहरी माणसापेक्षा फारसें उच्च पातळीवरून होत नाही, हा नेहमीचा अनुभव आहे. शहरांत जी गुंडगिरी, हेवेदावे, मत्सर व गटबाजी चालू असेल, तीच लहान प्रमाणांत खेडयांतहि चालू असते, हें कोणत्याहि खेडयांत उघडया डोळ्यांनी चार दिवस राहिल्यावर ध्यानांत येते. हृदयपरिवर्तन-वादी मंडळींचा खेडयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन शास्त्रशुद्ध व निकोप

नसल्याने त्यांचेवर नेहमी निराश होण्याचे प्रसंग येतात. गावकऱ्यांचें सहकार्य मिळत नाही, त्यांना उपकाराची जाणीव नाही अशा तक्रारी या लोकांकडून वरचेवर ऐकूं येतात; याचें कारण गावकऱ्यांबद्दल या मंडळींच्या काव्यात्मक व विपर्यस्त कल्पना हेंच होय. कोरापुटसारखीं आदिवासींचीं निर्मळ खेडीं हिंदुस्थानांत कदाचित् दुसरीकडे सापडणार नाहीत. या खेडयांत दिसणारे मानवी प्रेरणांचें स्वरूप निश्चितच अधिक प्राकृतिक आहे. आदिवासी खेडयांना शहरांपासून अजून तरी फारसा ' धोका ' पोचलेला नाही. या खेडयांतील कार्यकर्त्यांचे अनुभव जमेस धरून तरी इतरत्र निकोप व वस्तुनिष्ठ दृष्टिकोनांतून खेडयांकडे पाहण्याची प्रवृत्ति वाढेल तर ग्रामदानाचें कार्य अधिक प्रभावी होईल असें वाटतें. कोरापुटमध्ये आदिवासींऐवजी कार्यकर्त्यांचेंच ' हृदयपरिवर्तन ' अधिक प्रमाणांत झालें आहे, ही वस्तुस्थिति ध्यानांत घेतली जाईल काय ?

खेडयांकडे व खेडुतांकडे वस्तुनिष्ठ व निकोप दृष्टिकोनांतून पाहिल्याखेरीज ग्रामनियोजनाचा कार्यक्रमहि पार पडूं शकणार नाही, हाहि कोरापुट-प्रयोगाचाच एक अनुभव आहे. वस्त्रस्वावलंब अन्नस्वावलंबन व ग्रामराज्य या कल्पना केवळ कल्पनासृष्टींत ठीक आहेत. स्वावलंबनाचा हा अर्थ फारच ढोबळ आहे. मनुष्याने या अर्थाने स्वावलंबी राहण्याचें ठरविलें तर समाजाचें अस्तित्वच कशासाठी आहे हा प्रश्न उद्भवतो. निर्जन बेटावर राहणारा एखादा रॉबिन्सन क्रूसो या अर्थाने पूर्ण स्वावलंबी ठरेल. पण अगदी प्रारंभकाळापासून मनुष्यसमाज श्रमविभागाच्या तत्त्वाचें पालन करीत आला आहे व हा श्रमविभाग जों जों अधिक सूक्ष्म होत गेला तों तों मानवी समाजाची प्रगतीच होत गेली, अशी इतिहासाची साक्ष आहे. युरोपांत औद्योगिक क्रांति होण्यापूर्वी श्रमविभागाच्या अशाच स्वावलंबी कल्पना प्रचारांत होत्या. फ्रान्समध्ये फिजिओक्रॅटस या नांवाने ओळखले जाणारे अर्थशास्त्रज्ञ शेती हाच एकमेव उत्पादक व्यवसाय

आहे, असें आग्रहाने प्रतिपादन करीत होते. कारखान्यांत काम करणारा मजूर हा त्यांच्या दृष्टीने अनुत्पादक व्यवसायांत आपले परिश्रम खर्च करीत होता. परंतु औद्योगिक क्रांतीचा पाया घालणारा विचारवंत म्हणून ज्या अर्थशास्त्रज्ञाचें नांव घेतलें जातें त्या ॲडम स्मिथने कांही मामुली अपवाद सोडून सारे समाजोपयोगी परिश्रम हे उत्पादक आहेत, हा विचार मांडून माणसांचीं मनें विविध व्यवसाय स्वीकारण्यासाठीं मोकळीं केलीं. त्यामुळेच औद्योगिक क्रांतीला अवश्य असणारें मनुष्यबळ उपलब्ध झालें. त्याचबरोबर स्मिथने औद्योगिक संपन्नतेची व उत्पादन-वाढीची गुरुकिल्ली श्रमविभागांत आहे, हेंहि दाखवून दिल्याने आर्थिक विकासाला जोराची चालना मिळाली. यंत्र चालविणारा मनुष्य आपण ‘अनुत्पादक श्रम करीत आहोंत’ या जाणिवेने काम करीत असेल तर त्याला कधीहि आपल्या कामांत उत्साह वाटणार नाही. तो यंत्राची सुधारणा करण्याकडे कधीहि लक्ष पुरविणार नाही. ‘आपणहि समाजोपयोगी काम करीत आहोंत. समाजाच्या स्वास्थ्यासाठी जेवढा शेतकऱ्याच्या कष्टाचा उपयोग आहे तेवढाच माझ्याहि कष्टांचा उपयोग आहे’ अशी मजुराची मनोमन खात्री असल्याशिवाय देशांत औद्योगिक क्रांतीचा पाया घालतां येणें शक्य नाही. अन्नस्वावलंबन आणि वस्त्रस्वावलंबन या कल्पना व्यवहारांत उतरविण्याच्या अट्टाहासाने आपण या देशांतील ‘परिश्रम शक्ति’ थिजवून टाकीत आहोंत इकडे दुर्लक्ष होत आहे. ‘प्रत्येकाने समाजोपयोगी परिश्रम केलेच पाहिजेत. आणि अशा समाजोपयोगी परिश्रमाखेरीज कोणालाहि सामाजिक धनावर आपला हक्क सांगतां येणार नाही’ हा सामाजिक स्वावलंबनाचा मूळ अर्थ आहे. आणि या अर्थाने, स्वावलंबनाखेरीज कुठल्याहि व्यक्तीचा वा समाजाचा विकास होऊं शकत नाही, हें ध्रुवसत्य आहे. परंतु हें सत्य ‘स्वयंपूर्ण ग्रामराज्यांत’ कोंडून ठेवण्याने देशाच्या सर्वांगीण विकासाला खीळ बसते हीहि वस्तुस्थिति आहे.

कोरापुटमधील नियोजनच या दृष्टीने पाहणें थोडें उद्बोधक ठरेल. येथें अन्नस्वावलंबन व वस्त्रस्वावलंबन विशिष्ट मर्यादेबाहेर साध्य करणें अशास्त्रीय ठरण्याचा अधिक संभव आहे. नवनिर्माण कार्याला सुरुवात झाल्याबरोबर येथे आदिवासींवर चरख्याचे प्रयोग करण्यांत आले. परंतु आज हजारो वर्षें जंगलांत भटकंती करून पोट भरणाऱ्या आदिवासीला चरख्याचा हा 'बैठा' व्यवसाय मानवणें शक्यच नव्हतें. फुकट वाटलेले चरखेहि आज धूळ खात पडलेले आहेत. येथिल डोंगराळ जमिनींतून कापसाचें पीक काढणें हा वेळेचा व श्रमाचा अपव्यय आहे, असें अनेक तज्ज्ञांचें मत आहे. तीच गोष्ट अन्नस्वावलंबनाबाबत. आज आदिवासी शेती करीत असला तरी त्याच्या श्रमशक्तीचा हा कांही शास्त्रीय विनियोग नव्हे; शेतीचीं कामें करण्यापेक्षा येथील आदिवासी जंगलांतील फिरते उद्योग अधिक मनःपूर्वक व कौशल्याने ( Skill ) करीत असतो. येथलि ठेकेदार लोक खोदकाम, बांधकाम किंवा इतर तत्सम कामें करण्यास लागणारे मजूर लोक खालच्या आंध्रप्रांतांतून आणतात; आदिवासीला हीं कामें जमत नाहीत, असा त्यांचा अनुभव आहे. त्याऐवजी त्याला जंगलांतील लाकूडफाटा गोळा करून आणणें, फळफळावळ जमविणें, पानेंफुलें तोडून आणणें, हीं कामें सांगितलीं तर उभयतांना त्यांतून चांगली किफायत होते. सुदैवाने जंगलांतील साधन संपत्तीहि विपुल आहे. संस्थान विलीन होण्यापूर्वी इंग्लिश कंपन्या किंवा दलाल वर्षाला तीस-तीस लाख रुपये जयपूरच्या महाराजाला देऊन ही कोरापुटची जंगले खरेदी करीत व याच आदिवासींकडून आपणांस हव्या त्या व तितक्या वस्तु गोळा करवून घेत. कोरापुटमध्ये शेतीखाली जेवढी जमीन आहे तेवढीच साधरणतः जंगलाखालीहि आहे. केवळ लाकूड-फाटयाचाच विचार केला तर येथील एक चौरस मैल जंगलांतून अंदाजे वीस हजार रुपये किमतीचें लाकूड निघूं शकतें. आदिवासीची श्रमशक्ति व जंगलांतील साधनसंपत्ति यांचा एक नैसर्गिक समन्वय आज

हजारो वर्षांपासून साधला गेला आहे. यापुढे विकासाचे कार्यक्रम आखतांना हा समन्वयच अधिक निर्दोष व प्रगत करून आदिवासींची आर्थिक उन्नति साधायची की शेती–ग्रामोद्योग या ठराविक चाकोरीचा आग्रह धरून हा निसर्ग-प्राप्त समतोल घालवून टाकायचा ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. येथील अर्थरचना वन्योद्योगप्रधान असावी की ती शेती-ग्रामोद्योगप्रधान करावी, याचें उत्तर आज नाही उद्या सर्वोदयी नियोजकांना द्यावें लागेल; आणि या उत्तरावच स्वावलंबनाच्या रूढ, संकुचित व सांप्रदायिक कल्पनांची कसोटी अवलंबून राहणार आहे हेंहि उघड आहे.

अशा शास्त्रशुद्ध ग्रामनियोजनाचा पाया म्हणूनच 'ग्रामदान' या कल्पनेचा विचार केला पाहिजे. ग्रामदानानंतर ग्रामनियोजन होऊं शकलें नाही किंवा नियोजनाची गरजच नाही, असा समज बळावला तर 'ग्रामदान' ही कल्पना हवेंत विरून जाईल. विनोबांनी ग्रामदानाला 'स्वतंत्र' मोल आहे असा विचार एके ठिकाणीं मांडला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यावर जनतेला सुखसमाधान मिळालें नाही तरी 'स्वातंत्र्या'चें मोल जसें कमी होत नाही, तीच गोष्ट ग्रामदानाबाबतहि खरी आहे, असा त्यांच्या म्हणण्याचा सारांश आहे. ग्रामदानामागील मूलभूत विचार 'स्वामित्वविसर्जन व कुटुंब-भावनेचा परिपोष' हा असल्याने केवळ कल्पना म्हणूनहि आजच्या काळांत त्याचें निश्चित मोल आहे हें मान्य; परंतु स्वराज्याचें सुराज्यांत रूपांतर झालें नाही, राजकीय स्वातंत्र्याबरोबरच आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्यहि देशांत अवतरलें नाही, तर जनता उदासीन होऊन पुन्हा पारतंत्र्यांत खितपत पडण्याची शक्यता दृष्टीआड करून कसें चालेल? इतिहास हेंच सांगतो की, जे राजकीय स्वातंत्र्या-साठी झगडतात त्यांच्यावर ही स्वातंत्र्य-रक्षणाची व संवर्धनाची जबाब-दारीहि ओघानेच येते. व्यक्ति भिन्न असूं शकतील, परंतु जबाबदारी दूर लोटतां येत नाही. ग्रामनियोजनाचें कार्य कोणी करावें हा मुद्दा गौण

आहे. कोणीतरी हें नियोजन आखण्याची व पार पाडण्याची जबाबदारी उचलली नाही तर केवळ ग्रामदानांची संख्या वाढून कांहीहि उपयोग नाही हें निश्चित.

ग्रामनियोजनाचा पाया या दृष्टीने ग्रामदान या कल्पनेचें मोल फार मोठें आहे. गावची सारी साधनसंपत्ति पंचायतीसारख्या एका सार्वजनिक संस्थेकडे असली तर तिचें नियोजन व वाटप शास्त्रीय दृष्टिकोनांतून करणें सुलभ जाईल हें उघड आहे. या दृष्टीने 'गरांडा' केंद्राचा अनुभव फार उद्बोधक आहे. या केंद्राने शास्त्रीय जमीन वाटप कसें असतें याचा एक नमुना आपल्यासमोर ठेवला आहे. परंतु हें जमीन-वाटप वरचेवर बदलतां आलें पाहिजे, वाटपानंतर पुन्हा मालकीहक्क कसणाऱ्यांजवळ न राहतां पंचायतीकडेच कायम राहिला पाहिजे, पंचायतीने तो सारखा जागरूकपणें वापरला पाहिजे, या गोष्टीहि ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. कोरापुटमध्ये सर्वत्र एकदा जमीन–वाटप झाल्यानंतर पुन्हा वाटपांत सुधारणा करावयास आदिवासी तयार होत नसे, याचा अर्थच मालकीहक्काचें विसर्जन ग्रामदान होऊनहि तेथे झालेलें नव्हतें. जमिनीची उत्पादन-क्षमता वरचेवर बदलत असल्याने तिचें वाटपहि वरचेवर बदलावें लागेल. गावांतील लोकसंख्येंत बदल होतात. गावावर आपत्ति येतात. या साऱ्या बदलांची दखल घेऊन जमीन-वाटप किंवा इतर साधनसंपत्ति यांचे प्रवाह त्याप्रमाणे बदलते ठेवले नाहीत तर नव्या प्रकारची विषमता पुन्हा रूढ होईल. म्हणून 'ग्रामदाना'ने प्रश्न कायमचे सुटण्याऐवजी नवे नवे प्रश्न उद्भवतील व ते जबाबदारीने सोडविण्याची तयारी असली पाहिजे. ग्रामदान ही एक नियोजनांतील पहिली पायरी झाली. सर्वांनी आपापली साधनसंपत्ति एकत्रित करून तिचा उपयोग व विनियोग केला तर सर्वांचेंच कल्याण आहे, हित आहे, हा यांतील मौलिक विचार आहे. हा हळूहळू मान्य होत जाईल व त्याहीपेक्षा हळूहळू प्रत्यक्षांत अमलांत येईल. ग्रामदान ही एक दीर्घ प्रक्रिया आहे. ग्रामीण नियोजन समाजवादी पद्धतीने कसें करावें, याची दिशा दाख-

विणारी ही एक कल्पना आहे. या दिशेने प्रत्यक्ष वाटचाल करणें आता आपलें कर्तव्य आहे.

परंतु ही वाटचाल तज्ज्ञ, अनुभवी व संघटित मनुष्यबळाशिवाय यशस्वी होणें अशक्यप्राय आहे, हाहि कोरापुटचाच संदेश आहे. मनुष्यबळाच्या नियोजनाशिवाय ग्रामनियोजन असंभवनीय आहे. केवळ विचारप्रचारावर अवलंबून राहून जगाच्या पाठीवर कोठेहि समाजपरिवर्तन झालेलें नाही, हें कोरापुटमध्ये पुन्हा एकदा अनुभवास आलें. जुनी व्यवस्था मोडण्याचें कार्य केवळ विचार कांही प्रमाणांत करूं शकतात. परंतु नवी व्यवस्था उभारण्यासाठी विचाराबरोबरच सुनियंत्रित, सुसंघटित व सुसूत्र आचाराची नितांत आवश्यकता आहे. विशेषत: समाजवादी रचनेला तर तज्ज्ञ मनुष्यबळाचीच जरुरी विशेष प्रमाणांत आहे. हें समाजवादी नियोजन शहरांतील उद्योगधंद्यांबाबत असो किंवा खेड्यापाड्यांतील शेतीग्रामोद्योगाबाबत असो. प्रत्येक ठिकाणीं हें समाजयंत्र चालविण्यासाठी तज्ज्ञ व अनुशासनशील मनुष्यशक्ति उपलब्ध झाल्याशिवाय केवळ घोषणा किंवा ‘मूल्यपरिवर्तन’ यांचा काडीचाहि उपयोग नाही. मार्क्सचे साम्यवादी विचार जर्मनी आणि फ्रान्समध्ये कमी प्रसृत झाले नव्हते. परंतु तेथे अद्याप साम्यवाद तर नाहीच, परंतु समाजवादहि आलेला नाही. उलट मार्क्सने ज्यांचा मनापासून द्वेष केला असता अशा हुकूमशाही राजवटींना हे देश गेल्या कांही वर्षांत पूर्ण बळी पडले. उलट रशियामध्ये मार्क्सवादी विचारांचा फैलाव कांही सुशिक्षित तरुणांपलिकडे कधीच झाला नव्हता. तरीहि तेथे ‘क्रांति’ झाली; समाजपरिवर्तन झालें. हा फरक केवळ ‘संघटित समाजवादी शक्तीमुळे’ पडला, हें ध्यानांत घेतलें पाहिजे. क्रांतीनंतरहि रशिया जर समाजवादी नियोजन यशस्वी करण्यास अवश्य असणारें तज्ज्ञ मनुष्यबळ पुरेशा प्रमाणांत निर्माण करूं शकला नसता तर सर्वत्र गोंधळ आणि बजबजपुरी माजून जुनी व्यवस्था पुन्हा अस्तित्वांत

येण्याचीच शक्यता अधिक होती. सिडने आणि बिॲट्रिस वेब या आंग्ल दंपतीने आपल्या 'सोव्हिएट कम्युनिझम्' या विख्यात ग्रंथांत शेवटी हा तज्ज्ञ मनुष्यबळाचा तुटवडा हेंच रशियांतील सुरुवातीच्या अपयशाचें कारण म्हणून सांगितलें आहे. खुद्द इंग्लंडमध्येहि फेबियन सोसायटी, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थांनी तज्ज्ञ मनुष्य-शक्ति निर्माण करण्यासाठी आपलें सर्व सामर्थ्य खर्चीं घातलें तेव्हा कांही प्रमाणांत तरी या देशांत समाजवाद स्थिर होऊं शकला. लांब कशाला, कोरापुटचें जें एकमेव यशस्वी नियोजन—श्री. रेड्डीजींचें गरांडा केंद्र—त्याचा तरी अनुभव काय आहे? रेड्डीजी हे शेती-तज्ज्ञ आहेत म्हणूनच हें कार्य तेथे होऊं शकलें. परंतु ते एकाकी व एकटे आहेत. त्यांच्यामागे संघटित मनुष्यबळ उभें नाही म्हणून गरांडाचें यश हें अल्पायुषी किंवा अपवादभूत ठरण्याचा संभवच अधिक आहे, ही गोष्टहि येथे ध्यानांत ठेवली पाहिजे. प्रत्येक गावांत एखादा शेतीतज्ज्ञ असलाच पाहिजे, हा याचा अर्थ नाही. परंतु रेड्डींसारख्या अनुभवी व तज्ज्ञ कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाचा पूर्ण लाभ घेणारी संघटना तरी अवश्य आहे. कोरापुटमध्ये जमलेले दोन अडीचशे कार्यकर्ते मग काय करीत होते, असा प्रश्न सहज मनांत येईल. त्याचेंहि उत्तर एकच आहे. ते असंघटित, अनियोजित व अनुशासनरहित होते. मूळ वैचारिक भूमिकेबाबतच येथे दोन स्वतंत्र मतप्रवाह अस्तित्वांत होते. भूदान-कार्यकर्ता व निर्माण-कार्यकर्ता यांचें मतैक्य कधीच होऊं शकलें नाही. भूदान-कार्यकर्त्यांची भूमिका केवळ ग्रामदानें मिळविण्याची होती. विचारप्रचार करावा, मूल्यपरिवर्तन घडवून आणावें, समतेचा, शांतीचा व अहिंसक क्रांतीचा संदेश गावोगाव प्रसृत करावा, एवढेंच ग्रामदानाचें कार्यक्षेत्र या विचार-संप्रदायाला मंजूर होतें. त्यामुळे ग्राम-दानांची संख्यावाढ हें उद्दिष्ट या गटाने आपल्या डोळ्यासमोर ठेवलें होतें. 'ग्रामदानी गावांच्या संख्येंत नियोजनशून्य वाढ होणें उपयोगी नाही;

नवीन ग्रामदानें विकास-गटांशीं संलग्न असलीं पाहिजेत; भूदान-प्रचार आणि निर्माणकार्य यांची जोड व्यवस्थित बसली नाही तर कार्यहानि होईल ' हा विचार १९५६ च्या दिवाळींत कोरापुट येथे भरलेल्या एका परिसंवादांत मान्य करण्यांत आला होता. परंतु तरीहि ग्रामदानांच्या संख्येंत नियोजनशून्य वाढ होतच होती. याउलट दुसरा प्रवाह नवनिर्मितीची जबावदारी मान्य करणारा होता. यांत सुशिक्षित पदवीधर व तरुण कार्यकर्त्यांचा समावेश करण्यास हरकत नाही. गावकऱ्यांना सावकारी पाशांतून मुक्त केलें पाहिजे, त्यांच्या शेतींत सुधारणा घडवून आणली पाहिजे, इतर जोडधंदे काढून त्यांच्या उत्पन्नांत वाढ केली पाहिजे, त्यासाठी नियोजित विकास-कार्यक्रम आखून पार पाडला पाहिजे, असें या गटाचें प्रतिपादन होतें. वास्तविक ग्रामनियोजनाला दोन्ही विचारांची व दोन्ही अंगांनी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची सारखीच आवश्यकता होती. परंतु साम्याऐवजी विरोधावरच अधिक भर देण्याची प्रवृत्ति वाढल्याने हे दोन मतप्रवाह निदान कोरापुटमध्ये तरी कधीच एकरूप झाले नाहीत.

कार्यकर्त्यांचें परस्परांमधील मानसिक अंतरहि फार होतें. बरेचसे ध्येयवादाने प्रेरित होऊन आले असले तरी त्यांचे संस्कार व विचार परस्परांपासून फार भिन्न होते. महाराष्ट्रीय कार्यकर्त्यांविषयीं ओरिया कार्यकर्त्याला, बंगाली माणसाविषयी बिहारीला एकदम आपुलकी वाटूं लागेल, हें संभवनीय नव्हतें. जे नवीन, सुशिक्षित तरुण पदवीधर होते त्यांना जुन्या गांधीवादी सांप्रदायिकांविषयी आदर व प्रेम निर्माण होणेंहि कठिण होतें. शिवाय भाषेची अडचण होतीच. या भिन्न पार्श्वभूमीमुळे जी किमान एकात्मता या कार्यकर्त्यांच्या संचांत निर्माण होणें अवश्य होतें ती कधीच निर्माण होऊं शकली नाही. निदान अनुशासनाची (Adminis- tration) जबाबदारी व्यवस्थित ओळखली गेली असती तरी या परिस्थितींत कांही कार्य निश्चित होऊं शकलें असतें. सरकारी नोकर

नाही का महाराष्ट्रांतून आसाममध्ये फेकला तरी आपलें नियोजित कार्य व्यवस्थित पार पाडीत ! याचें कारण त्याच्यामागे एक यंत्रणा खडी आहे एवढेंच ! परंतु कोरापुटमधील बहुसंख्य कार्यकर्त्यांचा कल अनुशासनाची जबाबदारी टाळण्याकडेच अधिक होता. हिशोब लिहिणें, आपापलीं कामें विशिष्ट तंत्रानुसार पार पाडणें यांत त्यांना कमीपणा वाटत असावा, अशी शंका येते. त्यामुळे दोन-अडीचशे कार्यकर्ते असूनहि कामाला नीट वळण व शिस्त शेवटपर्यंत लागली नाही; आणि ही शिस्त नसल्याने कामाचा उठावहि त्या मानाने फारच कमी झाला हीहि वस्तुस्थिति आहे.

परंतु कार्यकर्त्यांच्या या अवस्थेला वरिष्ठ नेतृत्वहि बऱ्याच प्रमाणांत जबाबदार असावें असें वाटतें. एका वेळीं एकच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून सर्व शक्ति त्यावर केंद्रित करण्याऐवजी वरचेवर उद्दिष्टांत व त्याबरोबर कार्यपद्धतींत बदल केल्यामुळे कार्यकर्त्यांच्या विस्कळीतपणांत भरच पडत गेली. सुरुवातीचें पहिलें वर्ष परिस्थितीची सम्यक् कल्पना नसल्याने नेमकीं उद्दिष्टें नजरेसमोर धरणें शक्य नव्हतें हें खरें; परंतु त्यानंतर उद्दिष्टांत वरचेवर बदल करण्याचें कारण नव्हतें. उदाहरणार्थ, शिक्षित कार्यकर्त्यांचें पथक तयार केल्याशिवाय योजनेचें पानहि हलणार नाही हें ध्यानांत आल्यामुळे "The next year should be earmarked for training of the personnel" असा निर्णय अकिली येथे २९ नोव्हेंबर १९५६ रोजीं भरलेल्या निर्माण-कार्यकर्त्यांच्या बैठकींत घेण्यांत आला. हा शिक्षणाचा कार्यक्रमहि फार अवघड होता असें नाही. आदिवासींची भाषा शिकणें, जमिनींची प्रतवारी व मोजणी करायला शिकणें, हिशोब वगैरे ठेवणें, इतक्या बाबी जरी कार्यकर्त्यांनी आत्मसात् केल्या असत्या तरी बरीच प्रगति झाली असती. परंतु यांपैकी कांहीहि झालें नाही. बड्या बड्या योजना मात्र कागदावर तयार झाल्या. शिवाय व्यापारी उलाढाली, वन्योद्योगांच्या संशोधनासाठी प्रयोगशाळा इत्यादि पुढील गोष्टी घाईगर्दीने

उरकण्यांत येऊन विनाकारण नुकसान व मनुष्यबळाची हानि मात्र सोसावी लागली. जमीन-वाटप, सहकारी दुकानें, कर्जवाटप व थोडया-फार शेतीसुधारणा इतक्याच गोष्टी नेटाने हातीं घेतल्या गेल्या असत्या तर आज कांहीतरी भरीव यशाची प्राप्ति पदरांत पडली असती. यासाठी अवश्य तें शिक्षित मनुष्यबळ थोडया प्रयत्नांतीं, आहे त्यांतूनच निर्माण करणें सहज शक्य होतें. अशा रीतीने हळूहळू पायाभरणी करून, एकीकडून गावकऱ्यांचें सहकार्य व दुसरीकडून अवश्य तें तज्ज्ञ मनुष्यबळ यांची निर्मिति केली गेली असती तर कोरापुटचें चित्र आज कांही वेगळेंच दिसलें असतें. परंतु असें रेखीव व सुस्थिर नेतृत्व न लाभल्याने कार्यकर्त्यांच्या श्रमशक्तीची वाताहत झाली, हें सत्य मान्य केलेंच पाहिजे. कोरापुट-प्रयोगाचें निरीक्षण करून गेलेल्या अनेक तज्ज्ञ निरीक्षकांनी या अस्थिर नेतृत्वाच्या दोषस्थलावर नेमकें बोट ठेवलेलें आहे. कोरापुटमधील एक कार्यकर्ता मुंबईमधील आपले अनुभव पुढील शब्दांत व्यक्त करतो—

"Whosoever I saw in Bombay or elsewhere, of those who had visited us, none was happy about our organisation and all were dismayed by lack of clarity in our thinking. Similar impressions were carried also by one head of an institution who told me frankly that he was interested in our project only if we accepted or proceeded with scientific planning, not otherwise. He somehow gathered the impression that in Koraput at present people with different voices or sometimes noises have been pulling the project in the directions dictated by their individual whims or biases. 'Surely', he said, 'people are not going to believe in our excuses, if with

so many advantages on our side, we failed to present a hopeful and scientific picture of development in the end."

—Gramdan, August 1957.

"मुंबईकडे मी ज्या ज्या व्यक्तींना भेटलों त्या सर्वांनी आपल्या संघटनेच्या प्रचलित स्वरूपाविषयी व आपल्यांतील वैचारिक गोंधळा-विषयी निराशाजनक मतें व्यक्त केलीं. एका संस्थेच्या संचालकांनी तर मला स्पष्टपणें सांगितलें की, जर आपण शास्त्रीय दृष्टिकोन पत्करून नियोजनाचें काम करणार असूं तरच त्यांना आपल्या या प्रयोगाचा विचार करावासा वाटेल, एरव्ही नाही. कोरापुटमध्ये सध्या वेगवेगळ्या मतांचे व कल्पनांचे लोक आपापल्या लहरीनुसार नियोजन-कार्याची ओढाताण करीत असावेत, असा त्यांचा ग्रह झालेला मला आढळला. "इतकी सर्व दृष्टींनी अनुकूलता असूनहि जर कोरापुटच्या विकास-कार्याला आपण चालना देऊं शकलों नाही, तर तें क्षम्य ठरणार नाही. कितीहि कारणें सांगितलीं तरी लोकांचा आपल्यावर विश्वास बसणार नाही," असा अभिप्रायहि त्यांनी व्यक्त केला."

ही स्थिति शोचनीय आहे. संघटित नियोजन-शक्तीची ही घातक उपेक्षा कोणालाच भूषणास्पद नाही. पुन्हा ही गोष्ट येथे स्पष्ट करावीशी वाटते की, विनोबांसारख्या संतांनीच हें नियोजन-कार्य अंगावर घेतलें पाहिजे, असा याचा अर्थ नाही. त्यांनी 'मूल्यपरिवर्तन' केलें, 'विचारप्रवर्तन' केलें, हेंच थोर उपकार आहेत. परंतु नाना विक्षिप्त मतें प्रतिपादन करून किंवा तंत्रमुक्तीसारख्या गोंधळांत भर टाकणाऱ्या घोषणा करून, त्यांनी नियोजन-शक्तीचा ऱ्हास तरी करूं नये एवढी प्रार्थना करणें विनम्रभावास सोडून होणार नाही असें वाटतें. देह कितीहि जड असला तरी आत्म्याच्या अभिव्यक्तीस दुसरें साधन नाही. म्हणून तोच जोपासला पाहिजे, त्याचे संवर्धन केलें पाहिजे. संघटना, नियोजन, यांचेंहि असेंच आहे. त्यांची उपेक्षा करून कोणाचेंहि आजवर भागलें नाही.

यापुढच्या काळांत तर निश्चितच भागणार नाही. सर्वोदयी ग्रामक्रांति यशस्वी करायची असेल तर सर्वोदयी नियोजकांची समर्थ संघटना खडी करणें भाग आहे. कालाचें आव्हान स्वीकारायचें धाडस असेल तर हा संघटनेचा प्रचंड व्याप उभारला पाहिजे, सांभाळला पाहिजे. नाहीतर ‘ नवा भक्तिसंप्रदाय ’ एवढेंच या सर्वोदयाचें महत्त्व शिल्लक राहील.

अशा संघटित नियोजनशक्तीचा विनियोग कसा करावा लागेल, याबद्दलहि कोरापुटचा अनुभव मार्गदर्शक ठरेल असें वाटतें. ज्या प्रमाणांत तज्ज्ञ मनुष्यबळ उपलब्ध असेल त्या प्रमाणांत देशांतील निरनिराळ्या भागांत ग्रामदानी गावांचे सलग गट करून कांही “ अग्रेसर योजना ” ( Pilot Projects ) सुरू करण्यांत याव्यात. या योजनांचा इतरत्र ‘ प्रयोगशाळे ’-सारखा उपयोग होईल. येथे आलेले अनुभव, यशापयश किंवा येथील संशोधन इतरांना मार्गदर्शक ठरेल. शिवाय नवीन कार्यकर्ते तयार करण्यास या केंद्रांचा चांगलाच उपयोग होईल. याशिवाय इतरत्र प्रत्यक्ष विकासाची जबाबदारी सर्वोदयी कार्यकर्त्यांनी न स्वीकारतां सरकारी विकास-योजनांशीं सहकार्य करण्याची वृत्ति ठेवावी. अधिकारावर कोणतेंहि सरकार आले तरी जनतेपासून तें दूरच राहणार. सरकारी यंत्रणेविषयी एक प्रकारची परकेपणाची भावना खेड्यापाड्यांतील जनतेंत तरी कायमच राहणार. हा परकेपणा दूर करून विकास-योजनांना अवश्य असणारे सहकार्याचें व सलोख्याचें वातावरण गावागावांतून निर्माण करण्याचें कार्य सर्वोदयी कार्यकर्त्यांसमोर उभें आहे. विकास-योजना ग्रामक्रांति करूं शकत नसल्या तरी ग्रामसुधारणा तरी निश्चित करतील. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस भारतांतील जवळ जवळ सारी खेडीं विकास-योजनांनी व्यापलीं जाणार आहेत. या योजना सुरू होऊन पैसा खर्च होणारच आहे तर तो नीट खर्च होऊन गावकऱ्यांचें थोडेंफार तरी कल्याण झालें तर त्यांत वाईट काय आहे ? या योजनांच्या अंमलबजावणींत भ्रष्टाचार, लाचलुचपत, दिरंगाई-हे दुर्गुण शिरलेले सर्वत्र आढळून येत आहेत. लोकांचा विश्वास

ज्याने संपादन केलेला आहे, अशा निःस्पृह व अलिप्तवृत्तीच्या कार्यकर्त्यालाच यंत्रणेंतील हे दोष दूर करतां येणें शक्य आहे. यंत्रणेंतील अधिकारी हें काम करूं शकणार नाहींत. आज गावकरी आणि या विकास-योजना यांच्यांतील एक दुवा निखळला आहे. सर्वोदयी नियोजकाने हा निखळता दुवा पुन्हा बसवून या युगांतील 'जनसेवकां'ची भूमिका पार पाडावी, हें क्रमाने दुसरें असलें तरी तितकेंच महत्त्वाचें काम नाही काय ? कोरापुटमध्ये तीन वर्षांच्या अनुभवानंतर अशीच श्रमविभागणी झाली आहे. तिचा सर्वत्र प्रसार होणें अवश्य आहे. जेथे शक्य तेथे ग्रामक्रांति व ग्रामनियोजन, इतरत्र ग्रामविकास आणि कांही निवडक विचारवंतांकडून व्यापक विचारपरिवर्तन – ही ग्रामदानाची भावी वाटचाल आहे. ही वाटचाल नीट ध्यानांत घेतली गेली तर कोरापुटचा प्रयोग वाया गेला, असें समजण्याचें कारण नाही. ती ध्यानांत घेतली जावी एवढ्यासाठी तर हा सारा लिखाणाचा व प्रकाशनाचा खटाटोप थोडी अप्रियता व झीज सोसूनहि 'राजहंस–प्रकाशना'ने केला. प्रिय वाचक ! याचा लाभ घेणें न घेणें आता सर्वस्वी आपल्यावर अवलंबून आहे. आमचें काम संपलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ......... दि .........
......... नों. दि .........
REFBK-0009775
८७७५

राम कर्ता राम भोक्ता । रामरूप वसुंधरा ॥

# चिकित्सक दर्शन

प्रस्तुत पुस्तकांत ग्राम-स्वराज्याच्या प्रयत्नामागे असलेला ध्येयवाद आणि कोरापुटच्या भूमीवर झालेल्या प्रत्यक्ष कार्याचें यशापयश या दोन्हीचा परामर्श लेखकाने घेतलेला आहे. पंधरा-वीस दिवसांच्या प्रत्यक्ष पाहणींतदेखील डोळे व कान उघडे ठेवून पुष्कळच टिपून घेतां येतें आणि सहानुभूतीची व चिकित्सक दृष्टि असेल तर अशा एका मूलगामी सामाजिक प्रयोगाचें दर्शन वाचकांना घडवितां येतें, अशा आत्मविश्वासाने लेखकाने हें पुस्तक लिहिलें आहे. तें वाचून आपल्यालाहि पटेल की, तो आत्मविश्वास रास्त आहे — मग तुम्हांला लेखकाचे सर्व निष्कर्ष पटोत वा न पटोत.

विनोबांच्या तत्त्वज्ञानाबद्दल व कार्याबद्दल इतर ठिकाणांपेक्षा महाराष्ट्रांत जास्त आदर व जिव्हाळा आणि चिकित्साहि अपेक्षित आहे. ज्यांत प्रत्यक्ष व्यवहार्यता आणि दूरगामी क्रांतिकारक ध्येयवाद यांची सांगड नाही, अशा प्रयोगाबद्दल महाराष्ट्रामध्ये जिव्हाळा उत्पन्न होत नाही. कोरापुटच्या प्रयोगाचें हें चिकित्सक दर्शन म्हणूनच मला उपयुक्त वाटतें. सर्वांकडून, त्यांतल्या त्यांत समाजक्रांतीचें ध्येय पुढे ठेवणाऱ्या सर्वोदयवादी, समाजवादी, कम्युनिस्ट कार्यकर्त्यांकडून या पुस्तकाचें स्वागत व्हावें असें मला वाटतें !

— प्रा. दि. के. बेडेकर

* * *

लेखक : श्री. ग. माजगांवकर

प्रस्तावना : डॉ. धनंजयराव गाडगीळ